म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 438
१९२६

# मंदार मंजरी इ०.

REFBK-0003141
REFBK-0003141

वि० वा० भिडे.

# विद्याधर वामन भिडे यांचीं कांहीं पुस्तकें.

१ **राघवीय-परीवाह, पूर्वार्ध**, सर्ग १ ते १०. ह्या पूर्वार्धांत रामजन्मापासून तों पंचवटींत सीतेला चोरून न्यावयाला रावण आला येथपर्यंतचा कथाभाग ग्रथित केला आहे. संस्कृतांतील महाकाव्यांच्या पद्धतीवर हें काव्य रचिलेलें आहे. वर्णनाचा ओघ, अलंकार, भाषा, रचना, शुद्धता, वगैरे संबंधानें हें काव्य उत्कृष्ट आहे. विष्णु मोरेश्वर महाजनी, गणेश जनार्दन आगाशे, प्रो० वैजनाथ काशीनाथ राजवाडे, वगैरे पंडितांनीं हें काव्य प्रशंसिलेलें आहे. किंमत बारा आणे.

२ **काव्यकुसुमावली**—ह्या पुस्तकांत लहान मोठीं दहा काव्यें आहेत. यांपैकीं सौमतेयसमुद्धार ह्या काव्यांत भगीरथानें स्वर्गाहून गंगा पाताळांत नेली आणि साठ हजार सगरपुत्रांचा उद्धार केला, हा मजकूर असून त्यांत निसर्गाच्या भव्य देखाव्यांचीं वर्णनें विपुल आहेत. बाकीचीं नऊ काव्यें लहान लहान असून चटकदार आहेत. किंमत आठ आणे.

३ **जीवजागृति**—यांत सुमारें शंभर विषयांवर बोधप्रद कुटकें असून ते विविध वृत्तांत रचिलेले आहेत. किंमत आठ आणे.

४ **दण्डदण्डना**—ह्या काव्यांत दंडकारण्याची भीषणमनोहर कथा ग्रथित केली आहे. यांत १२० श्लोक असून ते अक्षरसंख्येच्या चढत्या क्रमानें योजिले आहेत. हें एक प्रकारचें वृत्तदर्पण म्हणून वाचावयाच्याही उपयोगाचें आहे. किंमत चार आणे.

५ **अर्थालंकारांचें निरूपण**—ह्या पुस्तकाची पृष्ठसंख्या सुमारें २५० असून अर्थालंकार ह्या विषयावर ह्याच्या इतकें मोठें पुस्तक आजपर्यंत मराठींत झालेलें नाहीं. ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत लक्षणा, रस, काव्य, रीति, गुण, अनुप्रास, अलंकार, वगैरे पारिभाषिक शब्दांचीं सरळ आणि सोप्या शब्दांत लक्षणें दिलेलीं असून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. नंतर मुख्य ग्रंथांत ६१ अर्थालंकारांचें निरूपण केलें आहे. प्रत्येक अलंकाराचें लक्षण, लक्षणाच्या स्पष्टीकरणार्थ भरपूर उदाहरणें, प्रत्येक उदाहरणाचा अनुवाद आणि समन्वय, ह्या गोष्टी दिल्या आहेत. प्रत्येक अलंकाराचें निरूपण संपल्यावर विद्यार्थ्याला स्वताच्या बुद्धीनें अलंकार ठरविण्यासाठीं कांहीं पद्यें दिलीं आहेत. ह्या ६१ अलंकारांचें

# मंदार मंजरी इ०

( अठ्ठावीस काव्यांचा संग्रह )

रचणार

विद्याधर वामन भिडे

मुद्रक

शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

प्रकाशक

विद्याधर वामन भिडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८९
REFBK-0003141

किंमत बारा आणे.

# आमचा संकल्प.

भिन्न भिन्न मासिकांत भिन्न भिन्न वेळीं छापून आलेलीं अशीं, आणि आजपर्यंत कोठेंच न छापलेलीं अशीं, आमचीं कांहीं निवडक काव्यें आम्ही सहा भागांत छापून काढण्याचा विचार केला आहे. प्रत्येक भाग सुमारें शंभर पृष्ठांचा होईल आणि प्रत्येक भागाची किंमत आगाऊ नांवें नोंदवून साही भाग घेणाऱ्यांना **आठ आणे** ठेवावयाची आहे.

पहिल्या तीन भागांत मिळून सुमारें सहासष्ठ काव्यें पौराणिक, ऐतिहासिक, तात्त्विक, बोधपर, विनोदी, अशा विविध स्वरूपांचीं संकलित केलीं जातील.

चवथ्या भागांत " जीवजागृति " हें काव्य येईल. ह्या काव्यांत अडीचशेंहून अधिक विषयांवर आमचे स्फुट विचार ग्रथित केले आहेत. ह्या काव्यांत विषयांची विविधता आहे तशी वृत्तांचीही विविधता आहे. कारण, यांत सुमारें एकशें नव्वद गणवृत्तें आम्हीं उपयोगांत आणिलीं आहेत.

पांचव्या भागांत " राघवीय परीवाह " ह्या काव्याचा उत्तरार्ध ( सर्ग ११ ते २२ ) येणार आहे. ह्या उत्तरार्धांत रावणानें सीता चोरून नेली, येथपासून तों रामाला राज्याभिषेक झाला, येथपर्यंतची रामायणाची कथा ग्रथित केली आहे.

सहाव्या भागांत आमचीं विविध विषयांवर रचलेलीं सुमारें पाऊणशें पदें आम्ही संकलित करणार आहों.

महाराष्ट्रीयांनीं आमच्या ह्या सहा भागांस आश्रय द्यावा अशी विनंति आहे. भाग छापून तयार होतील त्या क्रमानें ते ग्राहकांकडे पाठविण्यांत येतील. ते ग्राहकांनीं आठ आठ आणे किंमत देऊन स्वीकारावे, अशी विनंति आहे. कोणाला आपल्या मित्रांसाठीं आमच्या काव्यांचे भाग पाहिजे असल्यास तसें त्यांनीं कळविण्याची कृपा करावी.

७३५ सदाशिव पेठ,
पुणें सिटी.

**विद्याधर वामन भिडे.**

# प्रस्तावना.

भिन्न भिन्न वेळीं भिन्न भिन्न मासिकांत छापलेलीं अशीं कांहीं, आणि आजपर्यंत मुळींच कोठेंही न छापलेलीं अशीं आमचीं कांहीं निवडक काव्यें संकलित करून आम्ही तीं सहा भागांत छापण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकीं हा पहिला भाग आम्ही वाचकांना सादर करीत आहों. ह्यांत पूर्वी केव्हां तरी आणि कोठें तरी छापलेलीं एकोणीस काव्यें आणि मुळींच न छापलेलीं नऊ काव्यें संकलित केलीं आहेत. ह्या भागांतील हीं आठ्ठावीस काव्यें अनेक विषयांवर आणि अनेक वृत्तांत आहेत. प्रत्येक वाचकाला प्रत्येक काव्य रुचेल अशी आमची अपेक्षा नाहीं. परंतु प्रत्येकाला कोणच्या तरी काव्यांत कांहीं तरी बोधप्रद पद्यें आढळलीं, किंवा आनंददायक पद्यें आढळलीं, किंवा पटण्याजोगा म्हणून अनुसरणीय असा अनुभव आढळला, तर तेवढ्यांत आमचा संतोष आहे.

दृष्टांतमालेंतील पद्यें संस्कृत पद्यांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत.

जिताजित काव्यांतील कल्पना इंग्रेजींतून घेतल्या आहेत.

महाराष्ट्रीयांनीं आमच्या काव्यांना उदार आश्रय देऊन सहा भाग छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं आम्हांला उत्तेजन द्यावें अशी विनंती आहे.

७३५ सदाशिव पेठ,
पुणें सिटी.

विद्याधर वामन भिडे.

# अनुक्रमणिका.


| काव्याचें नांव. | पद्य संख्या. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंदार मंजरी | ११० | १ |
| २ पापी माणूस | १८ | १० |
| ३ गोमती | २५ | १२ |
| ४ मोहवी मदिरा मना | ८ | १४ |
| ५ पुण्यपंक्ति | ५० | १६ |
| ६ श्रीशारदा | २५ | २० |
| ७ स्पृश्यास्पृश्य | २५ | २२ |
| ८ वेलावेदन | ३० | २४ |
| ९ गुलाबाच्या फुलाचें भाषण | १२ | २७ |
| १० शंकातंक | ४३ | २८ |
| ११ माध्वीकमाधुरी | १५ | ३५ |
| १२ मेषपेषण | ५५ | ३६ |
| १३ दृष्टान्तमाला | ५७ | ४१ |
| १४ ऐश्वर्यचलता | २९ | ४६ |
| १५ प्रसूपय | १८ | ४९ |
| १६ शिवाजीचें चारित्र्य | ९४ | ५० |
| १७ चित्रचातुरी | ७७ | ५८ |
| १८ पुढारी | २८ | ६५ |
| १९ काककाणता | ४३ | ६७ |
| २० जिताजित | ११ | ७१ |
| २१ स्मारकाचा उपयोग | ३८ | ७२ |
| २२ ज्ञानसंपदा | १० | ७६ |
| २३ कवींचा आनंद | ५ | ७७ |
| २४ सदा सुवेला सुकृता | १२ | ७८ |
| २५ विज्ञानव्यर्थता | २२ | ८० |
| २६ व्यंजनावली | ९ | ८३ |
| २७ सुकन्या | ८७ | ८४ |
| २८ विसंवाद | ५१ | ९२ |


एकंदर पद्यसंख्या १००७

# मंदार मंजरी इ०

## मंदार मंजरी

मंदार ह्या नांवाच्या एका मावळ्या गड्याला शिवाजीनें मुसलमानांच्या ताब्यांतील एका किल्यासंबंधाची माहिती आणावयासाठीं हेर पाठविलें होतें. हा गडी वयानें पंचविशीच्या आंत असून शरीरानें गोंडस आणि भाषणांत चतुर होता. त्यानें मी मुसलमान आहें असें सांगून त्या किल्याच्या अधिकाऱ्याची मर्जी संपादन करून घेतली, आणि त्याच्या हाताखालच्या नोकराचाकरांचा तो प्यारा झाला. आपणावरचा वहीम टाळावयासाठीं एकदा तर तो त्या मुसलमान अधिकाऱ्याच्या ताटांतून जेवला देखील. जरूर ती माहिती मिळतांच तो त्या किल्यांतून निसटून बाहेर पडून शिवाजीस भेटला. शिवाजीनें त्याची महत्वाची कामागिरी मनांत आणून त्याला एक सोन्याचें कडें बक्षीस दिलें, आणि शास्त्री, पंडित, वगैरेंच्या संमतीनें त्याला प्रायश्चित्त देऊन परत जातीमध्यें घेतलें, अशी गोष्ट ह्या काव्यांत ग्रथित केली आहे.

शिवबाचें कार्य सफल करुनी, संक्षिप्त कथुनि तें त्याला ।
मंदार त्या स्थलाहुनि भेटाया स्त्रीस सत्वर निघाला ॥ १ ॥
चंपापुरास येउनि शिरला मंदार आपुल्या उटजीं[1] ।
त्याचीं वस्त्रें मळलीं होतीं चालूनि मार्ग दीर्घ रजीं[2] ॥ २ ॥
पतिला पुढतीं बघतां गृहकृत्यें त्यजुनि मंजरी आली ।
आनंदभरानें ती पुलकिततनु[3] तेधवां अहो ! झाली ॥ ३ ॥
स्तिमितक्रिय[4] हीं दोघें अन्योन्यमुखांवरी स्थिर करोन— ।
दृष्टी ठेली क्षणभर, जाणों पाषाणमूर्ति त्या दोन ॥ ४ ॥
मग मंजरिनें पुशिलें बहु कुशलप्रश्न आपुल्या पतिला ।
त्यानेंहि अल्पशब्दात्मक वृत्तांत प्रियेस जाणविला ॥ ५ ॥

---

१ झोपडींत. २ धुळीनें. ३ रोमांच उठले आहेत अंगावर जिच्या. ४ बंद झाली आहे हालचाल ज्यांची.

स्वामीच्या कार्याची मंदारें सफलता तिला कथिली ।
विस्तर न तयें केला, कार्याची कल्पनाच तीस दिली ॥ ६ ॥
गात्रें आलस्यान्वित, भाषण मितशब्द[६], वदन सुकलेलें ।
ह्यांहीं तिज जाणविलें पतिचित्तीं दुःख तीव्र भिनलेलें ॥ ७ ॥
बाह्याभ्यंतरिं अपुला पति न यथापूर्व[७] हें तिला कळलें ।
चाणाक्ष ती, तिचें मन दुःखकुतुकविस्मया[८]दिहीं भरलें ॥ ८ ॥
स्वस्थानीं वृत्ति नसे पतिची हें तत्क्षणीं तिला कळलें ।
कारण अज्ञात तरी चित्त तिचें फार फार हळहळलें ॥ ९ ॥
स्वेच्छेनें पति कळविल ते परिसावें अशा विचारानें–।
न विशेष तिनें पुशिलें; ही तिज वर्तनदिशा बहू माने ॥ १० ॥
केला मंदारानें मग अल्प असा घरीं उपाहार ।
चित्त व्यग्र तयाचें दिसलें, कीं तो न बोलला फार ॥ ११ ॥
करुनि उपाहार असा भेटाया स्वामिला जवें उठला ।
चित्ता करुनि नियंत्रित घ्याया स्त्रीचा निरोप तो सजला ॥ १२
तो वदला तिजला, " मी जातों, न दिसेन या पुढें तुजला "।
हें तो वदुनि शृंगा[१०]विल पविहत[११] गिरिसा महीतलीं पडला ॥ १३
जें दुःख रोधिलें मनिं त्यानें तोंवरि न रोध तें साहे ।
सेतु फुटुनि जल सिंधू[१२] तेविं तुटुनि धीर बाष्प तो वाहे ॥ १४ ॥
पाहुन पतीस रडतां स्त्रीही नेणून कारणा रडली ।
कोणा आर्यस्त्रीस न पतिसुखदुःखें स्वकीयशीं गमलीं ? ॥ १५ ॥
बाष्पजलाच्या स्रुतिनें[१३] ओसरतां दुःख तो तिला बोले ।
मन मोकळें करुनि मग, वस्त्रें डोळे पुसून जे ओले ॥ १६ ॥
" सांगोपांग सफल मी शिवबाचें कार्य करुनियां आलों, ।
परि मंजरी खरें तुज कथितों मनिं फारसा न मी धालों ॥ १७
स्वामीच्या कार्यास्तव उचित असे देह घालणें अनलीं[१४] ।
विष खाणें, कीं घेणें स्वेच्छेनें उदधिच्या उडीहि जलीं ॥ १८ ॥

---

५ मंदपणें हालचाल करणारा. ६ थोडक्या शब्दांचें. ७ नेहेमी सारखा. ८ दुःख, जिज्ञासा आणि आश्चर्य इत्यादि भावनांनीं. ९ फार पसंत पडली. १० दुःखानें पीडिलेल. ११ वज्रानें तोडिलेला. १२ समुद्र. १३ प्रवाहानें. १४ विस्तवांत.

परि तें कार्य कराया मी सफल अतीव घोर अघ केलें ।
जाणुन बुझून केलें, पुण्यविचार न तदा मनिं उदेले ॥ १९ ॥
ज्या युक्तिनें धन्याचें केलें मी कार्य सफल तिनेंच ।
मोतरें स्वात्म्याचें केलें, कळला मला न हा पेंच ॥ २० ॥
स्वामीच्या कार्याचें झालें साफल्य, मम न जन्माचें ।
मी घोर पाप केलें जें मंजरि मज न वदवतें वाचें ॥ २१ ॥
स्वामीच्या कार्यास्तव मरणें जरि सेवका असे उचित ।
तरि जी पापकृती ती क्षम्य गणिल धर्मकोविदें[15] न खचित॥२२॥
मरण पुरवलें, परि अघ अधमतम करोनि न नरका जाणें ।
स्वाम्यर्थ मरण देतें स्वर्ग, नरक अघ अहेतु[16], मी जाणें ॥२३॥
स्वाम्यर्थ जरी येतें मरण तरी तें न मम मना डसतें ।
परि मम मनास डसतें जें म्यां केलें अघोरतम अघ[17] तें ॥२४॥
नकळत केलें क्षमिजे पाप, असो तें कसेंहि, कांहींही ।
तरिही प्रायश्चित्तचि बुद्धिपुरस्सर अघा स्मृतिंत नाहीं ॥२५॥
तुज सारख्या स्त्रियेला, धर्माला, जातिला, समाजाला,–।
मी मुकलों, मी केलें प्रायश्चित्तचि नसे विहित ज्याला ॥२६॥
तुजशी तूंच पवित्रा, मजसा अपवित्र मंजरी मीच ।
तुजला मी स्पर्शिन तर मजसा जगिं मीच गणिल बुध नीच ॥२७॥
यास्तव मी तुज सोडुनि जातों, तुजला पुन्हा न भेटेन ।
कीं मत्संगतिनें तुज माझें भोवेल निश्चयें एन ॥ २८ ॥
धर्मत्याग अगोदर, तत्क्षालनिं विसरणें तदनु देश ।
अघभार द्विविध असा सहवेल न पामरा मला लेश ॥२९॥
देशप्रीतिस माझ्या अवसर लाभेल यापुढें न कधीं, ।
त्या सेवीन न मी ज्या यवनपवनभुजगभुज[18] गणी मम धी॥३०॥

---

१५ धर्म जाणणारा. १६ विनाकारण केलेलें. १७ पाप. १८ इतःपर त्या शिवाजीची सेवा माझ्याकडून होणार नाहीं,–ज्या शिवाजीला मुसलमान राजे हेच कोणी वायु त्याला सर्पाप्रमाणें म्हणजे खाऊन टाकणारा आहे बाहु ज्याचा, असें मी समजतों.मुसलमानांचा विध्वंस करणाऱ्या शिवाजीची सेवा इतःपर माझ्या हातून होणार नाहीं म्हणून मला देशभक्तीचीं कार्यें करण्याची संधी मिळणार नाहीं.

सरला ऋणानुबंध प्रिय भार्ये आपुला; दिशा दोन-।
झाल्या, इत:पर तुला जाणारचि मी असाच सोडोन ॥ ३१ ॥
तुज सोडुनि जाणें हें येतें माझ्या प्रिये जिवावरती ।
तरि मी जाणारचि हें निश्चित, मज आढळे न अन्य गती॥३२॥
शेवटचीच समज ही भेट, पुन्हां मी तुला न भेटेन ।
स्पर्शू न शके तुज कीं तूज विटाळील घोर मम एनें[17] ॥ ३३ ॥
शेतीभाती अपुली आहे पुष्कळ, पुरेल ती तुजला ।
देवास आळवित जा प्रतिदिन, कीं तो क्षमा करो मजला॥३४॥
शिवरायाला भेटुनि त्याचा घेउनि निरोप शेवटला ।
जाइन काशीक्षेत्रीं, तेथें वास्तव्य बहु रुचेल मला" ॥ ३५ ॥
परिसुनि पतिभाषण हें मनिं ती[19] अतिवेल मंजरी भ्याली ।
दु:खोद्भव बाष्पाच्या साध्वी सलिलें सचैल ती न्हाली ॥३६॥
सांत्वायास्तव तिजला मंदार असें तिला वचन वदला, ।
" तव रोदन आवर हें, तव रोदन दु:ख देतसें मजला ॥३७॥
त्यजुनि तुला जाणें मम भोग्य तसें मजविना तुझें जगणें ।
तें आपण भोगलियाविण मुक्ति न आपणा, न तें टळणें ॥३८
झालें तें परत न ये, रडतेस कशास मंजरी वायां? ।
पापानें मळली हा स्पर्शिल मम या पुढें तव न काया"॥३९॥
ऐकुनि भाषण पतिचें हें ती वदली असें तयास सती, ।
"मी न तुम्हाला सोडुनि राहिन, तुमचेच पाय मजसि गती ४०
कांहींही पाप असो तमचें, मज तुम्हिच शरण या जगतीं ।
जलधि असो वडवामय[20], त्या संगें करि नदी सदा वसती॥४१॥
तुमचें कांहींहि असो पाप, कितीही, कसेंहि केलेलें ।
सोडुनि तुम्हांस जगणें याहुनि तुमच्या पदीं वरी मेलें ॥४२॥
मी अर्धांगी तुमची, तुमचें मजला न पाप भिववील ।
केलें काय तुम्ही तें सांगा, काढा मनांतला कील[21] ॥ ४३ ॥

---

१७ पाप. १९ फार. २० वाडवाग्नीनें युक्त. २१ सल.

दंष्ट्रानखरबलानें[22], क्रूरत्वानें, पलाशनत्वानें[23] ।
सिंह नरास भयंकर, सिंहीस न, तिज तसोच[24] तो माने॥४४॥
कृति तुमची मज कळवा, न तुम्ही मज तुच्छ निंद्य वाटाल ।
सर्व दशांत तुम्ही मज मानाला योग्य भाजन असाल ॥ ४५ ॥
कांहींही पाप असो तुमचें, वंद्यचि तुम्ही सदा मजला ।
तुमच्या संगें मजला स्वर्गाहुनि नरकही गमेल भला ॥ ४६ ॥
जेथें तुम्हि तेथें मी, अर्धांगीचें असेंच कर्तव्य ।
तुमच्या संगें नरकीं दाविल वसती मला त्रिदिवें[25]भव्य[26] ॥४७॥
अतिघोर परस्त्रीरत, तदधिक गोविप्रहनन हें एन ।
देशद्रोहण तदधिक, हें तुम्हि करुनिहि तुम्हासह वसेन ॥४८॥
याहुन घोरतर नसे अघ जें तुम्हि करुनि मजासि भिववाल ।
तुम्हि केलें काय वदा प्रायश्चित्तात्म ज्या नसे ढाल ॥ ४९ ॥
तुमच्या पायांची मी दासी, सोडीन मी तुम्हा न कधीं ।
तुमची संगति नसतां स्वर्ग नरकसम गणील हो मम धी" ५०
ऐकूनि मंजरीचें भाषण मंदार तिजसि हें वदला ।
मन मोकळें करुनि, " मीं माझें अघ सांगतों परिस तुजला५१
धेनूची, विप्राची, देशाची, वा न मजकडुन हत्या-।
झाली आहे, ही मम वाचा तूं जाण मंजरी सत्या ॥ ५२ ॥
ह्यांतुन पाप न एकहि, कीं त्यांचें सारिखें दुजें कांहीं- ।
केलें मी पाप, तुझ्या आण गळ्याचीच मी प्रिये वाहीं ॥५३॥
मंजरि मी केलें तें पाप असें भिन्न जाण याहून ।
मी स्वामिकार्य केलें दुर्गाधिपतीस पूर्ण चकवून ॥ ५४ ॥
यवनी वस्त्रें ल्यालों, शेंडी काढून टाकिली पार ।
गंधहि पुशिलें, झाला यवनाच्या सारखा मदाकार ॥ ५५ ॥
इतुकेंच मंजरी मी करितों तर पाप फारसें नव्हतें ।
परि संशय वाराया यवनान्नहि भक्षिलें, अभक्ष्यच तें ॥ ५६ ॥
हें अन्न न मी खातों तर कंठरुंान[27] घालिता यवन ।

२२ दाढा आणि नखें यांच्या सामर्थ्यानें. २३ मांस खाण्याच्या गुणामुळें. २४ त्या गुणांनीं युक्त असलेलाच. २५ स्वर्गाचें. २६ वैभव. २७ त्या मुसलमानानें माझें डोकें तोडलें असतें.

तत्पात्रिं सेविलें मी तत्सेवित अन्न दृढ करोनि मन ॥ ५७ ॥
केलें अभक्ष्यभक्षण शंकित मज वधिल तो म्हणुनि भ्यालों ।
उच्छिष्टहिं मी त्याचें सेवुनि मी बाटलों, पतित झालों ॥ ५८॥
धर्मांत कुटुंबाची, आत्म्याची,जातिची, समाजाची–।
स्थिति; धर्म क्षत होतां क्षत काय न मम ? मनास हें जाची५९
स्वामीच्या कार्यास्तव धर्मच्युतिरूप पाप म्यां केलें।
यवनान्नोदकसेवन करतां हिंदुत्व मम लया गेलें " ॥६०॥
ऐकुनि पतिभाषण हें त्या स्त्रीचें हृदय जाहलें हलकें ।
ज्याला पतिचें होतें अविदित अघ देत परुपतम हिसके ॥६१॥
गोविप्रदेशहत्यात्मक अघ पतिचें नव्हे असें कळतां ।
हृदय सतीचें उसळे जैसें धनु सज्ज शिंजिनी[२८] तुटतां ॥६२॥
पतिनें कृत अघ कळतां वदली हर्षें असें तयास सती, ।
"तुम्हि कल्पितां तसें हें अघ घोर न मानिते मदीय मती ६३
देशहितास्तव रिपुला वंचाया बाटणें नसे पाप ।
पय दाखवून फसवुनि पाप न बुध मानि मारणें साप॥६४॥
तुम्हि केलें तें अल्पचि अघ, अथवा अघचि तें न म्हणवेल ।
किंबहुना तें पुण्याचि, सुज्ञानें स्तुत्य वंद्य गणिजेल ॥ ६५ १
देशहितास्तव असलीं शंभर केलीं जरी तुम्ही पापें ।
तरि मज वंद्य असालच, त्यांच्या मन चिंतनें मम न कांपे ६६
ज्यास तुम्ही म्हणतां अघ तेंच तुम्हा वंद्य मम मतें करितें ।
यवना फसवाया तुम्हि केली ती युक्ति मज सुखें भरिते॥६७॥
मी स्त्री,मन्मत राहो, शिवरायाचेंच मत विचारा हो ।
शिवबास शीघ्र भेटा, जा, मी न विलंब हा शकें साहों" ॥६८
स्त्रीचा विचार कळतां मंदारा जाहला बहू हर्ष ।
त्या चातकास तो स्त्रीसुविचार नवांबुचा जणों वर्ष ॥ ६९ ॥
घेऊनि मंजरीचा मंदार निरोप तेथुनी उठला ।
शिवबा होता तेथें जायाला त्या दिशेकडे वळला ॥ ७० ॥

२८ धनुष्याची दोरी.

शिवबाची एकांतीं मंदारें गांठ घेउनि तयाला ।
वृत्त सविस्तर कथिलें अथपासुनि अनुसरोनि कालाला ॥७१॥
दाढी राखुनि शेंडी तासुनि अहिंदु मी कसा झालों ।
यवनींनीं लावुनि मज तेलें त्यांच्या जलें कसा न्हालों ॥७२॥
शंका येतां यवना सेवुनि तत्पात्रगत कसें अन्न ।
त्यास चकविलें, जरि तें सेवन हिंदूस अति अनुपन्न[२९] ॥ ७३ ॥
यवनास आपलासा केला मतिच्या कसा अवार्य बळें ।
पोटांत शिरुनि त्याचें हृद्गतही काढिलें कसें सगळें ॥ ७४ ॥
मम गोंडस आकृतिला यवन कसा पाहतांच तो भुलला ।
मम मधुर विनोदी तो संभाषणरीतिनें कसा खुलला ॥७५॥
दुर्गाच्या संस्थेंतिल चातुर्यें हुडकिले कसे दोष ,
इत्यादि वृत्त सांगुनि मंदारानें नृपा दिला तोष ॥ ७६ ॥
शिववानें हातांतिल मंदारा द्यावयास काढून—।
केलें कटक पुढारां कांचनमय पारितोषिक[३०] म्हणून ॥ ७७ ॥
तें घेउन तें सादर लावूनि शिरास ठेवुनि क्षितिला ।
मग कर जोडुनि वदला मंदार करोनि नृपतिला नतिला ७॥
"केलें मी कार्य तयें संतोषविलें तुम्हांस हेंच पुरें ।
पतिता कशास कटकें, अघभारें विभवभोगरुचिच नुरे ॥७९॥
मुकलों अभक्ष्य भक्षुनि धर्माला, जातिला, समाजाला, ।
स्त्रीला, कीं मी केलें प्रायश्चित्तचि नसे विहित ज्याला॥ ८० ॥
जाउनि येथुनि काशीक्षेत्रा, आमरण तेथ राहीन ।
न महाराष्ट्रामध्यें पुनरपि केव्हांहि कधिंहि येईन " ॥ ८१ ॥
हांसुनि शिवबा वदला, "वेडा तूं मजसि दिससि मंदारा ।
अल्प प्रायश्चित्तें जन तुज पावन करील गा सारा ॥ ८२ ॥
धर्मज्ञ सुज्ञ कथितिल तें प्रायश्चित्त घे, त्यजीं भीति ।
धर्मज्ञ सुज्ञ सांगति पतितपरावर्तना अशी रीति ॥ ८३ ॥
प्रायश्चित्त यथाविधि घेउनि तूं शुद्ध होइं मंदारा ।
मी तव पंक्तिस जेविन, येइल या विधिस मावळा सारा॥८४॥

---

२९ अयोग्य. ३० बक्षीस.

केवल देशहितास्तव, न स्वहितास्तव, करी नर अगत्या– ।
तें पाप बुध न म्हणती, ही अल्पांशेंहि उक्ति न असत्या ॥८५॥
देशाचा चालावा स्थिर योगक्षेम या विचारानें ।
केलें धर्मांतर जें तें गणिजे क्षम्यरूप विबुधानें ॥ ८६ ॥
आमुचिया देशाचे आम्हीच प्रभु, तुम्ही असा दूर ।
हें दावाया हावें, परदास्य न आर्य पथकरी शूर ॥ ८७ ॥
परकरगत ह्या भूमिस आर्य कसे पाहतील जे शूर ? ।
स्पर्शिल मातेस तया चिरुन तनय वाहविल रुधिरपूर ॥८८॥
जे आर्यधर्म बुडविति, जे तुडविति आर्यदेश निर्लज्ज ।
त्या परक्यांस असावें आपण रोधावया सदा सज्ज ॥ ८९ ॥
आगंतुक जो त्याणें यजमाना दास करुनि यजमान–।
आपण होणें हें क्षण आर्यमहीच्या सहेल तनयां न ॥ ९० ॥
आगंतुक जे परके त्यांशीं विश्वासघात पाप नसे ।
देशहितास्तव करणें कपट तयांशीं सदैव उचित असे ॥ ९१ ॥
स्वामित्व गाजवावें परक्यांनीं हिंदभूस येऊन ।
अत्रत्यांतें[३१] द्यावें दास्य, असें बघुनि होइ मन दून ॥ ९२ ॥
अपुल्या लोकांचें हें राज्य असें आपुलेंच, तें जपणें ।
हा धर्म असे अपुला, हें पुण्य असे, असेंच विबुध म्हणे ॥९३॥
पिउनि अपेय, अमेध्यांहि[३२] भक्षूनि न होतसे मनुज पतित ।
जर हें अकृत्य तो करि साधाया सन्मनें स्वदेशहित ॥ ९४ ॥
निजदेशबांधवांशीं नीत्युल्लंघन करूं नये लवही ।
कीं तें दोषार्ह असे, तें टाळा, जेंवि टाळि लोक अही ॥ ९५ ॥
सामान्य व्यवहारीं नीत्युल्लंघन जरी असे पाप ।
तरि देशांच्या रिपुशीं नीतीला हें न लाविजे माप ॥ ९६ ॥
स्वार्थास्तव शत्रूशीं सख्य करुनि देशबांधवां मारी ।
तो यमपुरीस जातां त्यास डसति सर्प संतत विषारी ॥ ९७ ॥
स्वसुखार्थ पाप करि तो नरका निम्ना जलौघसा जाय ।
सान असो कीं मोठें, पाप करो रंक कीं करो राय ॥ ९८ ॥

---

३१ येथल्या लोकांना. ३२ अपवित्र अन्न.

जी वंचना रिपूशीं केल्यानें साध्य होई देशहित ।
ती करणें क्षम्य असे, हा म्हणतो साधु मार्ग अघरहित ॥९९॥
विश्वासघात करणें, कीं खोटें बोलणें स्वदेशहितीं ।
हें म्हणिजे क्षम्य बुधें, सत्पुत्र सदैव मार्ग हा वरिती ॥१००॥
रे आपुल्या स्त्रियेला, धर्माला, जातिला, समाजाला, ।
तूं मुकलास न, कीं तूं देशाच्या जागलास विभवाला" ॥१०१॥
ह्या सरणीनें दावुनि मंदारा नीतिचे विविध भेद ।
शिवबानें लोपविला तन्मनिंचा धर्मभंगभव खेद ॥ १०२ ॥
नीती असते कैशी व्यक्तीची, नृपतिची, समाजाची ।
हें स्पष्टपणें कथिलें शिवबानें, शुद्ध मति सदा ज्याची ॥१०३॥
विवरण हें नीतिचें मंदारें परिशिलें प्रशांत मनें ।
त्याच्या प्रकाश पडला चित्तीं ह्या विवरणाचिया मननें ॥१०४॥
विस्तर कशास, रायें आमंत्रण पाठवून आणविले-।
शास्त्री पंडित, त्यांतें मंदाराचें चरित्र जाणविलें ॥ १०५ ॥
त्यांनीं विचार केला, प्रायश्चित्तप्रकार साचार- ।
निश्चित केला, झाला आनंदोदधिनिमग्न मंदार ॥ १०६ ॥
पतितपरावर्तनाविधि झाला दुसऱ्या दिनींच साचार ।
मग शिवबाला वंदुनि आला चंपापुरास मंदार ॥ १०७ ॥
शिवबाकडचें सगळें वृत्त तयें कळविलें स्वपत्नीला ।
पर्यवसान सुखाचें झालेलें बघुनि हर्ष हो तीला ॥ १०८ ॥
कोण्या एका कथिली गोष्ट मला वृद्ध मावळ्यानें ती ।
कथिली मी लोकातें, तीं मिळवो स्थान त्यांचिया चेतीं॥१०९॥
"मंदारमंजरी" नाम काव्य वामननंदनें ।
केलें विद्याधरें, त्यातें आदरावें सदा जनें ॥ ११० ॥

---

# पापी माणसाचीं कृत्यें.

## वृत्त मंदाक्रान्ता

स्कंधारूढ स्थिर बघुनिया प्रेत येतां स्मशानीं
झाला भाग्योदय मम असें डोंब चित्तांत मानी ।
डोंबा प्रेत प्रमुदित करी जेंवि नित्य स्मशानीं
तैसा दुष्टा सुजन भुवनीं घेरिला संकटांनीं ॥ १ ॥
गर्तेमध्यें जर ढकलिले साधु म्यां पुण्यशील
स्वर्गद्वारें मिळतिल मला सर्व उन्मुक्तकीळ[1] ।
ह्या आशेनें खल जन रची थोरळे गूढ पेंच,
आधिव्याधिप्रसर[2] भुवनीं होतसे ह्यामुळेंच ॥ २ ॥
जो पापी तो मलिन सरणी आदरी स्वीय कार्या,
खोटें बोले वचन, फसवी लाज सोडोनि आर्या ।
पापात्म्याची कृति असुखदा नित्य साधूंस होते,
कां पापात्मे जगिं उपजवी विश्वकर्ता अहो ते ? ॥ ३ ॥
देखों हत्या खल करि यशोमानमैत्रीधनांच्या,
शक्ता त्यांच्या न परिगणनीं शारदेचीहि वाचा ।
जी जी हत्या करि वरुनिया क्रूरचेष्टातिरेक[3]
ती ती मानी त्रिदिवपथिं[4] तो पाहिरी एक एक ॥ ४ ॥
हर्षे दस्यू[5] विपिनिं बघतां एकला अध्वनीनं[6],
हर्षे सर्प क्षुधित असतां भेक[7] देखोनि पीन[8] ।
किंवा हर्षे जळिं बघुनिया नक्र[9]ही वारणातें[10],
तैसा हर्षे खल जन सदा देखतां सज्जनातें ॥ ५ ॥
स्वार्थासाठीं खल विभुमुखोद्गीर्ण[11] चाटील लाळा,
पीयूषांची[12] विमल सरणी तीहि वाटेल त्याला ।
स्वार्थासाठीं त्यजि खल अहो आपुलीं सर्व खंत,
पापात्म्याची सतत पदवी मानिती गर्ह्य संत ॥ ६ ॥

---

१ मोकळीं; ज्यांच्या कड्या आणि अडसर काढून टाकले आहेत अशीं. २ मानसिक आणि शारीरिक दुःखांचा फैलाव. ३ निर्दयपणाच्या चाळ्यांचा अतिरेक. ४ स्वर्गाच्या मार्गांतील. ५ चोर. ६ प्रवासी. ७ बेडूक. ८ लठ्ठ. ९ सुसर. १० हत्तीला. ११ वरिष्ठाच्या मुखांतून बाहेर पडलेली थुंकी. १२ अमृताची स्वच्छ धार.

पापात्म्याचा स्तव करिल जो त्यास भीती न राहे,
पापात्म्याला धन वितरि जो त्यास तो गोड पाहे ।
पापात्म्याला वळखुनि तया जो निरोधूं धसेल
त्या दीनाला शरण न कुणी ह्या जगीं आढळेल ॥ ७ ॥
ज्याच्या पोटीं खर विष, मुखीं आज्यं[13] हय्यंगवीनं[14]
त्या कुंभाचे परि खल असें कोण बोले कवी न ? ।
मृद्वी वाणी खलजनमुखीं, द्वेष चित्तीं निगूढ,
त्या पापात्म्यावरि भरंवसा कोण ठेवील मूढ ? ॥ ८ ॥
कीर्ति प्रेष्ठा समजुनि सदा रक्षितो संत तीस
तीतें नाशी खल; वृकं[15] जसा छागलीसंततीस[16] ।
खोट्या वार्ता उठवुनि करी दुष्ट सत्कीर्तिहानी,
स्वर्लोकाची सरल पदवी तीचि तो काय मानी ! ॥ ९ ॥
साधुच्छिद्रें करुनि उघडीं थोर तो हर्ष भोगी,
ब्रह्मानन्दीं अभिरत असा तो गमे शुद्ध योगी ।
पापात्मा वाक्शर जनयशीं प्रेरितां हर्ष तैसा—
पावे काक क्षत डवचितां चंचुनें नित्य जैसा ॥ १०॥
पिंडासाठीं सतत हलवी श्वा अहो स्वीय पुच्छ,
पायीं लोळे जरि ढकलिला दूर मानोनि तुच्छ ।
पापात्माही श्वचरित करायास हो नित्य सज्ज,
स्वार्थासाठीं नरपदरजा चाटि तो वीतलज्ज ॥ ११ ॥
लावालावी करुनि बढती, लाळ घोटोनि मान,
पैसा चोरी करुनि, धनिकां शंसुनी मद्यपान ।
आत्मस्तोत्रें करुनि अनृतें श्रेष्ठपात्राधिकार,
देशद्रोहा करुनि खल तो मेळवी सौख्य फार ॥ १२ ॥
पापात्म्याला विदित असतां लोकमार्गस्थ गर्ता[17]
तो दुष्टत्वें कळवित नसे, तो खरा दुःखकर्ता ।
पापात्म्याला सतत सुखवी लोकगर्तानिपात
दैत्या जैसा मुनिवरतपीं घोर होतां विघात ॥ १३ ॥

१३ तूप. १४ कालच्या लोण्याचें म्हणजे ताजें. १५ लांडगा. १६ शेळीच्या पोरांना. १७ खड्डा.

पापात्म्याला न परिसवते पंडिताची प्रशंसा,
धिक्कारी तो अविरत[१८] नरा सर्वलोकावतंसा[१९] ।
खोट्यानाट्या पिकवित असे कीर्तिनाशार्थ कंड्या,
वंद्याचारां ठरवित असे तो सुनारींस रंड्या ॥ १४ ॥
ध्वांक्षा जेंवी पशुतनुवरी स्फोटदुर्गंधि[२०] रानीं,
पापात्म्याला सुखवि भुवनीं तेंवि सत्कीर्तिहानी ।
निंदावाक्यें जनहृदय तो पोळणें पुण्य मानी,
तेणें स्वर्गस्थिति निजकुला प्रेयसी प्राप्त व्हावी ॥ १५॥
पापात्मा जो मृदुल दिसतो मर्त्य साधुस्वभावी
त्यातें गांजी, अनवरत तो नाडि, पीडी, सतावी ।
त्याचा साधुच्छल करुनिया अंतरात्मा सुखावे,
ह्यासाठीं तो छल करितसे साधुचा सर्व भावें ॥ १६ ॥
पापात्म्याला दुरित करणें वाटतें स्वर्गदायी,
पुण्यातें तो तुडवित असे आपल्या क्रूर पायीं ।
सारे केश स्फुट गणवती गर्दभांगावरील,
पापात्म्याच्या कुटिलकृतिंची कोण संख्या करील?॥ १७ ॥
स्वार्थासाठीं खल जन करी सज्जनाची चहाडी,
पाडी दुःखीं अनृत वचनें सज्जना व्यर्थ नाडी ।
पापात्म्याशीं कधिंहि न तुम्हीं येउं द्यावा प्रसंग
ऐसें विद्याधर कथितसे, कीं न हो शांतिभंग ॥ १८ ॥

---

# गोमती नदीच्या काठीं सुचलेले विचार.

## वृत्त आर्या.

एके दिवशीं सायंकाळीं विश्रांति घ्यावयासाठीं ।
एकाकी मी बसलों होतों श्रीगोमतीचिया काठीं ॥ १ ॥
हृच्चिंता वाराया वारा या समयिं मंद वेगानें ।
वाहत होता गंधित शीतल तरुकुसुमसलिलसंगानें॥ २ ॥

---

१८ सर्वदा. १९ सगळ्या लोकांना भूषण असलेला. २० गळवाची घाण.

नीलाम्बरीं धवल घन घनदाट कुठें, कुठें विरल भारी ।
द्युति पिंजलिया होते तूलाची धरित ते मनोहारी ॥ ३ ॥
ह्या समयीं संलापा नव्हता कोणीहि मित्र मजपाशीं ।
बसलों विचार बहुविध मी आपुलियाच घोळित मनाशीं ॥४॥
झुळझुळ वाहत होतें ह्या तटिनीचें[1] अभिन्नगति[2] तोय ।
तद्ध्वनि अभिश्र अन्य ध्वनिनें कर्णास सुखद बहु होय ॥ ५ ॥
ह्याच जलानें माझें केलें सारेंच लक्ष्य आकृष्ट ।
झाले अन्य विचारें जलविषय न मद्विचार उपसृष्ट[3] ॥ ६ ॥
उगमापासून मुखापर्यंत नदीप्रवास तइं आला—।
सर्व मनश्चक्षुपुढें, त्यांताचि आत्मा निविष्ट मम झाला ॥ ७ ॥
"जल हें वाहे संतत, थांबे मार्गीं न एकही क्षण तें ।
किति दृढ निश्चय त्याचा ! एका स्थानीं कधीं न तें ठरतें ॥८॥
वाहे, वाहे, वाहे, क्षणहि न थांबे, सदैव तें वाहे ।
अधिक उणा वेग करो, परि तें वाहे सदा, स्थिर न राहे ॥९॥
ह्या न नदीचा एकहि बिंदु तटाच्या विलोकनीं रंगे ।
जाय पुढें, सारे ते गांठाया ध्येय वाहती संगें ॥ १० ॥
जलबिंदुमय नदी ही गांठाया ध्येय आपुलें वाहे ।
वाहे, वाहे, वाहे, न कशाचाही विरोध ती साहे ॥ ११ ॥
गंतव्य[4] स्थान किती जवळ असे दूर वा न ती पाहे ।
वाहे, वाहे, वाहे, संतत ती एकसारखी वाहे ॥ १२ ॥
आलीं विघ्नें मार्गीं तरि ती न ध्येय आपुलें सोडी ।
ध्येयप्राप्तींतचि तिज वाटे, दुसऱ्या कशांतहि न, गोडी ॥ १३॥
अति डोंगराळ देश न तिजला भिववुनि शके परतवाया ।
रमणीय देश तिजला मोहवुनि शके न पळहि खळवाया ॥१४॥
हा अति रमणीय असो देश विविधधान्यफलैविभवशाली[5] ।
तटिनी ह्या विभवाच्या आस्वादीं मन न आपुलें घाली ॥१५॥

---

१ नदीचें. २ ज्याच्या प्रवाहांत अडथळा नाहीं असें. ३ उपद्रव पावलेलें. ४ ज्या ठिकाणाकडे जावयाचें आहे तें. ५ नाना प्रकारच्या धान्यांच्या आणि फलांच्या समृद्धीनें शोभणारा.

प्रस्तरसंस्तरदुस्तर[६] देश असो, ही नदी न भय पावे ।
ध्येय मनीं वागवुनी ती सिंधुपतीकडे सतत धावे ॥ १६ ॥
मार्गीं पर्वत येओ, ती थांबविनाच आपुलें क्रमण ।
त्या पर्वतास पार्श्वीं टाकुनि घेऊनि जाय ती वळण ॥ १७ ॥
न नदीस पर्वताचा भिववि कडा, तशिच ती पुढें जाई ।
टाकी उडी धडाडा, साधाया ध्येय ती करी घाई ॥ १८ ॥
वाटेमध्यें येतां डोंगर साना चिरोनि ती देहा ।
वाहोनि दो प्रवाहीं जाय पुढें ती, त्यजी नचि निजेहा[७] ॥१९॥
वाटेंत जी नदी तिज भेटे तद्ध्येय तेंचि असल्यानें ।
तिजही घेउनि संगें ती जाय पुढें स्वकीय मार्गानें ॥ २० ॥
सागर मत्पति त्याला गांठुनि मज्जन्म सफल होईल ।
ह्या निश्चयें नदी ती वागे, स्तुत्यहं खचित तच्छील "॥ २१ ॥
मी गोमतीतटावरि बसलों असतां मनांत जे आले– ।
ते मम विचार काव्यस्फूर्तीनें ह्यापरी ग्रथित झाले ॥ २२ ॥
केलें अनुकरण खरें शिवबाच्या काळच्या मराठ्यांनीं–।
तटिनीचें निःसंशय, हें मित्रांनो सदैव घ्या ध्यानीं ॥ २३ ॥
तटिनीच्या अनुकरणें मित्रांनो ध्येय तुम्हिहि गांठाल ।
संततिच्या दोषाला हें तुम्हि केल्यास भाजन[८] न व्हाल ॥२४॥
" गोमती " नाम हें काव्य रची वामननंदन ।
त्यांत जें उक्त तें तत्त्व प्रेमानें आदरो जन ॥ २५ ॥

---

# मोहवी मदिरा मना.

[ दारूच्या नादीं लागलेला मनुष्य आपलें आणि आपल्या आप्तेष्टांचें नुकसान कसें करतो, हें ह्या काव्यांत वर्णिलें आहे. ]

## वृत्त विबुधप्रिया.

मोहवी मदिरा मना, नर योग्य रीतिस सोडितो,
सभ्यही पुरुषास शब्द असभ्य भाषणिं योजितो ।

---

६ धोंड्याच्या थरामुळें चालावयला कठिण. ७ आपली इच्छा. ८ पात्र.

आपुल्या सुहृदांसवें विनयास सांडुनि बोलतो,
स्त्रीसवें तनयांसवें करि वर्तणूक कठोर तो ॥ १ ॥
मोहवी मदिरा मना, नर नीति निर्मल लंघितो,
सत्य वर्तन, सत्य भाषण, सत्य चिंतन सोडितो ।
जें मिळेल तयास तें मदिरेमधें धन वेचितो,
सांचलें धन संपतां करि चौर्य, लेश न तो भितो ॥२॥
मोहवी मदिरा मना, नर धर्मबंधन तोडितो,
श्राद्धपक्ष न, हव्यकव्य न, देवधर्म न पाळितो ।
मंदधी मदिरेंत होउनि दंग तींताचि रंगतो,
धर्म विस्मरतो, सदा मदिरा पितो जरि खंगतो ॥ ३ ॥
मोहवी मदिरा मना, नर लक्षिना स्व अनामया,
व्याधिच्या मदिरा पितां लवमात्र तो न धरी भया ।
घालवी मदिरानिषेवणिं तो अनिद्र सदा निशा,
इंद्रियें विकलें[१] म्हणूनिच शून्य होति तया दिशा ॥ ४ ॥
मोहवी मदिरा मना, नर सर्व आंचवतो सुखा,
बंधु बांधव त्याचिया नच इच्छितात वधों मुखा ।
त्यास टाळिति लोक तो जणुं रक्तपीतिनिपीडित,
हाय हाय ! अशापरी दिन कंठितो जनवर्जित ॥ ५ ॥
मोहवी मदिरा मना, नर ती अहर्निश सेवितो,
तो पितो मदिरा सदा जणुं ती सुधेपरि भावितो ।
अन्न टाकुनि तो पितो मदिरा, पुन्हा मदिरा पितो,
धर्म यांतच, मोक्ष यांतच, मूर्ख तो जणुं मानितो ॥ ६ ॥
मोहवी मदिरा मना, मदमत्त मानव मोडितो—
मार्ग मंगल, आपुली मग मूर्खता जनिं दावितो ।
त्यापुढेंहि गटारतीर्थजलांत तो करि मज्जन,
धिक्करोनि तया तिरस्करितात सर्वहि सज्जन ॥ ७ ॥
जनें बोध स्मरावा कीं मोहवी मदिरा मना ।
अशी खरोखरीं आहे वामनात्मजकामना ॥ ८ ॥

---

१ दारू पिण्यांत. २ निर्बल.

# पुण्यपंक्ति.

[ हिऱ्याचा खडा जरी एकच असला, तरी त्याच्या वेगळ्या वेगळ्या पैलूंवरून वेगवेगळ्या दिशांनीं प्रकाशकिरणांचें परावर्तन होतें, त्याप्रमाणें साधु पुरुषाचे साधुत्वाचे गुण भिन्न प्रसंगीं भिन्न रूपानें दिसून आले, तरी त्या सर्वांचें प्रचोदक कारण एकच असतें. ह्या दृष्टीनें पुढील काव्य वाचिलें असतां त्यांत कांहीं विसंगतपणा नाहीं असें वाचकांना आढळून येईल ].

## आर्या.

स्वद्योतितें[१] भास्करसा, धीर अचलसा, गभीर सागरसा ।
गंगाजलौघसा शुचि, साधुपुरुष न स्तवार्ह होउं कसा ? ॥१॥
देणें पात्रिं, विपन्ना जपणें, शुचिपथ जनास दाखविणें ।
हें साधुचें कुलव्रत, येणें[२] तो सार्थ करितसे स्वजिणें ॥२॥
धन देउनि साधूला सुपथच्युत[३] जो करूं नर झटेल ।
तो वाहवूं नदीला खालुनि वरती खरोखर शकेल ॥३॥
नीट मनांत विचारुनि मग साधु करावयास कार्य सजे ।
कीं तें योग्य न करणें अनुतापा होइ अंतिं कारण जें ॥४॥
वैभवकालीं कोमल उत्पलसें साधुचें हृदय होतें ।
आपत्कालीं कर्कश होतें क्षोणीधरापरि[४] अहो ! तें ॥५॥
चित्तें, वचनें, देहें, चिंती, बोले, करी स्वदेशहित– ।
तो साधु, इहपरत्रहि[५] मनुजांत सुरांत होइ तो महित ॥६॥
साधू देशहित करी, रिपुच्या लोभाविजे न लव निधिनें[६]।
देशाच्या हाकेला हा केला द्यावयास ओ विधिनें[७] ॥७॥
देशाच्या हाकेला ओ देइल तोचि साधु म्हणिजेल ।
संकटपंकीं रुतला निज देश स्वस्थमन खल बघेल ॥८॥
साधू कोण म्हणावा ? जो निज देशार्थ देह झिजवील ।
खल कोण ? जो धनास्तव रिपुला निज देश निस्त्रप[८] विकील ॥९॥

---

१ स्वतःच्या प्रकाशानें झळकणारा. २ याच्यामुळें. ३ सन्मार्गापासून ढळलेला. ४ पर्वतासारखे. ५ ह्या लोकीं आणि स्वर्गी. ६ द्रव्यानें. ७ ब्रह्मदेवानें. ८ निर्लज्ज.

नीचाच्या संसर्गीं साधु असो, साधु नीचता न वरी ।
पंकांत पद्म असतें नित्य तरी पद्म मलिनता न धरी ॥१०॥
सत्सरणिंत साधु सदा स्थिर राहे, शैलसा महीवरती ।
भविं त्यास मोहवात्या[१] प्रहरो, हतशक्ति परतते पर ती ॥११॥
तृषिता, क्षुधिता, अधना द्यावें जल, अन्न, धन यथाशक्ति ।
हें उचित म्हणुनि तें करि साधु जरि नसे तया फलासक्ति १२
" साधुपुरुष असुधाशन[२] देव, " असें म्हणति तें न वच खोटें ।
पुण्याचरणोत्थ तया शोभवि जें तेज तें असे मोठें ॥१३॥
साधू भवसंतमसीं[३] दीप जणों मार्ग दाखवायास— ।
विधि करि, कीं इहलोकीं यात्रा होओ जना न सायास ॥१४॥
साधुसमागम लोटी दूर अघप्रवणता[४], सुकृतसरणी—।
दावी, पुरुषा लावी निःस्वार्थ मनें स्वदेशहितकरणीं ॥१५॥
साधुसमागम शुचिता, शुचिता धृति दे, धृति स्वजनभक्ति ।
ही स्वजनभक्ति मनुजा देशहित करावया विपुल शक्ति ॥१६॥
आत्मीय म्हणुनि जपला तो जरि झाला कृतघ्न तरि रक्षा ।
वाढविला निंबतरू, तो निपजो कटु, न साधु करि रक्षा ॥१७
शांतपणें साधु सहीं[५] खलकृत अपकार, हात न उगारी ।
विधिविलसितें विचित्रें दंड खलावरि पडे प्रखर भारी ॥१८॥
मंबाजी तुकयाच्या अंगावरि थुकुनि कंड तो पावे ।
छळि साधूला खल परि परिणति उलटुनि खलावरी धावे॥१९॥
परिचय पृथग्जनाशीं[६] परिणति दावी विमाननाफलक[७] ।
परि परिचय साधूशीं होत असे अंतिं सौख्यशमजनक ॥२०॥
साधुसमागम सुखकर सोमातपसा[८] सदैव सकलांस ।
परि ह्यास असे वृद्धिक्षय, वृद्धिच केवळा असे त्यास ॥२१॥
साधूच्या संगतिनें पावे साधुत्व अधम अल्प तरी ।
कार्पासगुण[९] सुमाच्या संसर्गें सुखद सौरभास वरी ॥२२॥

---

१ पापाच्या वासनेची वावटळ. २ अमृत न खाणारा. ३ संसाररूप अंधकारांत. ४ पाप करण्याकडे प्रवृत्ति. ५ सहन करी. ६ हलक्या माणसाशीं. ७ अपमान आहे फळ ज्याचें. ८ चंद्राच्या प्रकाशा प्रमाणें. ९ कापसाचा दोरा.

साधू यथार्थनामा एकादा या वर्षो मिळे जगतीं ।
साधूंमन्ये[1] शतावधि, भोंदू लक्षावधी जगीं दिसती ॥२३॥
साधूच्या रूपाचें अनुकरण अनेक लोक करितात ।
परि साधूचें पाहों अत्यल्पांशें स्वरूप त्यांच्यांत ॥२४॥
भगवीं वस्त्रें लेउनि, राखूनि जटा न साधु नर होतो ।
हावी चेतःशुद्धी, बाहेर कसाहि कां नर असो तो ॥२५॥
अनयपथानें चाले दुष्ट म्हणुनि कष्ट भोगितो अंतीं ।
गेली घडी न येई, निष्फल मग त्यास वाटली खंती ॥२६॥
कपिभल्लुकसाहाय्यें[2] रामें जिणिला दशानन सलील ।
साधुत्वलेशविरहित होता तो यातुधान[3] दुःशील ॥२७॥
बोधी साधु जया तो क्षुद्र गणी स्वसुख हा नर पदार्थ ।
शिव[4] रामदासबोधें राज्य करी जनसुखार्थ, न स्वार्थ ॥२८॥
साधु सदा सकलांना सुचवुनि सरणी सुयोग्य सुखवितसे ।
ती सरणी अवलंबिति काम तयांचा फलाढ्य होत असे ॥२९॥
दर्शनही साधूचें सत्याचा उचलवी नरा पक्ष ।
शिववास भेटतां क्षणिं झाला जगदेव देशहितदक्ष ॥३०॥
देशद्रोह गळाला, देशप्रेमा तयाचिया स्थानीं–।
आला तिरुमलमनीं शिवसहवासें असें पडे कानीं ॥३१॥
परक्याचा चर[5] हरजी आला शिवराज्यरीति हेराया ।
देशद्रोह गळुनि तो पडला शिवभक्त होउनी पायां ॥३२॥
जो आश्रयार्थ जाई साधूला शरण तो लहे काम ।
येतां शरण विभीषण लंकेचें राज्य त्यास दे राम ॥३३॥
निजदेशहितासाठीं स्वार्थ उपेक्षून साधु खटपटतो, ।
क्षणभंगुर लाभास्तव विकितो निजदेश शत्रुला खल तो ॥३४॥
सत्संग चिरडितो परभाव जसा नृहरिमंत्रजप भूत ।
सत्संगजल क्षालुनि अघमल करि चित्त तूर्ण परिपूत ॥३५॥
साधूला क्षोभविणें, वायूला रोधणें गगनकोणीं, ।
वृषभास दोहणें वा, हें केलें आजवर वदा कोणीं ? ॥३६॥

---

१ स्वतांला साधु समजणारे. २ वानर आणि आस्वल यांच्या मदतीनें. ३ राक्षस.
४ शिवाजी. ५ हेर.

खलकृत अपकारानें स्पष्ट नराचे जनास गुण दिसती ।
कल्पकता-विद्वत्ता-मतिमत्ता-सहनशीलता-प्रभृती ॥ ३७ ॥
कल्पकतेचें यश शिवराया देई अविंधकारा[1] ती ।
अनलीं पडतां कालागुरु तत्सौरभ समीरण वहाती ॥ ३८ ॥
साधू दरिद्र तरिही अनघपथप्रवण[2] तो सदा राहे ।
पंडितशिरोमणीही साधु असुनि गर्व तो न लव वाहे ॥ ३९ ॥
आत्मीयांचें रक्षण हा क्रम जो साधु तो सदैव वरी ।
प्रेमें दंडी त्याला, परि साधु न दे तया विपक्षकरीं[3]॥ ४० ॥
पुण्यें पापें करुनी स्वर्ग नरक मिळवितात साधु खल ।
जैसें चरित्र ज्याचें तैसें तो अनुभवी यथार्ह फळ ॥ ४१ ॥
उगवेल कमल गिरिवर, कीं जर वेलेस सिंधु लंघील ।
तर साधु दिल्या वचना कीं स्वीकरिल्या व्रतास सोडील ॥४२॥
रामास सत्यसंधें[4] पाठविलें दशरथें निबिड गहना ।
यश न मळविलें त्याणें आपुलिया लंघुनी अहो ! वचना॥४३॥
साऱ्याही व्यवहारीं साधुत्वाला असेचि अवकाश ।
साध्वाचरणें साऱ्या विपदांचा त्वरित होतसे नाश ॥४४॥
वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, वा राजकीय, नैतिक वा ।
व्यवहार असो कांहीं, साधुत्वा विषय, दावि तो विभवा॥४५॥
साधुत्व प्रकटाया अवकाश न राजकारणांत मिळे ।
हें वचन, अलीक, अनृत, आधारविहीन, भासरूप, शिळें॥४६
राजव्यवहारीं न स्थल साधुत्वा असें म्हणूंच नका ।
प्रभुला प्रकृतीलाही साधुत्वविभंग नेतसे नरका ॥४७॥
साधूच्या सर्व गुणां होणें आधार जरि नसे सुकर ।
तरि साधूचे कांहीं गुण अंगीं यावया झटोत नर ॥४८॥
ही " पुण्यपंक्ति " तुमच्या चित्तीं स्थिर पद करोनिया राहो ।
तन्मननें होउ तुम्हां शांतीचा इहपरत्रही लाहो ॥४९॥

---

१ औरंगजेबाचा तुरंग. २पापाच्या मार्गाकडे न वळलेला. ३ शत्रूच्या हातीं. ४ खरी आहे प्रतिज्ञा ज्याची.

अनुष्टुभ् छंद.

रचिलें " पुण्यपंक्ती " हें काव्य वामननंदनें ।
तें लोकां मार्ग दावूनी त्यांचीं आनंदवो मनें ॥५०॥

---

## श्री शारदा

[ श्री ही संपत्तीची देवता आणि शारदा ही विद्येची देवता. ह्या दोघींच्या सामर्थ्याची तुलना ह्या काव्यांत केली आहे ].

वृत्त सौदामिनी.

समर्था महीमंडलीं श्री खरी, दुजा वस्तुला ये न तीची सरी[1] ।
जरी शारदा श्रेष्ठ आहे गुणीं तरी श्रीहुनी मानिजे ती उणी ॥ १ ॥
सदा श्रीस लाधे अरुद्धा[2] गती नदी काय वर्षर्तुकालीन[3] ती ।
परी शारदेला मिळेना स्थल, तिचा सर्व ठायीं सदा हो छल ॥ २ ॥
धनें जो असे आढ्य तज्जल्पना जनें भाविजेतात सत्कल्पना ।
जनीं शारदा पावते तुच्छता जरी तद्वचें पावनें[4] तत्वता ॥ ३ ॥
धनें आढ्य तो कर्कशा गी वदे, तया मञ्जुतेचें जन श्रेय दे ।
जरी सूनृता गी[5] वदे शारदा तरी ती तिरस्कार पावे सदा ॥ ४ ॥
धनें आढ्य तो वक्रता आदरी, जनीं स्तोत्र[6] " सारल्य त्यातें भरी "
विपर्यस्त[7] सारल्य वा वक्रता भरी विस्मयें मन्मना तत्वता ॥ ५ ॥
जयीं श्री समृद्धा तयाच्या गुणा इयत्ता[8] न ऐसें न वाटे कुणा ? ।
कुलीनत्व, पांडित्य, वेद, स्मृती वसे, शास्त्र, विद्या तया संगतीं ॥६॥
वदो श्री कुठेंही असत्या गिरा तिची सत्यता शैलमूलास्थिरा ।
श्रुतीनें, स्मृतीनें विरुद्धा जरी तरी श्रीगिरा मानिजे ती खरी ॥ ७ ॥
त्रपा[9] श्रीसमृद्धीं दिसेना लव शशाचे शिरीं जेंवि शृंगोद्भव[10] ।
जरी नग्न होओनि तो नाचला तरी लोक वानी सदा त्याजला ॥८॥

---

१ बरोबरी. २ ज्याला कांहीं अडथळे नाहींत असें गमन. ३ पावसाळ्यांतील. ४ पवित्र. ५ वाणी, भाषण. ६ स्तुति, प्रशंसा. ७ उलट्या अर्थानें योजलेले. ८ सीमा, मर्यादा. ९ लाज. १० शिंग उगवणें.

जया श्री कृपादृष्टिनें पाहते तयाचेकडे श्रेष्ठता वाहते ।
कितीही असो मूढ वा मूर्ख तो, जनीं आदरा होतसे पात्र तो ॥ ९॥
करी वास ऋद्धी जयाचे घरीं तयाचे घरीं सिद्धि पाणी भरी।
मनीं कोणताही धरो काम तो, बघों नित्य साफल्य तो पावतो ॥१०॥
असे जो धनें आढ्य त्याच्या कृती जना ऐकियेल्या करीती कृती[11]।
जरी सर्वसामान्य त्या तत्वतां तरी पावती त्या जनीं मान्यता ॥११॥
कृपादृष्टिनें श्री जयातें बघे तयीं भाविजेतीं न लोकीं अघें ।
जरी तो करी घोर हत्या तरी सदा कौतुकें लोक त्याचीं करी ॥१२॥
धनाढ्याचिया दारुणा दुष्कृती जना पुण्यशीलत्वजा वाटती ।
करो ब्रह्महत्या, पिओ वारुणी[12], धजे त्या न निंदावयाला कुणी ॥१३॥
पराची हरो स्त्री धनें आढ्य तो जना क्षम्यसा तो सदा वाटतो ।
परस्वौ[13] हरो गर्ह्य मार्गे, तया न कोणी सजे मर्त्य निंदावया ॥१४॥
धनाढ्यें सुखें लाच खावा तया उठेना कुणी लोक निंदावया।
दरिद्रा पचे लाच हें होइना, क्षमा त्यास कोणी कधीं दाविना ॥१५॥
असत्यास सत्यत्व दीजे धनें, असत्यत्व सत्यास त्या साधनें ।
असत्यत्व सत्यत्व कीजे धनें, बडा कीमया मानिजे हा जनें ॥१६॥
धनें आढ्य जो त्याचिया मत्सरा चढाओढ हा शब्द लागे बरा ।
म्हणे लोक" तो व्हावया स्वोन्नती झटे; वृत्ति त्याची प्रशस्या अती १७॥
धनें आढ्य तो जारिणापुत्रही सुवंश्यत्व पावे, खरी गोष्ट ही ।
तयीं मिश्रबीजत्व पावे लय; नसे तीर्थतोयीं अघाला भय ॥१८॥
धनें आढ्य तो गौलि[14] देई तरी म्हणे लोक "त्याच्या दया अंतरीं ।
तयाची क्रुधी[15] पाहिजे न स्थिरा, उद्या शांत होईल तो साजिरा"१९
धनें आढ्य इच्छी धना आणिका, अधाशीपणा दावितो तो निका ।
अधाशीपणा लोक त्याचा म्हणे असे दानकामें[16], वृथा बोलणें ॥ २० ॥
मदोन्माद उत्पन्न जी श्री करी तदन्वेषणेच्छा धरा नांतरीं ।
तुम्हा शांतिदा, कामदा, सौख्यदा सदा तीच होईल हो शारदा ॥२१
झटा मेळवूं शारदेची कृपा करोनी उदंडा प्रयत्ना तपा ।
तुम्ही सौख्य पावाल कीं थोरसें न जें द्यावया श्री समर्था असे॥२२॥

---

११ धन्य. १२ दारू. १३ लोकांचें द्रव्य. १४ शिव्या. १५ त्याचा राग फार वेळ टिकणारा असा दिसत नाहीं. १६ दानधर्म करण्याच्या बुद्धीनें.

बहू गांजिलों, ताडिलों, नाडिलों धनाढ्या खलांहीं, उगा पीडिलों ।
तरी शारदेच्या कृपेनें मला सुखाचा बरासा निधी लाधला ॥ २३ ॥
नको श्री, पुरे शारदेची कृपा; उमासूनु[17] टाकील[18] मागें नृपा ।
शमा शारदा शुद्ध देई जया तया श्रीकृपा पाहिजे कासया ? ॥ २४ ॥

श्री शारदाकवन वामननन्दनास—
विद्याधरास वितरो शम; नान्य आस ।
लोकांसही सुखद तें नववृत्तरम्य[19]-
हो; तद्विचार न नवे, जरि वा अगम्य ॥२५॥

---

# स्पृश्यास्पृश्यनिरूपण.

## ( शिवाशीव )

[रोटीबेटी ह्या व्यवहारामध्यें **स्पृश्य** आणि **अस्पृश्य** हा विचार करावा; परंतु सार्वजनिक कामांत विटाळ मानूं नये असे विचार ह्या काव्यांत कवीनें ग्राथत केले आहेत.]

वृत्त आर्या

संहतिनें[20] देशाचीं जीं कार्यें देशभक्त करितात ।
तीं करितां ते स्पृश्यास्पृश्यत्व[21]विचार नाणिति मनांत ॥१॥
रोटी बेटी देतां घेतां निर्बंध[22] जातिचे पाळी ।
परि मूल्य तयां इतर व्यवहाराच्या न साधु दे काळीं ॥२॥
मी ब्राह्मण तो अंत्यज, त्याचा स्पर्शहि नको मुळींच मला ।
हें आजवरि कधींही ब्राह्मण न म्हणावया दिसे सजला ॥३॥
देशाचीं करितांना कार्यें धरि देशभक्त न विटाळ ।
हिंदू सारे एकचि, सारे ते हिंदभूमिचे बाळ ॥४॥

---

१७ विद्याधर कवि. १८ राजे लोकांहून अधिक सुख पावेल. १९ सौदामिनी नांवाच्या प्रचलित नसलेल्या वृत्तामुळें रमणीय. २०जूट,एकोपा. २१शिवाशिवीचा विचार. २२ नियंत्रणा.

अस्पृश्यां वगळुनि जो देशाच्या भा[1]कीं झटेल नर ।
तो अन्नातें पचवूं पाहेल असोनि रु[2]णही जठर ॥५॥
सगळ्याही जातींच्या ऐक्यानें देशकार्य साधेल ।
नसतां पुरोहितादिक यजमान न मखफ[3]लास पावेल ॥६॥
अंत्य[4]जपथकें होतीं शिवबाच्या वाहिनीमधिं अनेक ।
शिवला कधीं तयाच्या मूर्खपणाचा मनास न विवेक[5] ॥७॥
अंत्यज सैनिक घेउनि लढला यवनांविरुद्ध शिवराया ।
स्पृश्यास्पृश्यविचारा अवसर न दिला तयें मनिं शिराया॥८॥
सामान्य शत्रु आला चाल करुनि त्यास दूर साराया ।
शिवबानें कास कसुनि साऱ्या हिंदूंस जुळविलें याया ॥९॥
मूर्खपणाचा केला त्यानें न विवेक, सर्व सम त्याला ।
सर्वां जुळवुनि नेलें देशाचें नष्टचर्य विलयाला ॥१०॥
हा अंत्यज मी ब्राह्मण, देशहित बुडो, शिवेन मी न तया ।
हें न म्हणेल ब्राह्मण देशहितीं काळजी पवित्र जया ॥११॥
देशाचें हित करितां ब्राह्मण अंत्यज असा नुरे भेद ।
हा भेद केलियानें देशहिताचाच होइ विच्छेद ॥१२॥
समरीं ब्राह्मण अंत्यज दंडाला दंड लावुनी प्रेमें – ।
लढले, लढती, लढतिल, देश अशानेंच भरतसे क्षेमें ॥१३॥
सार्वजनीन सभास्थलिं समरीं संकटिं समान सगळेच ।
समजून शिवाजीनें देशाचा दूर सारिला पेच[6] ॥१४॥
हिंदूहिंदूमध्यें शिवबानें भेद आणिला न मनीं ।
सर्वां समान समजुनि झाला तो आदरास पात्र जनीं ॥१५॥
दास्य[7]भुजंगास्यक्षुरभुज वंद्य तुम्हास शिव असेल जर ।
तर तत्पथानुसरणीं[8] वाटावी कां बरें तुम्हा कचर ? ॥१६॥

---

१ हित, कल्याण. २ रोगिष्ट. ३ यज्ञाच्या पुण्याला. ४ महारांचीं सैन्यें. ५ भेदाची भावना. ६ कठिण दशा. ७ परवशतारूपी सर्पाच्या तोंडाला कुऱ्हाडी-प्रमाणें आहे बाहु ज्याचा असा शिव म्ह० शिवाजी. ८ त्याच्याच सरणीनें चालावयाला.

या जवळिं अंत्यजांनो, कचरूंच नका, तुम्ही अम्ही एक ।
साधूं देशहितातें, सत्प्रेमाचा न शक्य अतिरेक ॥१७॥
प्रेमानें एकवटुनि सहवीर्य करोनि देशहित साधूं ।
देशहिताच्या कामीं न विटाळा स्थान वितरिती साधू ॥१८॥
स्पृश्यास्पृश्य, शिवाशिव, वर्ण अधम उन्नतम, असा भेद ।
देशाहितीं नुरतो हें तत्त्व शिकवितात आपणा वेद ॥१९॥
स्पृश्य गणा अंत्यज, ह्या स्पृश्यत्वांतुनि निघेल सहवास ।
प्रेमहि सहवासांतुनि, त्यांतून निघेल गाढ[3] विश्वास ॥२०॥
विश्वासांतुनि ऐक्य स्थिर, साहाय्यस्पृहा[4] तयांतून ।
तींतूनि देशकार्यप्रगति यिभवमार्गिं होइल अनून ॥२१॥
धिक् त्यां नरां करिति जे उच्चावचैवर्णभेद[5] देशहितीं ।
धिक् त्यां नरां शिवाशिव देशाहितीं जे मनांत दृढ धरितीं२२॥
ह्या स्पृश्यास्पृश्यत्वा[6] भूता प्रेमें नृसिंहमंत्रेंच ।
सहवीर्य करुनि पळवूं, देशाचा दूर सारुं या पेच ॥२३॥
जो मांगाला भाऊ, धेडाला बाप, वैदुला मुलगा !
समजे देशाहिताच्या कामीं तो देशभक्त, तद्यश गा ॥२४॥
स्पृश्यास्पृश्यविचाराचें निरूपण करी कवी– ।
वामनात्मज, तें लोकां मार्गदर्शक हो भवीं ॥२५॥

---

# वेलावेदन

[ योग्य वेळीं योग्य गोष्ट केली पाहिजे असा बोध ह्या गोष्टींत केलेला आहे. वेला म्हणजे योग्य वेळ आणि वेदन म्हणजे ओळखणें. ]

वृत्त उपजाति.

गोदावरीच्या तटिं खेळ नाना एके दिनीं बालक खेळतांना ।
दुर्दैवयोगें निसरोनि पाय निमग्न झाला जलिं हाय ! हाय ! ! ॥ १ ॥

---

३ बळकट. ४ एकमेकांना मदत करण्याची इच्छा. ५ हा वरच्या जातीचा आणि हा खालच्या जातीचा असा फरक. ६ शिवाशिवचा विचार हाच कोणी भूत (पिशाच), त्याला प्रेमरूपी नृसिंहमंत्रानें एकोप्यानें हांकून लावूं आणि देशाची दुःस्थिति नाहींशी करूं.

केले तयें यत्न तटास याया, ते किन्तु गेले सगळेच वायां ।
होणार आतां मम जीवनाश म्हणोनि दुःखें रडला हताश ॥ २ ॥
जलोपकंठद्रुममूल[1] त्याला लाधोनि दैवें मृत तो न झाला ।
तो राहिला मूळ धरोनि हातीं, जलीं तयाची स्थिति कष्टदा ती॥३॥
हाका तयानें बहु मारिल्या हो " माझा नका हो ! जन अंत पाहों ।
या, लोक हो, सत्वर येथ, पावा ! तारा मला देउनि हात धावा! ॥४॥
जलांत मी वास शकें न साहों, या, या, त्वरेनें जन शीघ्र, या हो ! ।
कालव्यया व्यर्थ करूं नका हो ! जलामधीं मी न शकेंच राहों "५॥
आक्रोश ऐसा परिसोनि आला कोणी महापंडित त्या स्थलाला ।
परंतु द्याया कर तो मुलाला हा हंत ! हा हंत ! ! न सिद्ध झाला ॥६॥
तयास तो बालक पाहतांची साहाय्य दीनस्वरपूर्व[2] याची ।
" बाहेर काढा मजला, चला, या ! व्हा सिद्ध साहाय्य मला कराया७
घाला उडी, या जलिं, शीघ्र या, या ! हें याचितों दीन पडोनि पायां ।
करा कृपा, द्या मज शीघ्र हात, नाहीं तरी मी मरतों जलांत " ॥८॥
ऐकोनि तो पंडित याचना ही कठोर दृष्टी वळवोनि पाही ।
न युक्ति बालोद्धरणा[3] करून राहे विलोकीत तटावरून ॥ ९ ॥
बोले तया पंडित उग्र ऐसें, " त्वां मौर्ख्य केलें मज सांग कैसें ? ।
पोहावया येत तुला नसून आलास कां धाष्ट्र्य इथें करून ? ॥१०॥
तूं वाटसी मूर्ख मुला ! अतीव, झाला नकोसा तुज काय जीव ? ।
आलास केल्याविण कां विचार करावया या स्थलिं तूं विहार ? ११।
विचार केल्याविण कोणतेंही करील जो बालिश कृत्य देही[4] ।
तो देहविध्वंस फलास भोगी, सिद्धांत ऐसा कथितात योगी ॥१२॥
तटावरोनी जल पाहिल्यानें पोहावया येइल या भ्रमानें ।
घेई उडी जो जलिं तो जळीं न घेई यमाच्या मुखिं बुद्धिहीन ॥१३॥
पोरा ! तुवां बालिश कृत्य केलें त्याचेंच ऐसें फल हें उदेलें ।
हें भोग आतां फल पोरट्यारे ! कीं चित्तिं तूझ्या न विवेक थारे १४

---

१ पाण्याच्या कांठावरील झाडाचें मूळ. २ केवीलवाण्या आवाजानें. ३ मुलाला बाहेर काढण्यासाठीं. ४ माणूस. ५ मूर्खपणाचें.

पोहावया येत तुला नसून खेळावयाला इकडे धरून– ।
कशास आलास धरून हूप? हा खेळ पोरा तव मृत्युरूप ।। १५ ।।
आम्रेडितानें[६] गुरुतुल्यतेला[७] पोरा ! कधीं बालिश सांग गेला ।
सामर्थ्य अंगीं नसतां उगाच झटेल तो भोगिल दुःख साच ।।१६।।
अशक्त जो चेतवितो बळीला तो मूर्ख; तो भोगि विपत्ततीला[८] ।
येथें विहारास्तव पातलास, आतां उगा ओरडसी कशास ? ।।१७।।
पोरा, न पोहूं शकतां जलांत उडी विहारास्तव घालितात ।
ते मंत्र वा औषधि नेणतांच भुजंगपुच्छावरि देति टांच ।। १८ ।।
भुजंग मंत्रौषधि नेणत्यानें न कोपवावा; शुभ होइ यानें ।
नसोनियां बाण धनुष्य हातीं न शहाणे व्याघ्रबिलांत जाती ।।१९।।
कठोर खाया चणकों[९] कधीं न इच्छील तो जो नर दंतहीन ।
जलीं न तो ये विहरावयास पोहावया येत नसे जयास ।। २० ।।
अज्ञात जो शब्द कधीं न बोले, अज्ञात रागावरि[१०] जो न डोले ।
अज्ञात मार्गीं न शिरे अकालीं तो मानिजे पूर्णविवेकशाली ”।।२१।।
वक्तृत्व हें ऐकुनि बाळ गागे, साहाय्य आत्मोद्धरणार्थ मागे ।
रुचेल कैसा मरणोन्मुखास अस्थानेबोध[११] ? प्रिय तो न त्यास।। २२।।
म्हणे, “ पुरे, बोध करूं नका हो, बाहेर काढा, मरतों उगा हा !
द्या हात, ओढा मजला तटास, हें याचितों जोडुनि मी करास”२३।।
संज्ञाप हा ऐकुनि त्या स्थलाला कोणी अडाणी परि सुज्ञ आला ।
त्याणें उडी घालुनि तत्क्षणास बाहेर तो आणियला तटास ।। २४ ।।
पित्याकडे बालक पोचवीला, आनंद त्याला बहु चाखवीला– ।
ह्या कालवेत्त्या[१२] पुरुषें; तयाला कृतज्ञ हा तात वदे वचाला ।। २५ ।।
“माझ्या मुला वांचाविलें तुवां रे ! दया तुझ्या फार मनांत थारे ।
झाले तुझे हे उपकार थोर, त्वां वाचविला मम आज पोर ।।२६।।
झाला पुनर्जन्मचि मत्सुताचा, विमोक्ष[१३] होई न तुझ्या ऋणाचा ।
तथापि ह्या अल्प धनास घे तूं, होओ तुला हें धन सौख्यहेतू[१४] ।।२७।।

---

६ तोतरें किंवा आडखळत भाषण. ७ बृहस्पतीच्या योग्यतेला. ८ संकटांची परंपरा. ९ हरभरे. १० गायनाची धाटणी. ११ भलत्याच वेळीं केलेला. १२ योग्य वेळ जाणणाऱ्या. १३ फेड. १४ सुखाला कारण.

त्वत्कृत्यमानें धन अल्प आहे, नको अव्हेरूं तरि, घे अतां हें" ।
वदोनि ऐसें धन वोपियेलें, कृतज्ञतेला बहु दावियेलें ॥ २८ ॥
कृतज्ञता यापरि दाखवून निरोपिला तो जनकें नमून ।
गेला गृहा तुष्ट सुवर्णदानें, सत्कृत्य त्याचें स्तविलें जनानें ॥ २९ ॥
अप्रासंगिक बोध जो करिल तो लोकामधें निंदिजे,
साहाय्य द्रुत जो करील समयीं तो सज्जनें वंदिजे ।
हें लोकां कळवावयास्तव कथारूपें अती अल्पसें
'वेलावेदन' नाम काव्य रचिलें विद्याधरें हें असें ॥ ३० ॥

---

# गुलाबाच्या फुलाचें भाषण.

वृत्त आर्या.

फिरतां मी उद्यानीं पडला संवाद माझिया कानीं ।
तो कळवितों जनांतें जाणुनि होईल बोधद तयांतें ॥ १ ॥
बघुनि गुलाबा त्यातें धिक्कारुनि बोलला नर वचातें ।
" तूं कुसुमजातिलांच्छन, तव दुष्टत्वें विषण्ण होइ मन ॥ २ ॥
तुज पाहूनि गुलाबा येतो अतिशयित कोप मजला बा ।
न दिसेल फुला तुजसम कोणी कोठेंहि दुष्ट वा अधम ॥ ३ ॥
जनसुख भंगुनि तुजला होतो आनंद फार फार खला ।
रूपें मोहविसि परी जाउं न इच्छिसि कुणाचियाहि करीं ॥ ४ ॥
तुज तोडूं सरसावें जो रूप तुझें बघेन या भावें ।
कंटक बोचून तया पावसि आनंद रे सुमा अदया ॥ ५ ॥
घ्याया तव वास तुला जर कोणीं तोडिलें जपून फुला ।
तर पाकळ्या भराभर गाळिसि कुसुमा समस्त भूमिवर ॥ ६ ॥
ही दुष्टता कितितरी ? येईल कुणासही तुझी न सरी ।
तव वसति योग्य रानीं, योग्य न तूं यावयास उद्यानीं" ॥ ७ ॥
हें वचन त्या नराचें परिसुनि सुम बोललें गुलाबाचें ।
" सजलास कसा द्याया दोष मला जो वसे तुझ्या ठाया ॥८॥

अधम खुशाल मला म्हण, परि सौजन्य न तुम्हा नरांत कण ।
नर दिसति अधम मातें, गणितों मी अदय सर्वहि नरातें ॥ ९ ॥
स्वसुखास्तव नर तोडिति कुसुमें, त्यांच्या न लक्ष्य देति हितीं ।
सुंदर असतां हातीं धरुनि सकौतुक सुमें नर पहाती ॥ १० ॥
तद्गंधाहि नर घेती परि सुकतां स्थान अवकरीं देती ।
जों वस्तु सुखद तोंवर आदर, मग तुच्छ लेखितात नर" ॥११॥
"सुमोक्ति" नाम हें काव्य रची वामननंदन ।
अन्योक्तिरूप बोधें तें जनांचें तोषवो मन ॥ १२ ॥

---

# शंकातंक.

[विश्वाची रचना व व्यवस्था पाहून कवीच्या मनांत ज्या शंका किंवा प्रश्न उद्भवले, त्यांपैकीं कांहींचें दिग्दर्शन पुढील काव्यांत केलें आहे.]

वृत्त मन्दाक्रान्ता.

विश्वोत्पत्ति प्रगुण न कळे, नाकळे[1] विश्वरूप,
आतप्रोत स्फुटतर जयीं भेदसाम्यें अमूप ।
होई विश्वाकलनविषयीं[2] कुण्ठिता धी नराची,
जिज्ञासा ती परि नचि शमे मोघ होतांहि त्याची ॥ १ ॥
कोणासाठीं अतुल कवणें मांडिला हा पसारा ?
केव्हां कैसा श्रमजनक तो वाहतो व्याप सारा ? ।
हें जाणाया सतत झटले आजवेरी न थोडे,
विश्वाचें हें परि उकललें थोर कोणा न कोडें ! ॥ २ ॥
कां धात्यानें प्रथम जगडव्याळ हें विश्व केलें ?
कां तें केल्यावरि न तदवस्थानिं[4] तच्चित्त ठेलें ?
कोठें गेला ? दडुनि बसला कोणत्या स्थानिं धाता ?
त्या स्थानीं तो बसुनि करितो काय तो कार्य आतां ? ॥ ३ ॥

---

१ जाणता येत नाहीं. २ विश्व जाणण्याच्या कामीं. ३ निष्फळ. ४ तें नीटपणें चालावें यासाठीं.

कां धात्यानें भुवन रचिलें हें असें दोषयुक्त ?
त्याचे हेतू शुचि अशुचि वा कां असावे अनुक्त[1] ?
लाखों वर्षे नर झटतसे हेतु ते आकळाया,
त्याचे सारे परि अजवरी जाहले यत्न वाया ॥ ४ ॥

ज्यांच्या चित्तीं अघ अवकरीं[2] जेंवि मूत्रास्थिविष्ठा[3]
त्यांतें लोकीं धन मिळतसे ऋद्धि, सिद्धि, प्रतिष्ठा ।
ज्यांच्या चित्तीं दुरित[4] लवही थारले[5] आढळेना
त्यांना चिन्ता छळिति, विपदा गांजिती कां कळेना ॥ ५ ॥

पुत्राभावें विपुल धन तें जाय नाशा नराचें,
यद्विस्तारें धनदहृदयीं[6] घोर मात्सर्य डाचे ।
पोरें त्याला विपुल असती ज्यास ठावा न पैसा,
सांगा मातें अदय विधिचा वक्र हा मार्ग कैसा ॥ ६ ॥

भक्ति प्राज्या[7] हृदयिं वसते त्यांस दुःखें अपार,
जे पाखण्ड स्खलितनय[8] ते पावती सौख्य फार ।
ही भोगाची विषम सरणी कां दिसावी जगांत,
ही मच्छंका लवभरि विचारान्ति नाहींच जात ॥ ७ ॥

कोठें कान्ता निजपतिचिया अर्पिते बाहु कंठीं,
कोठें बाला रडुनि विधवा आपुलें आयु कंठी ।
संसारीं कां न अनुभविती सर्व नारी सुखातें,
ह्या भेदाचा नर उलगडा कोण सांगेल मातें ? ॥ ८ ॥

कोठें वीणा सुखवित असे श्रोतियांतें स्वरांनीं,
हा ! हा ! ऐसें रुदन पडतें घोर अन्यत्र कानीं ।
ऐकायाला ध्वनि मधुर कां येत सर्वत्र नाहीं ?
हें सांगावें मजसि गहन ज्ञान सुज्ञां नगांहीं ॥ ९ ॥

नारी एका सुमधुरतनू मोहवी सर्व लोक,

---

१ न सांगितलेले; गूढ. २ उकिरडा. ३ मूत--हाडें-मळ. ४ पाप. ५ राहिलेलें. ६ कुबेराच्या चित्तांत. ७ पुष्कळ. ८ नीतिभ्रष्ट.

अन्या·नारी पतिहि न बघे कीं तिला थोर पोकें[1] ।
रम्या साऱ्या त्रिभुवनिं अहो ! कां स्त्रिया जन्मती न ?
हें जाणाया परिमितिमती[2] ही समर्था मती न ।। १० ।।
निंदा कोणी परिशिति नर क्षीणलज्जे[3] स्व कानें,
निंदा कोणी करिति नर हो ! स्वें मुखें कौतुकानें ।
पाहों येथें नर बधिर जे, मूक जे भाग्यहीन,
देवस्तोत्रश्रवणपठना जे करों जाणती न ।। ११ ।।
एका नारी मुदितहृदया पाहते पुत्रकेली[4],
अन्या वन्ध्या सुतमुखसमालोकसौख्या[5] भुकेली ।
साऱ्या नारी तनयतनयालब्धिनें कां न तुष्ट ?
कांहीं·नारींवरि भुवनिं या दैव कां होइ रुष्ट? ।। १२ ।।
देखों लोकीं सुखरहित ती स्त्री जिला पुत्र एक,
तीही शोका करित बसते पुत्र जीला अनेक ।
बोला साम्य स्थितींत नसतां कार्य कां एक तें हो ?
आहे जी ती स्थिति असुखदा कां जनाला गमे हो ? ।। १३ ।।
कोठें नाचे जनक भवनीं पुत्रजन्मप्रहर्षें,
कोठें देखों तनयमृतिनें तात शोकाश्रु वर्षे ।
ताताआधीं तनय मरती कां कळेना मला हें,
दीर्घायुष्यें सहित न सुता कां पिता सर्व लाहे ? ।। १४ ।।
कोठें ऊर्णावसन करितें सह्य हेमन्तकाळ,
कोठें काष्ठावसन[6] पुरुष क्लेश भोगी कराळ[7] ।
सर्वांना कां पट न मिळती शैत्य वारावयाला ?
ह्या भेदा कां स्थल भुवि मिळे ठाउकें हें कुणाला ? ।। १५ ।।
पक्वान्नांचा विपुल दिसतो एकगेहांत राशी,
अन्नभावें शतमित[8] नर प्रेक्षितों कीं उपाशी ।

---

१ कुब्ड. २ समर्याद. ३ निर्लज्ज. ४ आपल्या मुलांची क्रीडा. ५ पुत्रमुखावलोकनाचा आनंद. ६ अंगावर मुळींच वस्त्र नसलेला. ७ भयंकर. ८ शेकडो.

सर्वांना कां अनुपरिमिती[1] अन्न लाधे न खाया ?
ह्या प्रश्नाचा क्षम उलगडा कोण आहे कराया ? ॥१६॥
देखों दुष्ट द्रविण दुरितद्रोणिकादाय[2] दावी,
भोगी भाग्यें भवनिं, भविकां[3] भोग्यभांडार भावी ।
निःस्वां[4] नानानिकृतिनिहतां[5] नीतिमन्तां नरांतें;
ह्या भेदाचा नर उलगडा कोण सांगेल मातें? ॥ १७ ॥
देखों झाकी मलिन सरणी आपुली वावदूक,
निंदा ऐके अमलिनही तो जो समाभीतिमूक ।
जिव्हा त्याची गळुनि न पडे जो अघा पुण्य दावी,
हें कां व्हावें ? अनघरसना कां सभामूक व्हावी? ॥ १८ ॥
जे शक्तीला नय करिति वाक्पाटवें ते स्वतन्त्र,
पाहों लोकीं जन परवश न्याय दे ज्यास मंत्र ।
लोक न्याया अनुसरुनि कां पारतंत्र्यास लाहे ?
अन्यायें कां अपरवशता ? कोण सांगे मला हें ? ॥ १९ ॥
कोणी विष्णू, शिव कुणि भजे, लिंग कोणी शिवाचें,
दत्तात्रेय त्रिगुण[6], यदुप[7], ब्रह्म अव्यक्त वाचें[8] ।
कां हा भेद ? स्फुटगुण न कां जो जगाचा नियन्ता ?
भेदाभावें भुवनिं न दिसे देव कां साधुसंतां? ॥ २० ॥
भूकम्पादि प्रतिभय अशा क्रांति होतात कां हो !
लाखों प्राणी मिळविति जयीं मृत्यु हा घोर लाहो ? ।
ज्याचें आवश्यक न जनु तो प्राणि कां जन्म पावे ?
जन्मा यावे अगतिकतया कां तयानें मरावें? ॥ २१ ॥
नेत्रां भासे उपरि बघतां मानवी देह रम्य,
गूढाकूतें[9] हृदय परि तें कां असावें अगम्य ? ।
बाह्यात्कारें पुरुष शपथा वाहुनी प्रेम दावी,
त्याच्या चित्तीं परि कुटिलता कां निगूढा[10] रहावी ? ॥ २२ ॥

---

१ ज्याला जितकें पाहिजे तितकें. २ पापरूपी डोहाचा भाग. ३ सुखदायक वस्तूंस. ४ दरिद्री. ५ विविध अपकारांनीं पीडित. ६ सत्त्वरजस्तम गुणांनीं उपलक्षित. ७ कृष्ण. ८ वाचेनें. ९ गुप्त विचारांनीं. १० लपलेली.

न्यायें, कष्टें पुरुष मिळवी दानभोगा धनास,
त्यातें चौर्यें हरुनि करितो स्तेन नानाविलास।
ज्याचें त्याच्याजवळ धन कां दानभोगा न राहे ?
पाहों एक श्रम करि, फलास्वाद घे अन्य; कां हें ? ॥ २३ ॥
भोगेच्छेनें खल परनरस्त्रीमुखातें विलोकी,
नेत्राभावें दिवस ढकली आपुले अंध शोकीं।
ह्याला नेत्रें नसति म्हणुनी पाहिना देवमूर्ति,
तो कां नेत्रें वळवित असे व्हावया कामपूर्ति?॥ २४ ॥
देखों कीं जो स्तनगतपयःपानवर्धिष्णु[1] बाल
त्याची माता मरुनि चिर तो क्लेश भोगी कराल।
त्या बालाला जनन तरि कां क्लेशभोगा मिळावें ?
कीं मातेला तरि मरण तें कां न आधींच यावें ? ॥ २५ ॥
राजे लोभव्यथित करिती एकमेकांत संख्ये[2],
ज्यांच्यायोगें मिळविति सदा मृत्यु देही असंख्य।
सांगा जन्मे अनुचित तृषा राजचित्तीं कशास,
जी लोकां दे पितृपतिचियीं[3] व्यर्थ धामीं निवास ? ॥ २६ ॥
एका खाणींमधिल असती सर्व धोंडे समान,
देखों लोकीं नचि मिळतसे सारखा त्यांस मान।
कांहीं धोंडे शिव शिव ! ! कसे लागती शौचकूपा ?
कांहीं धोंडे मिळविति कसे पूज्य देवत्वरूपा ? ॥ २७ ॥
जे ज्ञानानें उचित सकलां मार्ग दावावयाला
त्यातें नेई यम असमयीं ओढुनी स्वा गृहाला।
ते दीर्घायू भुवनिं वधतों जे समाजास भार;
सांगा ऐसा विधि करितसे कां विचित्र प्रकार ॥ २८ ॥
देशद्रोह प्रखर करिती ते धना लाहतात,
त्यांतें कारागृह मिळतसे देश जे पूजितात।
हे पुण्यात्म्ये विधि ढकलि कां व्यर्थ कारागृहांत ?
त्या पापात्म्यांवरी विधि करी कां कृपादृष्टिपात ? ॥ २९ ॥

---

१ स्तनांतील दुग्धानें वाढणारा. २ लढाई. ३ यमाच्या.

ज्याच्या चित्तीं मल लव नसे, जो सदाचारशाली,
जो साहाय्य प्रतिपदिं करी प्राणियां सर्वकालीं ।
जो लोकांत प्रिय, समजती लोक ज्या देवकल्प,
त्याला देई शमन मरणीं क्लेश कां हो ! अनल्प ? ॥ ३० ॥

नीचाचे कां मरणसमयीं प्राण जाती सुखानें
विद्युत्पातें, सलिलनिचयीं[१] मज्जनें, वा ज्वरानें ? ।
विष्ठामूत्रप्रभवकृमिंहीं[२] जी न कोणास साहे
ती कां शय्या मरणसमयीं साधु लाहे ? वदा हें ॥ ३१ ॥

पोटासाठीं वध करुनि जो मेळवी निःस्व हेम
त्याला राजा लटकवि वधस्तंभि हा लोकिं नेम ।
राजा मारी अगणित नरां राज्यतृष्णामदानें
तेव्हां त्यातें शमन सदना तो न कां आपुल्या ने ? ॥ ३२ ॥

देखों लोकीं श्रम करुनि जो पोषि पत्नीसुतांस
त्यातें धाडी अचुक पटकी अंतकाच्या गृहास ।
तेव्हां पत्नी सुत अगणितां भोगिती यातनांतें,
मातें सांगा मरण तरि कां येतसे पोषकातें ? ॥ ३३ ॥

एका गांवीं वसति जन जे, नित्य एकाच गेहीं,
एका अन्नें अनवरत[३] ये ज्यांचिया पुष्टि देहीं ।
देखों त्यांच्या मधुनि पटकी नेइ एकास मात्र,
सांगा होती जन इतर कां तत्कृपादृष्टिपात्र ॥ ३४ ॥

पापात्म्याला स्तवि पुरुष तो पावतो द्रव्यरास,
उच्चस्थानीं स्थिरतम वसे, भीति नाहीं तयास ।
पापात्म्याच्या प्रकट करि जो साधुपातार्थ गर्ता[४]
त्याला भीती सतत; सहतो हें कसें विश्वकर्ता ? ॥ ३५ ॥

जो विद्येनें समुचित असे कोणत्याही पदाला
त्याला खालीं ढकलुनि अती हर्ष होतो खलाला ।

---

१ पाण्याच्या डोहांत. २ मलमूत्रानें उत्पन्न होणाऱ्या किड्यांनीं. ३ नेहमीं. ४ खड्डा.

विद्वानाचा शिव ! शिव ! ! अधःपात साधावयास
योजी क्लृप्त्या खल; बघवतें हें कसें ईश्वरास ? ॥ ३६ ॥

पापात्म्याला बुधजनयशीं छिद्र पाडोनि तैसा—
होई हर्ष क्षतिं ढकलुनी चंचु काकास जैसा ।
धात्यानें हा अनुचित असा निर्मिला हर्ष कां हो ?
कैसा धाता अविकृत शके नीच हा हर्ष पाहों ? ॥ ३७ ॥

जो साधूला तुडवुनि विनाकारणें त्यास सांगे
" मी त्वद्भव्यास्तवचि झटतों कष्ट सोसूनि आंगें" ।
त्यातें स्थापी अधिकृतिपदीं देव कां हें कळेना,
तत्साहाय्या प्रचुरतम कां धाडि तो दुष्टसेना ? ॥३८॥

वापीतोयीं, ज्वलनिं पडुनी, सेवुनी वा विषातें,
खड्गाघाता करुनि अथवा आणवे मृत्यु हातें ।
आयुर्दीर्घीकरण करणें मानवा हो न कां गा ?
साध्यासाध्य स्थिति लय न कां तो करी देव सांगा ॥ ३९ ॥

धाता विश्वांतुनि हरपला ? कीं भयानें पळाला ?
कीं वार्द्धक्यें गलितमति तो जाहला ? कीं निमाला ? ।
धाता विश्वाविषयिं लवही काळजी कां न वाहे?
औदासीन्य प्रकटुनि असें तो कसा कोठं राहे ? ॥ ४० ॥

धात्यानें कां षडरि मनुजा द्यावया दुःख केले ?
पापाचेंही मनुजहृदयीं बीज कां निर्मियेलें ? ।
धाता मातें स्फुट न म्हणवे मूर्ख वा शाहणा वा,
विश्वीं दोष प्रचुर दिसती, नित्य देखों पुरावा ॥ ४१ ॥

न्याय्यान्याय्या, सरलकुटिला, सौख्य दुःखा विलोकी,
सत्यासत्या, सुकृतदुरिता, नीत्यनीतीहि लोकीं ।
धाता पावे परि न लवही चित्तिं उद्वेग कैसा ?
केलें त्याणें जग मग बसे कां उदासीन ऐसा ? ॥ ४२ ॥

---

१ युक्त्या. २ जखमेंत. ३ तुझ्या कल्याणासाठीं. ४ अधिकाराच्या जागीं. ५ हलकटांची टोळी. ६ आयुष्याची वृद्धि.

विश्वीं देखों विषम रचना, सज्जनांचा विनाश,
पादात्म्यांचा चिर जय, जगद्धेतुही अप्रकाश[1] ।
तेणें शंका बहुविध अहो ! नित्य घेरी मनास,
शंकातंक[2] प्रखर सह्वे हा न विद्याधरास ॥ ४३ ॥

---

# माध्वीकमाधुरी.

## वृत्त आर्या.

नारळ, फणस वगैरे फळांपेक्षां आम्ही श्रेष्ठ आहों, आमचीं फळें सहज रीतीनें हातीं येतात, असा गर्व द्राक्षांस झाला. त्यांना ह्या कवितेंत बोध केला आहे. माध्वीक म्हणजे द्राक्ष, माधुरी म्हणजे गोडी. हें काव्य अन्योक्तिरूप आहे. ह्या काव्याचें वृत्त आर्या असून यमक पहिल्या आणि दुसऱ्या चरणांस एक, आणि तिसऱ्या आणि चवथ्या चरणांस वेगळें आहे. माध्वीक शब्द नपुंसकलिंगी आहे.

बसलों मी उद्यानीं तों माध्वीकोक्ति माझिया कानीं ।
आली ती कथिन जना जाणुनि ती त्यांचिया रुचेल मना ॥ १ ॥
“ मद्रस अति मधुर असे, पावे तो सत्य साम्य अमृतरसें ।
मी मूर्तिमंत सकवच विरघळतें मुखिं असत्य हें न वच ॥ २ ॥
गुडें[1] अति मधुर खरोखर, त्याहुनि मधु, आम्रें[2] सत्य मधुरतर ।
आम्राहूनि मधुरतर माध्वीकचि, वस्तु एकहि न इतर ॥ ३ ॥
मीच फळांत फलोत्तम[3], जन्मुनि सार्थक्य[4] सर्व म्हणति मम ।
फल नाम योग्य मातें, नचि पनसातें[5] न नारिकेलातें[6] ॥ ४ ॥
हातीं येती अश्रम[7] मंडपगत[8] रम्य रम्य गुच्छ[9] मम ।
जो लाधे[10] मम गुच्छ स्फुट तो मानिल दुजीं फलें तुच्छ ” ॥ ५ ॥
बालिश[11] गर्वोक्ति अशी कविच्या चित्तास मानवेल कशी ? ।
वदलों माध्वीकातें, “ गर्व न बालिश शिवो तव मनातें ॥ ६ ॥

---

१ संदिग्ध. २ शंकारूपी रोग. १ गूळ. २ आंबा. ३ फळांमध्यें उत्कृष्ट फळ. ४ सार्थकता. ५ फणसाला. ६ नारळाला. ७ त्रासावांचून. ८ मांडवावरचे. ९ घोस. १० ज्याला मिळतात. ११ पोरकट.

गुच्छ असोत सुलभे[12] तव तरि होत असे सदा तवाभिभेव[13] ।
अश्रम जें जें भिळतें न पुरी तद्योग्यता जना कळते ॥ ७ ॥
प्राणां अवश्य वायू, त्यावरि अवलंबलें जरी आयू[14] ।
तरि सुलभ वायु यास्तव कवणहि गाती कधीं न तद्विभवें[15] " ॥ ८ ॥
आदर मिळा तुज रसें तरिहि तिरस्कार त्यांत मिश्र असे ।
सातिरस्कारादर[16] तो प्राज्ञां न कधींहि सुखदसा गमतो ॥ ९ ॥
अश्रम येती हातां, सुलभ तुझे गुच्छ सुंदर पहातां, ।
तरि त्याच कारणानें वोढिति पशु फरफरां तुझीं पानें ॥ १० ॥
पशु गतशंक मनानें तव मोडिति विटपें[1], भक्षिती पानें ।
पदिं अपवित्र तुडविती तुजला, वर्णू तुझे प्रयास किती ? ॥ ११ ॥
अवहेलिसी कशाला पनसाला आणि नारिकेलाला ? ।
निंदो तयां नर, परी तव तैसा तदवमान न पशु करी ॥ १२ ॥
सोडोनि गर्व तव दे, माध्वीका ! मी त्वदीय हिताचि वदें ।
जो गर्वहेतु तव तो हेतु[2] तुझ्या मानखंडणीं फळतो ॥ १३ ॥
जें सर्वां सुलभ असे तें सार्घहि[3] मानहानि पावतसे ।
मलयीं चंदन जाळी भिल्ली कढवावया जलस्थालीं[4] ॥ १४ ॥
" माध्वीकमाधुरी " नाम काव्य वामननंदनें ।
रचिलें सानुलें त्यातें आदरावें महाजनें ॥ १५ ॥

# मेषपेषण.

[ वातापि आणि इल्वल ह्या नांवांचे दोन दैत्य तपस्व्यांना भारी उपद्रव करीत असत. त्या दैत्यांचा अगस्त्य मुनीनें कसा नाश केला, हें ह्या काव्यांत सांगितलें आहे. मेष ह्म० बोकड, पेषण ह्म० चिरडून पीठ करणें. ]

वृत्त अनुष्टुभ्

वातापि इल्वल असे होते दैत्य निशाचर ।
मुनिवृंदांस पीडाया सदा ते सिद्ध सोदर ॥ १ ॥

---

१२ श्रमावांचून मिळण्याजोगे. १३ तुझा अपमान. १४ आयुष्य. १५ त्याचा म्हणजे वायूचा महिमा. १६ तुच्छतेनें मिश्रित असा आदर म्हणजे मान.

१ फांद्या. २ ज्यामुळें तुला गर्व होत आहे, त्यामुळेंच तुझा अपमान होत असतो. ३ मूल्यवान्. ४ पाण्याचा थाळा.

तच्छरीरस्य सामर्थ्य सत्य सर्पमुखीं गारें[1] ।
साधुपीडाफलें[2] बल अधमाचें खरोखर ॥ २ ॥
तापसां[3] दैत्य हे दोघे क्रूरात्मे भेडसाविती ॥ ३ ॥
वंचिती, छळिती, नित्य उपद्रविति, गांजिती ॥ ३ ॥
तपश्चर्यारत असा साधू त्यांस न पाहवे ।
मृत्तिकेचा कण कधीं लोचनांस न साहवे ॥ ४ ॥
जें किंप्रभूसि दंडाया लाविजे बल तें बल ।
बल तें न प्रशंसार्ह करी जें साधुचा छल ॥ ५ ॥
ह्या दैत्यांचें बल सदा पीडादायक सज्जनां ।
न तें वंद्य, न तें स्तुत्य, न योग्य अभिवादना[4] ॥ ६ ॥
दंडकावनिं हें दोघे राहिले दैत्य दुष्टधी ।
मुनींतें छद्मयोगें[5] ते लोटिती व्यसनाब्धीं[6] ॥ ७ ॥
धरोनी द्विजरूपातें वदे संस्कृत इल्वल ।
विविधछद्मयोगानें करी तो ब्राह्मणच्छल ॥ ८ ॥
श्राद्धकर्मानिमित्तानें आमंत्री द्विज इल्वल ।
वातापी मेषरूपातें धरी मायाबलें खल ॥ ९ ॥
हा मेष इल्वल चिरी करी आस्वाद्य[7] वन्हिनें ।
आघ्राणसुखदायी[8] तो द्विजा वाढावयासि ने ॥ १० ॥
मेष हा मिष्ट भक्षोनी तृप्तीतें द्विज पावती ।
परंतु न कळे घोर परिणाम तयांप्रती ॥ ११ ॥
द्विजांच्या उदरीं खाद्य हें गेल्यावरि इल्वल ।
सोदरासि समाव्हान[9] करी " बाहेर ये चल ॥ १२ ॥
वातापे ! निजरूपानें ये बाहेर सहोदरा ! ।
द्विजोदरनिवासातें[10] सोडीं गा ! ये करीं त्वरा " ॥ १३ ॥
ऐकतां हें समाव्हान निजरूप धरी खल ।
फोडी द्विजोदर न जों लागावा एकही पल ॥ १४ ॥

---

१ विष. २ दुष्टाचें सामर्थ्य हें साधूंना पीडा करण्यांत फलित होतें. ३ तपस्वांना. ४ वंदनाला. ५ कपटानें. ६ दुःखांत. ७ खावयाला योग्य. ८ नाकाला संतृप्त करणारा, म्हणजे ज्याचा घमघमाट सुटला आहे असा. ९ हाक मारी. १० ब्राह्मणाच्या पोटांतील तुझें वास्तव्य.

करोनी कपटें ऐशीं वातापील्वल पापधी ।
पीडिती सर्वदा विप्र दंडकाविपिनामधीं ॥ १५ ॥
कोठें तामस ते दैत्य ? कोठें सत्वगुणी जन ? ।
झालें तें मुनिवासाला अत्ययोग्य असें वन ॥ १६ ॥
भुजंगयुक्त सदन, दैत्योपद्रुत आश्रम ।
हसंतीपार्श्वशय्येन[११] चित्ताचा हरिती शम ॥ १७ ॥
घोरें हीं अतिघोरें हीं दैत्यकृत्यें खरोखर ।
आश्रमीं आश्रमीं झाला हाहाकार भयंकर ॥ १८ ॥
ह्या दैत्यांच्या कुकर्मांनीं वन उध्वस्त जाहलें ।
" हाय हाय " असा नित्य विलाप करिती भले ॥ १९ ॥
बहु वर्षे क्रम असा चालला ह्या वनामधीं ।
गांजले, पीडले भारी, दंडकावनिं पुण्यधी ॥ २० ॥
देवही जाहले त्रस्त, दैत्यताप न थांबला ।
उपाय न सुचे त्यांना वारावें केविं तद्बला ॥ २१ ॥
गेले शरण ते देव अगस्त्य ऋषिला तदा ।
कर जोडोनि वदले, " वारीं ह्या जगदापदा " ॥ २२ ॥
मान्य केली अगस्त्यानें तेधवां देवयाचना ।
बोलला, " मी पुरवितों तुमची शीघ्र कामना " ॥ २३ ॥
निरोप मुनिनें देतां गेलें देव निजालया ।
दैत्यद्वय मरे आतां म्हणोनी हर्ष हो तयां ॥ २४ ॥
स्थविरद्विजरूपातें[१२] अगस्त्यें धरिलें तदा ।
यष्टि घेवोनियां गेला हळू टाकित तो पदा ॥ २५ ॥
इल्वलें मुनिचें केलें व्याजस्वागत तेधवां ।
बाहिलें भोजना त्यातें प्रेमा दावोनियां नवा ॥ २६ ॥
भोजनामंत्रण तिथें स्वीकारी मुनि निर्भय ।
हर्षला इल्वल अती, वातापीहि दुराशय[१३] ॥ २७ ॥
त्यांसि तेथें बसवुनी दैत्य गेलें महानसीं[१४] ।
कराया पाकनिष्पत्ति[१५] हर्ष पावोनि मानसीं ॥ २८ ॥

---

११ शेगडीच्या शेजारी निजणें. १२ म्हाताऱ्या ब्राह्मणाचें रूप. १३ दुष्ट अंतःकरणाचा. १४ स्वयंपाक घरांत. १५ पाकाची सिद्धता.

मायानिपुण तो दैत्य वातापी मेष जाहला ।
कळला न तदा भावी परिणाम तया खला ॥ २९ ॥
पचतां एक दुष्कर्म दुजें मूढ करावया ।
सिद्ध होतो असें नित्य पाहतों जगतांत या ॥ ३० ॥
एक दुष्कृत्य पचतां दुसरेंही पचेलसें ।
मूर्खाला वाटतें, त्याच्या विवेक हृदयीं नसे ॥ ३१ ॥
दुष्कार्मीसिद्धि दुष्टाला उत्तेजित करीतसे ।
आज्यधारा[१६] कृशानूला[१७] प्रवातीं[१८] बल देतसे ॥ ३२ ॥
लाभार्थ वा विनोदार्थ पापें खल करीतसे ।
धरोनि ऐसा क्रम तो परिणामीं सदा फसे ॥ ३३ ॥
शांतवृत्ति प्रजा सोशी किंप्रभूचा महाच्छल ।
परि तो दंड्य दंडातें पावतो शेवटीं खल ॥ ३४ ॥
असो हा विस्तर पुरे, चिरिला मेष इल्वलें ।
शिजवोनि अगस्त्यातें खाद्य तें अर्पिलें खलें ॥ ३५ ॥
भक्षितां खाद्य मुनि हा " सुसंपन्न[१९] " असें वदे ।
" तृप्तोस्मि[२०] " हा शब्द त्याचा इल्वला बहु तोष दे ॥ ३६ ॥
मग हर्षसमाविष्टें[२१] इल्वलें त्या दुराशयें ।
वातापी बाहिला " ये रे ! शीघ्र बाहेर शीघ्र ये ॥ ३७ ॥
मेषरूपासि सोडोनी, जोडोनी निजविग्रहा[२२] ।
फोडोनि ऋषिचा देह ये, आंत न सख्या ! रहा " ॥ ३८ ॥
अगस्त्य तेधवां मंद करोनी स्मित बोलला ।
" तुझा भ्राता जिरविला उदरें मम इल्वला ॥ ३९ ॥
दैत्यता वा मेषता वा मुकला तव सोदर ।
पावला पंचतां[२३] मात्र मरणार्ह खरोखर ॥ ४० ॥
मेषपेषण म्यां केलें, मेषता नष्ट जाहली ।
निःशेष म्यां जिरविली तच्छरीरकणावली[२४] ॥ ४१ ॥

---

१६ तुपाची धार. १७ अग्नीला. १८ जोराच्या वाऱ्यांत. १९ ठीक. २० मी तृप्त झालों. २१ आनंदानें भरलेला. २२ आपल्या स्वतःच्या शरीराप्रत. २३ पंचता पावला म्हणजे मेला. २४ त्याच्या देहाचे कण.

गांजी विप्रास जो मर्त्य तो पावे नित्य हे स्थिती ।
आव्हेरिती तया साधु, न तया बहु मानिती ॥ ४२ ॥
तुमचे छद्म मी जाणें, शठ दोघे तुम्ही खरे ।
माझ्यापुढें परि कसें तुमचें शाठ्य तें ठरे ? ॥ ४३ ॥
तुम्ही कांच हिरा मीही, तुम्ही सौधाट्ट[२५], मी वट ।
दोघे मतंगज[२६] तुम्ही, मी मृगाधिप[२७] उत्सट[२८] ॥ ४४ ॥
महाशठा मज कसें फसवाल तुम्ही शठ ? ।
मृगेंद्राच्या पुढें कैसा कलभांचा[२९] टिके हठ ?" ॥ ४५ ॥
शब्द हे ऐकतां धावे अगस्त्यावरि इल्वल ।
परि त्यासि मुनिश्रेष्ठें जगों नच दिलें पल ॥ ४६ ॥
अगस्त्यनयनें कोपें वमलीं वन्हिकीलक ।
ज्वालामुखीमुखें जाणों भूगर्भोष्मा[३०] भयानक ॥ ४७ ॥
शिवानें स्मरसा भस्मरूप तो दैत्य दुष्टधी- ।
नेत्रवान्हिबळें केला अगस्त्यानें क्षणामधीं ॥ ४८ ॥
लोकांस हा दैत्यनाश जाहला शमदायक ।
सुखावे देह निघतां रुतला पादिं कंटक ॥ ४९ ॥
दैत्यनाशें हरपल्या मुनींच्या घोर आपदा ।
दंडकारण्य ह्या योगें योग्य वासास हो तदा ॥ ५० ॥
वातापील्वलनाशातें बघतां देव हर्षले ।
कल्पपुष्पसुगंधाढ्य जलातें मेघ वर्षले ॥ ५१ ॥
जिकडे तिकडे झाला तदा आनंद निर्भर ।
सर्वांचीं दिसलीं वक्त्रें[३१] फुल्लपद्मविकस्वर[३२] ॥ ५२ ॥
मुनिपीडा जयां गोड पहाया वा करावया ।
पळाले सर्व ते नीच, राहिले न वनांत या ॥ ५३ ॥
दैत्यांच्या निधनें[३३] झालें दंडकावन निर्भय ।
स्वाश्रमीं राहते झाले सुखें मुनि महाशय ॥ ५४ ॥

---

२५ घराची गच्ची. २६ उन्मत्त हत्ती. २७ सिंह. २८ उडत आहे आयाळ ज्याची. २९ हत्तीचीं पिलें. ३० पृथ्वीच्या पोटांतील अग्नि. ३१ तोंडें. ३२ उमललेल्या कमळाप्रमाणें शोभायुक्त. ३३ मरणानें.

शा. वि.—पीडादायक यत्पराक्रम असे तो दंड्य होतो नर,
हा जो इल्वलवृत्त बोध करि, तो पावो जनीं आदर ।
साधुक्लेश सरो, सुखें जग भरो, हो प्रेम वृद्धिंगत,
हा विद्याधरही उमात्मज कवी लाहो शमा संतत ॥ ५५ ॥

---

# दृष्टांतमाला.

## पहिला सर.

( संस्कृतांत " दृष्टान्त " हा शब्द दोन अर्थांनीं योजला जातो, तसा तो मराठींतही योजला जातो. बिंबप्रतिबिंबभावानें दोन वाक्यांत साम्य उक्त असतें, तेव्हां दृष्टान्त होतो. त्याच अर्थानें हा शब्द साहित्यशास्त्रांत योजला जातो. व्यवहारांत " दृष्टान्त " हा शब्द दाखला किंवा उदाहरण ह्या अर्थानें योजला जातो. दुसरा अर्थ पहिल्या अर्थापेक्षां पुष्कळच पटींनीं अधिक व्यापक आहे. कारण, त्यांत पारिभाषिक अर्थाचा दृष्टान्त, प्रतिवस्तूपमा, अर्थान्तरन्यास, ह्या अलंकारांचाही अंतर्भाव होऊं शकतो.

" दृष्टान्तमाला " ह्यां नांवांत " दृष्टान्त " हा शब्द आम्ही दुसऱ्या अर्थानें योजिला आहे. )

वृत्त आर्या.

स्वार्थचि साधायास्तव दाखवि नर आदर, प्रणय, भक्ती ।
पोषी मेषा सौंडिक[1] तृण चारुनि त्यास मृदु यथाशक्ती ॥ १ ॥
पुष्कळही निर्बल नर कांहींही कार्य करूं न शकतात ।
अगणित तारे असतां तम निरसी चंद्र एकाचि नभांत ॥ २ ॥
गुण असुनि अंगिं होतो न तयाचा आश्रयाविण विकास ।
पारदं[2] असल्यावांचुनि दर्पणता[3] ये न काचफलकास[4] ॥ ३ ॥
अपुलेच होति बांधव जगिं आपुलियाच हेतु नाशास ।
गज इतर गजां द्याया दास्य झटे होउनी मनुजदास ॥ ४ ॥
जें वस्तु जातिसुंदर[5] संस्कारापेक्ष[6] तें न जगतांत ।

---

१ खाटिक. २ पारा; काचेला पारा लावला असतां आरसा होतो. ३ आरशाचि स्थिती. ४ काचेचें तावदान. ५ मूळचेंच सुंदर; वस्तुशब्द नपुंसकलिंगी आहे. ६ ज्याला संस्काराची गरज नाहीं असें.

नचि मौक्तिकास घर्षण शाणेवरि[7] हीरकास[8] देतात ॥ ५ ॥
एकी केल्यावांचुनि[9] नर पावति ह्या जगीं नचि बलास ।
तृण संहत हो‌ओनिच रोधूं शकतें प्रचंडाहि गजास ॥ ६ ॥
वैयक्तिकगुणसंहति[10] सर्वांगीं पूर्ण करि समाजास ।
गिरि चढति अंध पंगू साहाय्य करोनि एकमेकांस ॥ ७ ॥
शोभति साऱ्या वस्तू असल्या जर उचित आपुल्या स्थानीं ।
अंजन[11] सौंदर्याची वृद्धि करी लोचनीं, मुखीं हानी[12] ॥ ८ ॥
बलहेतु[13] जो निजाश्रय त्याचा अवलंब संकट निवारी ।
स्वस्थानीं नक्र असे तो उन्मत्त द्विपास हो भारी ॥ ९ ॥
अपरिचित स्थानीं जो जाई त्याचें समस्त बल विरतें[14] ।
स्वस्थानच्युत नक्रा श्वानहि ओढूनि नेइ फरफर तें ॥ १० ॥
जो नर गुणवंत असे तो साऱ्या शोभतो अहो ! स्थानीं ।
झळके मणि, शिरिं, भालीं, कंठीं, वक्षःस्थलीं, तसा कानीं॥११
येणारा जो उत्सव तो सौख्यप्रद असे, न आलेला ।
उदयीं सुख जैसा विधु तैसा तो दे न अस्तवेलेला[1] ॥ १२ ॥
उत्कर्ष गुणांचा जो तो न टिके, पावतो विलय तूर्ण[2] ।
एका मासामध्यें एकचि दिन चंद्र पाहिजे[3] पूर्ण ॥ १३ ॥
किंप्रभुच्या[4] भाटांचा सांगा कोण न करील उपहास ? ।
तो म्हणिजे मूर्ख सुरभि[5] जो म्हणतो कर्णिकार[6] कुसुमास ॥१४
खोट्या गुणां प्रशंसुनि कोण न होई तिरस्कृतिस पात्र? ।
त्यातें मूर्ख म्हणे जन जो उष्ट्राचें म्हणे सुभंग[7] गात्र[8] ॥ १५ ॥
एकहि समर्थ जो तो बहु निर्वीर्या नरां असे भारी ।
अगणितपारावतगण[9] एका श्येनीं[10] कधीं न संहारी ॥ १६ ॥

---

७ सहाण. ८ हिरा. ९ गुंतविलेलें, वळलेलें. १० अनेक माणसांच्या गुणांचा मिलाफ किंवा एकीकरण. ११ काजळ. १२ सौंदर्यांत कमीपणा. १३ सामर्थ्याचा उगम. १४ नाहींसें होतें.

१ मावळण्याच्या समयीं. २ लवकरच. ३ पाहिला जातो म्हणजे दिसतो. ४ वाईट राजा. ५ सुगंधी. ६ कण्हेरीचें फूल. ७ सुंदर. ८ शरीर. ९ असंख्य खबुतरांचा समुदाय. १० गिधाडाला.

मोठ्या अधिकारावर चढला जो नीच तो सदा नीच ।
वाघ्या झाला पाग्या तरि सोडी येळकोट न कधींच ॥१७॥
जो स्वाभिमानविरहित तो दास्याच्या सुखें स्थितिंत जाय ।
परवशतें[11] आनंदें स्वीकारी गज, कधीं न मृगराय ॥१८॥
आलें दारिद्र्य तरी मानी अधम न कधीं करील कृती ।
झाला क्षुधाकुल तरी नाहीं खाणार तृण मृगाधिपती ॥१९॥
आकस्मिक धनलाभें येतो तत्काल माद नीचातें ।
सरसी[12] पर्जन्यानें फुगतां सेतूंस[13] वाहवुनि नेते ॥२०॥
दारिद्र्यें वा विभवें सन्मन न खचे उडे नचि अहो तें ।
अब्धिजल न रवितापें पर्जन्यें वा उणें अधिक होतें ॥२१॥
बालपणीं जी सरणी लागे बालास ती पुढें टिकते ।
वळवूं आपण तैसें मृदु कोमल झाड सहज तें लवतें ॥२२॥
ज्याच्या पाशीं साधन सामग्री विपुल तो करि न याच्ञा ।
वापीरक्षक[1] जाइ न तृषितहि शोधा कधीं तडागांच्या[2] ॥२३॥
अभिजनयुत[3], गुणगणयुत[4] संगविशेषेंचे[5] वंदिजे नर हो ।
तुंबीफलविरहित[6] जो तो वीणादंड जनिं न आदृत[7] हो॥२४॥
न्यायप्रियचि महीपति शकतात प्रकृतिरंजन कराया ।
भगवद्गीतांवाचुनि[8] चित्तास समर्थ कोण शम द्याया ? ॥२५॥
वंशजही[9], गुणयुतही[10] संगविशेषेंच मान नर लाहे ।
वीणादंड कुठेंतरि तुंबीफलहीन[11] पडुनि गृहिं राहे ॥२६॥
अर्थ न कळला तरिही संतर्पी सुकविभणिति[12] कर्णाला ।
आघ्राणनें[13] न घडुनही सुखवी नयनांस मालतीमाला ॥२७॥

---

११ पारतंत्र्य. १२ सरोवर, तळें. १३ बंधारा.

१ विहीरीचें रक्षण करावयाला नेमलेला माणूस. २ तळ्यांच्या. ३ कुलीन. ४ पुष्कळ चांगल्या चांगल्या गुणांनीं युक्त. ५ योग्य वस्तूची जोड किंवा साथ मिळाली असतां. ६ भोपळा नसलेला. ७ मानाला पात्र. ८ गीता हा शब्द स्त्रीलिंगी अनेकवचनी आहे. ९ उत्तम वेळूचा केलेला; पक्षीं कुलीन. १० सद्गुण आहेत ज्याचे ठायीं असा. पक्षीं, उत्तम तारा आहेत ज्याला असा. ११ ज्याला भोपळा नाहीं असा. १२ उत्तम कवीचे शब्द. १३ वास घेण्याची क्रिया.

कोण न दंडा पावे जो परदाराभिलाषपाप करी ? ।
सीतेसि हरुनि रावण रामशरें मरण पावला समरीं ॥२८॥
संतत अध्ययनानें बुद्धी निर्वीर्य शीघ्र होत असे ।
मौर्वी[१४] सोडिति धन्वी[१५] ज्या समयिं शरासनास[१६] काम नसे२९
कष्ट सहन केल्याविण येती न कधीं मनोरथ फळाला ।
क्षीरोदधिमथनानें अमृताचा लाभ निर्जरां[१७] झाला ॥३०॥
उपदेशग्रहण करूं धीमान शके, शके न जो जड तो ।
घर्षण शाणेवरती मृत्पिंड सहों न, हीरकचि शकतो ॥३१॥
खल सासूय[१] म्हणोनिच दोषचि शोधी, तया न गुण दिसती ।
व्रण कावळा हुडकितो, मधुर फळें कंद त्यास नच रुचती ॥३२
सारज्ञचि काव्याचा सहृदयतेनें करूं शके अर्थ ।
सहकारपल्लवांची[२] ध्याया रुचि पिकचि[३] केवल समर्थ ॥३३॥
बहिरंगातें पाहुनि जाणाया अंतरंग येत नसे ।
वृंदावन[४] बाहेरुनि रम्य दिसे, आंत अति कडू विषसें ॥३४॥
साना उपयोगाला येई, मोठा तसा न येइ कधीं ।
कूपाचि तृष्णाशांती करितो तैसी न थोरही जलधी ॥३५॥
प्रौढ दशा मनुजाला येइ तसा होइ तन्मतिविकास ।
पाहतसों कीं येतो बहु जीर्ण अशाच चंदना वास ॥३६॥
उत्पत्तिस्थानावर गुण अवलंबूनि वस्तुचा नसतो ।
अमृताला गरलाला देई जो जन्म जलधि एकच तो ॥३७॥
रिपुपक्षीयासाचि जन योजिति रिपुचा करावया घात ।
कंटक काढायाला कंटक ह्या साधनास घेतात ॥३८॥
आकार असो मोठा, तो मानाला न पात्र, गुणचि असे ।
गंगा सानी असतां जन वंदिति तिज, न जान्हवीस तसे ॥३९॥
दुःखामागुनि आलें सुख तें वाटे मनास सुखतरसें[५] ।
कटु औषध प्याल्यावर जलही जिव्हेस हो सशर्करसें[६] ॥४०॥

---

१४ धनुष्याची दोरी. १५ तिरंदाज. १६ धनुष्याला. १७ देवांना.

१ मत्सरी. २ आंब्याचीं कोंवळीं पानें. ३ कोकिल पक्षी. ४ हें एक अति कडू फळ आहे. ५ अधिक सुखावह. ६ साखरेनें युक्त.

जो निंदी साधूला उपहासा तोचि पात्र होइ जनीं ।
आकाशावरि थुंकी टाकी त्याच्याच ती पडे वदनीं ॥४१॥
खळ बाहेरुनि भेसुर, आंतहि तैसाच, आंत न निराळा ।
किति कोळसा उगाळा, बाहेर तसाच आंत तो काळा ॥४२॥
अतिपरिचययोगानें सद्वस्तुहि हो अनादरा पात्र ।
गंगातटिं राहे तो गंगाजलिं विमल करि मलिन गात्र॥४३॥
पापाचरणें दूषित झाला त्या जन न मान देतात ।
जें काचपात्र फुटलें तें हातांत न कुणीहि धरितात ॥४४॥
रसिकासच काव्याचें माधुर्य कळे, कळे न इतराला ।
कर्णाला सुखद असे किन्नरगायन, असे न नयनाला ॥४५॥
होउनि सहाय दोघे दुष्करही कार्य सहज करितात ।
असि तीक्ष्ण रिपु न मारी जर त्या पेलवाया नसे हात ॥४६॥
वृद्धाची युक्ति जुळुनि युवशक्तीशीं[१] करी महाकार्य ।
श्रीरामदासबोधें झाला शिवबा[२] परासं[३] अनिवार्य ॥४७॥
नृप उन्नतेच्छ सोडी प्रियतम वस्तु प्रजाहितासाठीं ।
जनहितिं कन्या वोपनि पडलें शर्यातिच्या सुकृत गांठीं ॥४८॥
ग्रामीणाची ग्रामीं मति उच्चस्थित सजो, पुरीं वसरे ।
सरडा धावो लघु परि सरड्याची धाव कुंपणास सरे ॥४९॥

श्लोक

खल त्रास देई सदा सज्जनाला तरी तो खलाच्या करी भावुकाला[४] ।
अयोमुद्गरें[५] स्पर्श[६] फोडावयाला झटो, स्पर्श[६] हेमत्व दे मुद्गराला ॥ ५० ॥
विभवहानि असह्य महाजना, लघुचिया सलते नचि ती मना ।
गिरिवरोनि पडोनि मरे करी, परि पडे कृमि अक्षत[७] भूवरी ॥५१॥
त्रयस्थ[८] पक्षद्वयमर्म जाणे म्हणोनि त्यातें पुसती शहाणे ।
भूमध्यरेषेवरि जो असेल ताराकटाहद्वय[९] त्या दिसेल ॥ ५२ ॥
देशकार्यरत वीर जो तया किम्प्रभू न लव वाटवी भया ।
काय घाबरवि सांग वारणें[१०] केसरीसें[११] जई जुंपतें रण ॥ ५३ ॥

---

१ तरुण माणसाची शक्ति. २ छत्रपति शिवाजी महाराज. ३ शत्रूला. ४ कल्याणाला. ५ लोखंडाचा हातोडा. ६ परिसाचा दगड. ७ कांहीं इजा न झालेला. ८ तिऱ्हाईत माणूस. ९ दोन्ही खगोलार्ध. १० हत्ती. ११ सिंहास.

संताष चिंतामणि ज्यास लाधे तयास दारिद्र्य कधीं न बाधे ।
उपानहोंची[12] जुळवील सोय तयास चर्मावृत[13] भूमि होय ॥ ५४ ॥
पंडितें जरी बोधिला खल साधु हो न तो, बोध निष्फल ।
मेघ वर्षला कातळावरी[14], लाभ होतसे कायसा तरी ? ॥५५॥
साधू न हो खल कधीं खलसंगतींत पाहोनि सद्गुण अहो! खल हो विनीत[15] ।
आमोद[16] देई अपुला सुम मृत्तिकेतें, तीचा परन्तु लवही नचि वास घे तें॥

सर्ग[17] दृष्टान्तमालेचा अर्पितों पहिला[18] जना
मी विद्याधर, तो त्यांच्या आनंदप्रद हो मना ॥ ५७ ॥

---

# ऐश्वर्यचलता.

ऐहिक वैभव शाश्वत टिकणारें नसतें म्हणून ऐहिक वैभवाच्या पाठीस न लागतां सन्मार्गानें चाला, म्हणजे तुम्हाला शांति आणि सुख ह्यांचा लाभ होईल, असा बोध ह्या काव्यांत केला आहे. ऐश्वर्य ह्म० वैभव, चलता ह्म० चंचलपणा.

वृत्त वंशस्थ.

अनेक झाले नृपती जगांत या न ये जयांची गणती करावया ।
अनेक त्यांनीं रिपु[1] थोर जोणिले, स्वकीय राज्य प्रतिमल्ल मांडिलें ॥१॥
विलास त्यांनीं बहुसाल भोगिले, स्वकीय ऐश्वर्य जगास दाविलें ।
गळे नरांचे गतसंख्य[2] कापिले, प्रचंड दोर्दंड बला प्रकाशिलें[3] ॥ २ ॥
तयीं नमस्कार असंख्य घेतले, जणों नमस्कार सुखार्थ चेतले ।
खुशामते ते जुळवूनि भोवतीं स्तुतिध्वनि प्राशुनि तोषले अती ॥३॥
परंतु सद्दी सरतांच ते बली बलिष्ठ शत्रूप्रति जाहले बली[4] ।
जुन्या प्रभूंच्या स्थलिं हे प्रभू नवे विराजले उज्ज्वलवीर्यवैभवें ॥ ४ ॥

---

१२ उपानह् म्हणजे जोडा. १३ कातड्यानें मढविलेली. १४ खडकावर. १५ नम्र. १६ सुगंध. १७ दृष्टांतमाला ह्या आमच्या काव्याचे दोन भाग आहेत त्यांपैकीं हा पहिला भाग. १८ दुसऱ्या भागांत इतर्कांच पद्यें आहेत. ह्या दोन्ही भागांतील पद्यें संस्कृतपद्यांचीं भाषांतरें किंवा रूपान्तरें आहेत.

१ प्रतिस्पर्धी, विरोधी. २असंख्य. ३प्रकटिलें. ४बलवान् शत्रूकडून मारले गेले.

नवे तदा हे प्रभु फार गाजले, नव्या प्रभूंचें बहु पोमें[5] माजले ।
जगीं जुन्यांचें मग नांव लोपलें, समस्त ऐश्वर्य तदीय संपलें ।। ५ ।।
नव्या प्रभूंतें जन लागले नमूं, खुशामत्यांची जुळली नवी चमू[6] ।
जनें नव्यांचे स्तुतिवाद गायिले, असे विपर्यास विचित्र चालिले ।।६।।
सुखें तयांनीं बहुसाल भोगिलीं, सुखार्थ त्यांची तनु काय निर्मिली ।
विलास केले दिविदृश्यवैभवें[7] धनें प्रजापीडनकर्मसंभवें[8] ।। ७ ।।
सरोनि सद्दी प्रभु हेहि नूतन विलोपले, विस्मरले तयां जन ।
मरोनि गेले प्रभु ते बलोद्धत, मरोनि गेले रिपु तत्पदीं नत ।। ८ ।।
विलास त्यांचे सरले मदोद्भव, धनाढ्य त्यांचे सरले महोत्सव ।
प्रचंड त्यांचीं भवनें विलोपलीं, नवीन आलीं मग त्यांचिया स्थलीं ।।९
नवीन येतां प्रभु राज्यशासनीं[9] जुन्या प्रभूंची नुरली स्मृता जनीं ।
नवीन झाली सगळीच पद्धती, नवीन राज्यावरि थारल्या मती ।। १०
मरोनि गेले प्रभु हे पुढें नवे, विलोपलीं नूतन राज्यवैभवें ।
नवीन येतां प्रभु लोपले जुने, अदृश्य झाले जणुं काय जादुनें ।।११।।
अशा क्रमानें प्रभु मेदिनीवरी असंख्य झाले, अनृता न वैखरी[10] ।
असंख्य राज्यें विलयास पावलीं, गणी तयांची नर कोण आवली[11] ? १२
तदाप्त, मित्र, प्रिय बंधुबांधव, पतद्ग्रहस्थित्यनुकारि[12] मानव– ।
लयास गेले, मग अन्य मंडली तशीच जन्मूनि लयास पावली ।।१३
जुने जुने भूप मरोनि लोपले, नवे नवे तद्विभवास पावले ।
नवे नवे हेहि लयास पावले, जगीं न तन्नाम न वीर्य थारलें ।। १४ ।।
तरंग एकास दुजा पुढें वेळीं[13], दुजास वा जेंवि तिजा क्रमें जळीं ।
नवे जुन्यांस प्रभु तेंवि लोटिती, नव्यांस ह्या अन्य नवे, वदूं किती ?
तरंग जैसे पुढच्यास मागले, तयांस ते जे मग जन्म पावले ।
तसे महीपास महीप लोटिती, अनंत सांगूं क्रम हा तुम्हां किती ? १६
प्रचंड राज्यें विलयास पावलीं, नदीजलें सागरिं काय धावलीं? ।

---

५ स्तोम किंवा बोलबाला. ६ सेना. ७ स्वर्गांतच दिसणाऱ्या थाटमाटानें. ८प्रजेला पिळून मिळविलेल्या पैशानें.९ राज्य चालविण्याच्या कामाला १०वाणी, भाषण.११ मालिका. १२ पतद्ग्रह म्हणजे पिकदाणी, पिकदाणी प्रमाणें काम करणारे लोक म्हणजे प्रभूंची थुंकी आपल्या तोंडांत घ्यावयाला सिद्ध असलेले लोक म्ह० खुशामत्ये. १३ ढकलतो.

संताष चिंतामणि ज्यास लाधे तयास दारिद्र्य कधीं न बाधे ।
उपानहांची[12] जुळवील सोय तयास चर्मावृत[13] भूमि होय ॥ ५४ ॥
पंडितें जरी बोधिला खल साधु हो न तो, बोध निष्फल ।
मेघ वर्षला कातळावरी[14], लाभ होतसे कायसा तरी ? ॥५५॥
साधू न हो खल कधीं खलसंगतींत पाहोनि सद्गुण अहो! खल हो विनीत[15] ।
आमोद[16] देई अपुला सुम मृत्तिकेतें, तीचा परन्तु लवही नाचि वास घे तें ॥
सरे[17] दृष्टांतमालेचा अर्पितों पहिलें[18] जना
मी विद्याधर, तो त्यांच्या आनंदप्रद हो मना ॥ ५७ ॥

---

# ऐश्वर्यचलता.

ऐहिक वैभव शाश्वत टिकणारें नसतें म्हणून ऐहिक वैभवाच्या पाठीस न लागतां सन्मार्गानें चाला, म्हणजे तुम्हाला शांति आणि सुख ह्यांचा लाभ होईल, असा बोध ह्या काव्यांत केला आहे. ऐश्वर्य ह्म० वैभव, चलता ह्म० चंचलपणा.

वृत्त वंशस्थ.

अनेक झाले नृपती जगांत या न ये जयांची गणती करावया ।
अनेक त्यांनीं रिपु थोर जेणिले, स्वकीय राज्य प्रतिमल्ल[1] मांडिलें ॥१॥
विलास त्यांनीं बहुसाल भोगिले, स्वकीय ऐश्वर्य जगास दाविलें ।
गळे नरांचे गतसंख्य[2] कापिले, प्रचंड दोर्दंड बला प्रकाशिलें[3] ॥ २ ॥
तयीं नमस्कार असंख्य घेतले, जणों नमस्कार सुखार्थ चेतले ।
खुशामते ते जुळवूनि भोवतीं स्तुतिध्वनि प्राशुनि तोषले अती ॥३॥
परंतु सद्दी सरतांच ते बली बलिष्ठ शत्रूप्रति जाहले बळी[4] ।
जुन्या प्रभूंच्या स्थलिं हे प्रभू नवे विराजले उज्ज्वलवीर्यवैभवें ॥ ४ ॥

---

१२ उपानह् म्हणजे जोडा. १३ कातड्यानें मढविलेली. १४ खडकावर. १५नम्र. १६ सुगंध. १७ दृष्टांतमाला ह्या आमच्या काव्याचे दोन भाग आहेत त्यांपैकीं हा पहिला भाग. १८ दुसऱ्या भागांत इतकींच पद्यें आहेत. ह्या दोन्ही भागांतील पद्यें संस्कृतपद्यांचीं भाषांतरें किंवा रूपान्तरें आहेत.

१ प्रतिस्पर्धी, विरोधी. २असंख्य. ३प्रकटिलें. ४बलवान् शत्रूकडून मारले गेले.

नवे तदा हे प्रभु फार गाजले, नव्या प्रभूंचें बहु स्तोम[५] माजलें ।
जगीं जुन्यांचें मग नांव लोपलें, समस्त ऐश्वर्य तदीय संपलें ।। ५ ।।
नव्या प्रभूंतें जन लागले नमूं, खुशामत्यांची जुळली नवी चमूं[६] ।
जनें नव्यांचे स्तुतिवाद गायिले, असे विपर्यास विचित्र चालिले ।।६।।
सुखें तयांनीं बहुसाल भोगिलीं, सुखार्थ त्यांची तनु काय निर्मिली ।
विलास केले दिविदृश्यवैभवें[७] धनें प्रजापीडन[८]कर्म[९]संभवें ।। ७ ।।
सरोनि सद्दी प्रभु हेहि नूतन विलोपले, विस्मरले तयां जन ।
मरोनि गेले प्रभु ते बलोद्धत, मरोनि गेले रिपु तत्पदीं नत ।। ८ ।।
विलास त्यांचे सरले मदोद्भव, धनाढ्य त्यांचे सरले महोत्सव ।
प्रचंड त्यांचीं भवनें विलोपलीं, नवीन आलीं मग त्यांचिया स्थलीं ।।९
नवीन येतां प्रभु राज्यशासनीं जुन्या प्रभूंची नुरली स्मृती जनीं ।
नवीन झाली सगळीच पद्धती, नवीन राज्यावरि थारल्या मती ।। १०
मरोनि गेले प्रभु हे पुढें नवे, विलोपलीं नूतन राज्यवैभवें ।
नवीन येतां प्रभु लोपले जुने, अदृश्य झाले जणुं काय जादुनें ।।११।।
अशा क्रमानें प्रभु मेदिनीवरी असंख्य झाले,अनृता न वैखरी[१०] ।
असंख्य राज्यें विलयास पावलीं, गणी तयांची नर कोण आवली[११] ? १२
तदाप्त, मित्र, प्रिय बंधुबांधव, पतद्ग्रहस्थित्यनुकारि[१२] मानव- ।
लयास गेले, मग अन्य मंडली तशीच जन्मूनि लयास पावली ।।१३
जुने जुने भूप मरोनि लोपले, नवे नवे तद्विभवास पावले ।
नवे नवे हेहि लयास पावले, जगीं न तन्नाम न वीर्य थारलें ।। १४ ।।
तरंग एकास दुजा पुढें वळी[१३], दुजास वा जेंवि तिजा क्रमें जळीं ।
नवे जुन्यांस प्रभु तेंवि लोटिती, नव्यांस ह्या अन्य नवे, वदूं किती ?
तरंग जैसे पुढच्यास मागले, तयांस ते जे मग जन्म पावले ।
तसे महीपास महीप लोटिती, अनंत सांगूं क्रम हा तुम्हां किती ? १६
प्रचंड राज्यें विलयास पावलीं, नदीजलें सागरिं काय धावलीं? ।

---

५ स्तोम किंवा बोलबाला. ६ सेना. ७ स्वर्गांतच दिसणाऱ्या थाटमाटानें. ८प्रजेला पिळून मिळविलेल्या पैशानें. ९ राज्य चालविण्याच्या कामाला १०वाणी, भाषण. ११ मालिका. १२ पतद्ग्रह म्हणजे पिकदाणी, पिकदाणी प्रमाणें काम करणारे लोक म्हणजे प्रभूची थुंकी आपल्या तोंडांत घ्यावयाला सिद्ध असलेले लोक म्ह० खुशामत्ये. १३ ढकलतो.

जनांस नांवेंहि न आज ठाउकीं असोनि तीं शत्रूमनांसि बाउ कीं १७
न राजधानीस्थलही बघों शकों, कथाच तद्वैहविभ्र[१४]ादिंची नको ।
नसे जगीं शाश्वत राज्यवैभव, म्हणे तया [१५]बुद्बुद तुच्छ मानव ॥१८॥
जिथें न थारा प्रभुच्याहि वैभवा, जिथें नसे शाश्वत नाम रूप वा ।
तिथें असों आपण काय पामर ? धनाधिकारोत्सुक हो न अंतरं[१६] ॥१९
कशास जोडा धन दास्यवृत्तिनें न जें टिके शाश्वत आत्मशक्तिनें[१७]? ।
कशास घाला धनिकाचिया गृहा असंख्य खेटे ? धन तुच्छ निस्पृहा २०
तुम्हांस कां तो अधिकार लोभवी? शके न तारूं क्षण जो तुम्हा भवीं।
कशास मागा अधिकार जो मना अनीतिला प्रेरुनि देइ यातना?॥२१
उगा नमस्कारसुखार्थ भाळतां, कशास शुष्कस्तुतिवाद ऐकतां ? ।
धनें वृथा, तो अधिकार निष्फल, नरास अंतीं करितात विव्हल ॥२२
गृहामध्यें ज्या अजि एक नांदतो तिथें उद्यां येउनि अन्य राहतो ।
तिजा रहाया परवा तिथेंच ये, वृथा गृहप्रेम कसें म्हणों नये ? ॥ २३ ॥
धनें पिता कष्ट करोनि मेळवी, सुखांत तीं बालिश पुत्र घालवी ।
असेव्य ऐशा विषयांत रंगतो, सुखें मनें तो परिणामिं भंगतो ॥२४॥
अशेष ऐश्वर्य अतीव नश्वर, तया तुम्ही त्याज्य गणा निरंतर ।
मनो[१८]र्वचोवर्तनशौच दे सुख, तया असावें मनुजें समुन्मुखें[१९] ॥ २५ ॥
म्हणोनि हा बोध तुम्हांस मी करीं, नसो गृहीं प्रेम, धनीं न किंकरीं ।
नयार्थ चाला नयमार्ग, शांतितें लहा, जरी आज न येइ अंतिं ते ॥२६
खरेपणानें व्यवहार चालवा, धनाधिकारादि तुम्हां मिळो न वा ।
खरेपणानें स्थिर शांति लाभते, धनाधिकारोद्भव सौख्य शुष्क तें ॥२७
जगीं असत्य व्यवहार चालतां जळे कवी लोपुनि सर्व शांतता ।
परंतु शांति स्थिर उद्भवे मनीं खरेपणाच्या [२०]स्वचरित्रचिंतनीं ॥ २८ ॥

"ऐश्वर्यचलता"नाम काव्य वामननंदनें ।
रचिलें सानुलें त्यातें आदरावें सदा जनें ॥ २९ ॥

---

१४ त्यांच्या वाड्यांच्या वैभवादिकांची. १५ बुडबुडा. १६ अंतःकरण. १७ अंगच्या सामर्थ्यानें. १८ चित, भाषण आणि आचरण ह्यांचा पवित्रपणा. १९ तत्पर. २० आपलें चरित्र पवित्र आहे हा विचार.

# प्रसूपय.

जन्म देणाऱ्या मातेचेंच दूध अर्भकाचें निसर्गनिर्मित अन्न असून तेंच पुष्टि आणि शक्ति देणारें असतें, असा ह्या काव्याचा विषय आहे.

[ प्रसू म्हणजे प्रसवणारी आई, आणि पय म्हणजे दूध ]

वृत्त वंशस्थ.

निज प्रसूचें पय पुष्टिकारक, तदन्य केव्हांहि पिओ न अर्भकें।
प्रसूपयें अर्भकतेज वाढतें, न वाढतें अन्य पयें कधींच तें ॥ १ ॥
जया वयीं पेय जया प्रकारचें निसर्गरीत्या शिशुला गुणें पचे।
तया वयीं दूध तया प्रकारचें स्तनीं प्रसूच्या शिशुपोषणा रचे ॥ २ ॥
अवश्य जे जे रस बालवर्धना वसा, जल, क्षार निसर्गबंधना।
प्रसूचिया ते भिळती स्तनीं तसे, प्रसूपय श्रेष्ठ नसे वदा कसें ? ॥३ ॥
पय प्रसूचेंच अवश्य बालका, गुणा तयाच्या विसरूं कधीं नका।
स्व बालका पाजिल न प्रसू तरी स्वतास ती त्यासहि दुःखदा खरी ॥४॥
प्रसूपयःपान असे हितावह तिलाहि, त्यालाहि; अवर्ण्य तन्महें।
हितावहा ईश्वरयोजना अशी रुजेसि उल्लंघियली न दे कशी ? ॥ ५ ॥
अनेकरोगाकुल बाल होइल प्रसू न ज्याला निज दुग्ध पाजिल।
स्वताहि ती रोगरुजेस भोगिल, असेंच आहे वचन स्मृतींतिल ॥६॥
असेंच धन्वन्तरिचें असें मत, असेंच सृष्टिप्रगतीस संमत।
जिणें दिला जन्म सुयोग्य तत्पय, तदन्य जें तें न करी अनामय ॥७॥
यदर्थ उत्पन्न करी निसर्ग जें तदर्थ तें, नेतर, योजिलें सजे।
शिशूस प्याया जननीस्तनीं पय, तयेंच ये पुष्टि तया, न संशय ॥८॥
न पाळि जो रीति निसर्गनिर्मित कराल तो भोगिल दुःख निश्चित।
क्षमील राजा निजशास्तिभंजन, क्षमा निसर्गांत भिळे कधींच न ॥९॥
निसर्ग कोणासहि न क्षमा करी, समान तो क्षुद्र नरीं महेश्वरीं।
बघों नृपाला फसवूं शके नर, निसर्ग कोणा न फसे खरोखर ॥ १०॥
असे अतिक्रूर निसर्ग शासनीं, निसर्ग आणी न दया क्षमा मनीं।
निसर्ग जो लंघिल तो असो नृप क्षमा न पावेल; निसर्ग निष्कृपे ॥११

---

१ तान्हें मूल. २ उत्पन्न होतें. ३ चरबी. ४ त्या दुधाची थोरवी. ५ आरोग्य. ६ योग्य होतें किंवा असतें. ७भयंकर. ८आपल्या आज्ञेचें उल्लंघन. ९कठोर, निर्दय.

निसर्ग लंघून न दण्ड्य होय तो न मर्त्य कोणी भुवनांत पाहतो ।
ठसो असें तत्त्व जनाचिया मनीं, न टाळवे दण्ड निसर्गलंघनीं ॥१२॥
प्रसूपयःपानमहत्त्व संततं न नीतिशास्त्रानुसारें न संमत ।
कृतज्ञता मान न पुत्र दाविल प्रसूस जो तत्पय नैव सेविल ॥ १३ ॥
निजार्भका पाजि न जी प्रसू पय तिच्याहि हो चित्तिं ममत्वसंक्षय[१०] ।
ममत्वहीना असली प्रसू खरी न ती नरी; ती म्हणिजे निशाचरी[११] ॥१४
मरोनि दैवें जननी स्तनंधय[१२] अनाथ लाधेल न जो तिचें पय ।
परस्त्रियेचेंच अवश्य त्या पय, न टाळवें तें जर दैव निर्दय ॥ १५ ॥
निज प्रसूचें पय शान्तिदायक, निज प्रसूचें पय पुष्टिकारक ।
निज प्रसूचें पय तुष्टिदायक, निज प्रसूचें पय तापहारक ॥ १६ ॥
परस्त्रियेचें पय रोगकारक, परस्त्रियेचें पय शोकदायक ।
परस्त्रियेचें पय नीतिभंजक, परस्त्रियेचें पय भक्तिहारक ॥ १७ ॥

जनें[१३] विसरति हो प्रसूच्या पयाची अशी थोरवी,
स्तवुनि आजि तया न विद्याधर श्रान्त गातां कवी ।
सकल परिशिली जनाच्या ठसो थोरवी ही मनीं,
निजहितपर जो रतो सृष्टिच्या तो न उल्लंघनीं ॥ १८ ॥

---

# शिवाजीच्या चारित्र्याचें एक उदाहरण.

## कथेचा प्रसंग.

आबाजी सोनदेव नांवाच्या एका प्रभु मराठ्यानें शिवाजीच्या आज्ञेवरून कल्याण सुभा जिंकून घेतला, तेव्हां तेथचा सुभेदार मौलाना अहमद ह्याची सून ह्या प्रभु वीराच्या हातांत सांपडली. ती अतिशय सुंदर होती, ती शिवाजीला त्यानें नजर केली. परंतु शिवाजीनें तिचा स्वीकार न करतां तिला वस्त्रालंकारांनीं विभूषित करून तिला परिजन देऊन परत पाठवून दिलें.

ह्या ऐतिहासिक प्रसंगावर अनेक महाराष्ट्रीय शारदाभक्तांनीं अनेक मनोहर गद्यपद्य कृति केल्या आहेत. आपणही ह्या प्रसंगावर कांहीं तरी लिहावें अशा प्रेरणेनें आम्ही हें खंडकाव्य लिहिलें आहे. तें आम्ही प्रेमानें महाराष्ट्रीय वाचकांना सादर करीत आहों.

---

१० प्रेमाचा अभाव. ११ राक्षसी. १२ स्तनपान करणारा. १३ हें वृत्त नाराच.

37849

वृत्त आर्या.

१

शिवबाच्या अंगीं बहु होते महनीय गुण असामान्य ।
त्यांच्या सामर्थ्यावरि राज्य तयें स्थापिलें जना मान्य ॥ १ ॥
त्या शिवबाचे गावे गुण हा मम काम फार दिवसांचा ।
परि तें गिर्यारोहण[1], झाला मम धीर पंगुचा[2] काचा[3] ॥ २ ॥
शिवबाचे गुण गातां टेकिति पंडिताशिरोमणिहि हात ।
तर काय कथा माझी ? परि पुण्य गमे मला प्रयत्नांत ॥ ३ ॥
कोठें लोकोत्तर तो पुरुष जयें राज्य निर्मिलें भव्य ? ।
कोठें मी कवि नेणे जो एकहि सरस कल्पना नव्य ? ॥ ४ ॥
परि सर्व शक्य न म्हणुनि लवहि[4] न करणें नसे मला मान्य ।
गातों त्याचा एकचि चारित्र्यशुचित्व हाच गुण, नान्य ॥ ५ ॥
शिवरायाच्या पदरीं आबाजी सोनदेव नांवाचा ।
कायस्थ प्रभु होता, स्वामीच्या पूर्ण तो भरंवशाचा ॥ ६ ॥
मतिनें गुरुसा[5], शौर्यें मृगपतिसा[6], शक्तिनें मतंगजसा— ।
तो सुसुत मातृभूचा, प्रिय हो शिवबास जीवसा[7] न कसा ? ॥ ७ ॥
एके दिवशीं त्याला एकान्तीं बोलवून शिवबा हें- ।
वदला, " गा आबाजी, मन्मनिंचा पुरविं काम लवलाहें ॥ ८ ॥
मोठ्या कार्यावरि मी आबाजी, आज धाडितों तुजला ।
ह्या कार्याला तुजसा उचित न दुसरा दिसे पुरुष मजला ॥ ९ ॥
सर्व मऱ्हाठ्यांमध्यें शूर चतुर तुजसमान तूं, नान्य ।
करिशील तूंच आबा, मद्योजित कार्य हें असामान्य ॥ १० ॥
तूं जंबुकसा[8] धूर्त, प्रतिभयें[9] हरिसा[10], समीरसा चपळ ।
कल्याण सुभा यवनांपासुनि घ्यायास शीघ्र जाच, पळ ॥ ११ ॥
यवन सुभेदार तिथें विषयी न करूं शके प्रकृतिभव्यें[11] ।

---

१ पर्वतावर चढणें. २ पंगु म्ह. लंगडा माणूस. ३ अल्प, उणा. ४ अगदीं थोडेंसुद्धां. ५ बृहस्पतीप्रमाणें. ६ सिंहाप्रमाणें. ७ प्रिय, आवडणारा. ८ कोल्ह्याप्रमाणें. ९ भयंकर. १० सिंहाप्रमाणें. ११ रम्यतेचें कल्याण.

कथिं कल्याणकरांच्या करि कल्याणार्थ काय कर्तव्य ? ॥१२॥
मृदु शय्येवरि त्याचा लोळे संतत सुखामधें काय।
कथिं कल्याणकरांच्या कुशलाची काळजी करी काय? ॥१३॥
सुनृप सुखवि सुसरणिनें सकल समाजास सत्य संकल्पें ।
सुसरणिसमुद्भव सुखें संतोषावितीं सदा जरी स्वल्पें ॥ १४ ॥
परि हे असती यवन प्रभु संतत दंग सुखाविलासांत ।
दासांपरि, न सुतांपरि, हिंदूंना हे प्रभू समजतात ॥ १५ ॥
कल्याणकरां झालें आहे दे माय धरणि ठाय असें ।
सोडविल्याविण त्यांना स्वस्थ मला बैसवेल सांग कसें? ॥१६॥
आगंतुक यवन इथें, यजमानपणा अलज्ज गाजविती ।
दुर्वर्तनें तयांचीं आबाजी, सांगु सांग तूज किती ? ॥ १७ ॥
हे यवन वसोत इथें, परि बंधुत्वास ठेवुनी चित्तीं ।
हिंदूशीं हे प्रेमें होउत वाटेकरी सुखीं वित्तीं ॥ १८ ॥
परि यवन विसरती हें बंधुत्वाचें पदोपदीं नातें ।
तुजसे सहाय मिळतां निर्मद मी करुं शकेन रे त्यांतें ॥१९॥
यवनांच्या हातीं जें, आबा, कल्याण तें अकल्याण ।
कल्याण सार्थ करिं जा तेथें भगवें उभारुनि निशाण ॥ २० ॥
कल्याण सुभ्यामध्यें भगवा झेंडा उभार आबा, जा ।
घेउनि सैन्य पुरेंसें साधुनि ये शीघ्र या महाकाजा " ॥२१॥
आबाजिस शिवरायें यवनांवरि धाडिलें लढायास ।
असुरांवरि इंद्रानें जैसें सेनानि कार्तिकेयास[१२] ॥ २२ ॥
कल्याण सुभ्यावरि हा आबाजी शांत रीतिनें गेला ।
जलमार्गी स्थलमार्गी साऱ्या रोखोनि तो दिशा ठेला ॥ २३ ॥
आबाजीनें धाडुनि हेर सुभ्यांतील भेद आणविला ।
मग उघड वैर मांडुनि मौलानाला निरोप पाठविला ॥ २४ ॥
" शिवरायाचा सेनापति मी, मद्धस्तगत सुभा कर हा ।
नातरि सिद्ध रणा हो, हिंदूंचें अतुल शौर्य वीर्य पहा" ॥२५॥

---

१२ देवांचा सेनापति जो त्याला.

आबास अहमदानें पाठविला उलट यापरि निरोप ।
" तूं काफिर, मज सर्पा तुडवुनि कां व्यर्थ आणिसी कोप ? ॥२६॥
मौलाना अहमद मी हरि, तूं गजशाव[13], उगीच वडवडसी ।
ये काफिरा शरण मज, नातरि वासूनि तोंड तूं पडसी ॥ २७ ॥
धेनूच्या चालाव्या कैशा रे खाटिकापुढें गमजा ? ।
त्वद्देहाचे तुकडे करणें ही तव पुरे मदास सजा[14] ॥ २८ ॥
तव मद शिगेस चढला, कोपविसी व्यर्थ मजासि आवाजी ।
ठाक उभा संग्रामा, ये तुजला हात दावितों आजी " ॥ २९ ॥
येतां निरोप उलटुनि मौलाना अहमदाकडून असा ।
आबा रणार्थ उठला, हिंदूला यवनमद रुचेल कसा ? ॥३० ॥
संग्राम जाहला तो श्रोत्यांना विस्तरें न कळवीन ।
झाले यवन पराजित, कीं ते होते खरेच बलहीन ॥ ३१ ॥
कल्याण सुभा जिणिला आवाजीनें समस्त लवलाहें ।
जिकडे तिकडे भगवा झेंडा फडकत समीरणीं राहे ॥ ३२ ॥
आबाचें बल भांगीन, त्यास पराभविन, संयत करीन ।
ही यवनाशा जिरली, अनुभवि तो ती दशा स्वयें दीन ॥३३ ॥
मौलाना अहमद तो संयत[15] केला, न निहत[16] आबानें ।
त्याच्या अधिकाराला योग्य अशा त्यास वागवुनि मानें ॥ ३४ ॥
जे लोक शरण आले त्यांस दिलें जीवदान आबानें ।
जे कलहांत न शिरले त्यां केलें शांत अभयदानानें ॥ ३५ ॥
ह्या विजयाची वार्ता आबानें कळविली शिवाजीस– ।
धाडुनि चर आधीं, मग रायाच्या तोहि जाय भेटीस ॥३६॥

२

मौलानाची होती रूपवती सून, रति जणों दुसरी ।
लीला नाम तियेचें, दिसली आबास त्याचियाच घरीं ॥ ३७ ॥
सौंदर्यनदी, यौवनमूर्ती, कर्पूरवर्ति[17] नयनाला ।
विधिनिर्माणकुशलता आबाच्या येइ दृष्टिपथिं बाला ॥ ३८ ॥
ही युवती दिसतांक्षणिं आबाजीनें विचार मनिं केला ।
"होइल तुष्ट धनी मम, त्यासाचि देईन भेट लीलेला ॥ ३९ ॥

---

१३ हतीचें पिल्लूं. १४ शिक्षा. १५ कैदी. १६ ठार. १७ कापराची वात.

विधिचातुरी सदेहा, जननेत्रां कौमुदीच ही बाला ।
मदनविलासा वसती, धन्य खचित ती करील शिवबाला ॥ ४० ॥
मोहक मुख, गोंडस वपु, तरल[18] विलोकित, विलासयुत गमन ।
भाषण गोड इचें, शिवरायाचें तोषवील नित्य मन ॥ ४१ ॥
लावण्यमधुपरिप्लुतें[19] शिवरायविलोचनाद्विरेफांस[20] ।
ह्या यवनी रमणीचें मुख देइल खचित निर्भरसुखास[21]" ॥ ४२ ॥
ठेवूनि रक्षणास्तव सैन्य सुभ्याच्या शिवास भेटाया ।
आबा उठला तेथुनि कालाच्या न व्यया करुनि वाया ॥ ४३ ॥
लीलेला घेउनि तो आला भेटावयास शिवबाला ।
त्यानें वंदन केलें स्वामीच्या स्पर्शुनी शुभ पदाला ॥ ४४ ॥
आवास पाहतांक्षणिं शिवराया पावुनी परम हर्ष ।
वदला, " तुजसे सत्सुत असतां ही भू बघेल उत्कर्ष " ॥ ४५ ॥
कल्याण सुभा कैसा जिणिला हें विस्तरें निवेदून ।
आबानें शिवबाच्या आनंद दिला मनाप्रति अनून[22] ॥ ४६ ॥
वृत्तान्त आयकुनि तो शिवबाला वाटलें समाधान ।
मग वदला शिव, " आबा, मजसि तुझा वाटतोच अभिमान ॥ ४७ ॥
हे यवन आर्यभूला छळिती हें प्रखर शल्य मज सलतें ।
तव धन्यवाद गावे तितुके थोडे असेंच मज गमतें ॥ ४८ ॥
तुजसे मम साहाय्या जर दैवें वीर लाधले शतशा ।
तर आर्यभूमिची मी नष्ट करिन ही असह्य दीन दशा ॥ ४९ ॥
कल्याण तें न खेडें, आर्य महीचेंच मूर्त[23] कल्याण ।
तें परत आणुनी त्वां मातेच्या देहिं घातला प्राण ॥ ५० ॥
कल्याण आर्यभूचें जें होतें सुचिर यवनहस्तगत ।
तें शौर्यें चातुर्यें हिसकावुनि आणिलें तुवां परत ॥ ५१ ॥
तुज योग्य पारितोषिक देइन, कीं येसि[24] होउनी विजयी ।
परि धन्यवाद देणें करितों इतुकेंच आज ह्या समयीं " ५२ ॥

---

१८ चंचल. १९ सौंदर्य रूपी मधानें डबडबलेलें. २० शिवाजाचे डोळे हेच कोणी भुंगे. २१ आतिशय सुख. २२ पुष्कळ. २३ मूर्तिमंत. २४येत आहेस ह्म० आला आहेस.

हा योग्य समय ऐसें जाणुनि लीलेस आणवुनि पुढती– ।
वदला आबा, " घ्या ही वाला, पुरवा मदीय ही विनती " ॥ ५३॥
लीलेच्या सौंदर्यें झाला आश्चर्यचकित शिवराया ।
विधिनिर्मित कौतुक हें स्तब्धक्रिये[२५] करि मुहूर्त[२६] तत्काया ॥ ५४ ॥
क्षणभराचि विलोकुनि हा विधिनिर्मितिकुशलतापरमसार[२७] ।
वसला स्तब्ध करित तो वोलावें काय हा मनिं विचार ॥ ५५ ॥
लीलेच्या सौंदर्यें जन तेथिल इतर जाहले चकित ।
वसले वघत तिजकडे करुनि दृशा जणुं निमेषवलरहित ॥ ५६ ॥
जन म्हणाति मनीं "कौशिक गलितव्रत बघुनि मेनका झाला ।
ही मोहविल लीला काय न संसारमग्न शिवबाला ?" ॥ ५७ ॥
मग लीलेला कांहीं वैसवुनी अंतरावरी दूर ।
शिवबा वदला समरीं तैसा नयरक्षणींहि जो शूर ॥ ५८ ॥
" तूं मजला भक्तीनें ही देऊं भेट पाहसी वाला ।
गुण काय बघुनि माझे ठायीं त्वन्मनिं विचार हा आला ? ५९ ॥
नेत्रें विशाल तैजस, अधर रुधिर, देह केतकाभ इचें ।
शकती मोहूं न मला, विषयाग्निमुखें[२८] न साधुहीर पिचे ॥ ६० ॥
न त्वद्वर्तन कोपं, परि आश्चर्येंच मम मनास भरी ।
कीं मत्सहवासीं तूं असुनिहि कळलों तुला न आजवरी ।६१॥
धिङ् मम चारित्र्या कीं गमलों मी ह्या उपायना उचित ।
स्वीकारिन मी ईतें हा ग्रह तव मद्यशा मळावि खचित ॥ ६२ ॥
नवलचि हें कीं असुनी तूं प्रभु कायस्थ चांद्रसेनीय ।
कळली तुला न शुचिता चारित्र्याची परावधि[२९] मदीय ॥ ६३॥
कायस्थ प्रभु मानवहृदयपरीक्षण करी, चुके न कधीं ।
परि चुकली रत्नींशी मंदाची दृष्टि मद्धृदयिं तव धी ॥ ६४ ॥

---

२५ निश्चल. २६ क्षणभर. २७ ब्रह्मदेवाच्या निर्माणकौशल्याचा उत्कर्ष. २८ भोग्य वस्तु हेच कोणी ढेकूण त्यांच्या योगानें साधुपुरुष हाच कोणी हिरा तो भंगत नाहीं. ढेकणाच्या स्पर्शानें हिरा पिचतो अशी समजूत आहे. २९ पराकाष्ठेचा.

मम कोणत्या कृतीनें द्यावा ही भेट वळविलें तुजसी ? ।
भलत्याला भलती तूं अर्पण वस्तू कशी करूं बघसी ? ॥६५॥
ज्वरिताला पय देशी, मणिकांचनभूषणें विरक्ताला ।
अंधाला दर्पण कीं, आबा, ही मजासि देउनी बाला ॥ ६६ ॥
गंगाजलसें मम मन शुचि, तें शुचिता कधीं न सोडील ।
या बालेचें मजला सौंदर्य न लवहि मोह पाडील ॥ ६७ ॥
सौंदर्यबडिशीं[३०] टाकुनि मज मीना नयसरामधुंनि[३१] खेची ।
तो वारणा बिसानें[३२] बांधुनि खिळवावया स्वबल वेची ॥६८॥
सौंदर्य मला भुलविल जर विझविल चुलुकमित[३३] जल दवास[३४] ।
करतल लपवील रविस, कीं टिटवी आटविल समुद्रास ॥६९॥
रविनें ताप त्यजिला तर मी स्पर्शीन ह्या कुमारीला ।
मज जननीपरि वंद्या, हृद्या[३५] भगिनी सुतेपरी लीला ॥ ७० ॥
अबलेचा छल करणें हें विरुद नव्हेच ह्या शिवाजीचें ।
तें करणें हारविणें सौभाग्य मदीय विभवलक्ष्मीचें ॥ ७१ ॥
ह्या बालेचें बघतों डोळ्यांनीं रूप मी मनोहारी ।
विधिनिर्मिति ही प्रेक्ष्या, परि न स्पृश्या म्हणे मन विचारीं॥७२
देशास्तव शत्रूशीं प्रच्छन्न[३६] कधीं, कधीं उघड वैर—।
करणें उचित असें तरि उचित नसे नीति वहकणें स्वैर ।७३॥
विषयसुखास्वादार्थ न, जनहितकरणार्थ हा मदवतार ।
अवतार कृत्य हें कीं यवन प्रभु दूर लोटणें पार ॥ ७४ ॥
मी जातीचा क्षत्रिय, चातुर्वर्ण्यादिरक्षणा झटणें ।
हें मत्कर्तव्य असे, हें करणें हेंच मम असे जगणें ॥ ७५ ॥
गोब्राह्मणावनास्तव देशाचा मी करीन उद्धार ।
मी क्षत्रिय, या योगें मज्जन्म करीन मी फलितसार[३७] ॥ ७६ ॥
माझे ठायीं आहे जें अल्प स्वल्प वीर्य आबाजी ।

---

३० मासे पकडावयाचा गळ. ३१ नीति हेंच कोणी सरोवर त्यांतून. ३२ कमळाच्या देठानें. ३३ चुळकाभर. ३४ वणव्याला. ३५ प्रिय. ३६ गुप्त. ३७ सार्थ, सफल.

तें मी वेंचीन सदा गोविप्रावन अशा महाकार्जी ।। ७७ ।।
माझी माता असती अर्धांशेंही सुरेख इजमानें ।
तर मी तत्सुत नसतों आहें इतुका कुरूप रूपानें ।। ७८ ।।
ही बाला मधुर असे, परि मज ती जेंवि तुळस गणपतिला[३८] ।
जननी, भगिनी, कन्या, यांपरि ती वाटतेच मम मतिला ।। ७९ ।
जननीपरि, भगिनीपरि, कन्येपरि ही प्रिया मला यवनी ।
न विलासिनीपरी; हा तव न उदेला कसा विचार मनीं? ।। ८० ।।
जननीभगिनीकन्यापदिं उचित, विलासिनीपदिं न व्हावी ।
देवाच्या मूर्तीनें पुंगी[३९] खायास केंवि फोडावी ? ।। ८१ ।।
आबाजी, तूं बहु दिन माझें वर्तन पहात आलास ।
परि वोळखिलें कैसें न कळे त्वां मन्मनःशुचित्वास ? ।। ८२ ।।
क्रूराशीं क्रौर्य करिन, समरीं शतसंख्य वीरहि वधीन ।
कपट्याशीं कपट करिन, परि अकलत्रा[४०] न भोग्य भावीन ।। ८३ ।।
झालें तें झालें, परि पुनरपि ऐसें करूं नको कृत्य ।
कीं तें चारित्र्याला माझ्या लावील डाग हें सत्य ।। ८४ ।।
परिजनसंरक्षित[४१] ही सुखवो जनकास पतिस भेटोन ।
तर त्यांकडे इला तूं धाडुनि दे, कालहरण होओ न " ।। ८५ ।।
मग लीलेला वदला आश्वासनपर असें वचन राया ।
" स्वजनांकडे तुजसि मी पाठवितों, जा तयांस भेटाया ।। ८६ ।।
परिवार तुला देतों, त्यासंगें शीघ्र जा स्वकीय घरीं ।
आप्तांस भेट देउनि लीले, वंदुनि सुखाढ्य त्यांस करीं ।। ८७ ।।
जा मेहुण्यास माझ्या, कीं माझ्या जांवयास धन्य करीं ।
घडलें वृत्त इथें तें विसरुनि लीले, मनीं न कोप धरीं " ।। ८८ ।।
ऐसें वदुनि शिवें तिज परिवार महार्ह भूषणें वित्तें ।
यांसह निरोप दिधला, ती जाया सिद्ध हो अभय चित्तें ।। ८९ ।।
पर्यवसानें[४२] सुखाचें झाल्यानें तोषली मनीं लीला ।

---

३८ गणपतीला तुळस वाहात नाहीत ( फक्त गणेशचतुर्थीला वाहतात. येथें अपवाद घ्यावयाचा नाहीं. ) ३९ सुपारी. ४० पत्नी नव्हे अशा स्त्रीला. ४१ लव्याजम्यानें राक्षिलेली. ४२ शेवट.

मग ती गेली करुनी जनकास तशी शिवाजिस नतीला ॥ ९० ॥
नर तोचि शुद्ध गणिजे काया वाचा मनांत जो शुद्ध ।
ह्या सरणीच्या गेला शिवबा न कधींहि लेशहि विरुद्ध ॥ ९१ ॥
लीले, तूं धन्य खरी, व्याघ्रविलीं भीत भीत आलीस ।
व्याघ्रमुखीं पडलीस न, जीवदयामूर्ति बघुनि धालीस ॥ ९२ ॥

महाराष्ट्रामध्यें अगणित गुणीं जो झळकला,
मऱ्हाठ्यांची ज्याणें जगिं पसरिली कीर्ति विमला ।
तयाच्या पावित्र्यें स्थिर पद[43] करावें जनमनीं,
अशा बोधा विद्याधर कवि करी ह्या स्वकवनीं ॥ ९३ ॥
शिवाजीच्या शुचित्वाची कथा वामननंदन ।
सांगे ती सर्व लोकांचें नीत्युन्मुख करो मन ॥ ९४ ॥

---

# चित्रचातुरी.

कथानक.

शुचि आणि रुचि ह्या नांवांच्या दोन चितान्यांमध्यें कौशल्य श्रेष्ठतर कोणाचें, ह्या बाबतींत वादविवाद झाला. परस्परांनीं परस्परांच्या चित्रांतील दोष काढले, आणि आपआपली कारागिरी अधिक आहे, असें प्रत्येक म्हणूं लागला. शेवटीं असें ठरलें कीं श्रेष्ठतरत्वाचा निर्णय करण्यासाठीं प्रत्येकानें एक एक चित्र तयार करावें व ज्याचें चित्र उत्कृष्ट ठरेल, तोच उत्कृष्ट चितकार समजावा. शुचीनें एक द्राक्षांचा घोंस काढिला. तो इतका हुबेहुब साधला होता कीं तो खरा समजून पक्षी त्यावर चोंची मारूं लागले. रुचीनें भिंतीवर एक पडदा काढिला. तोही इतका उत्तम साधला होता, कीं त्याला शुचि देखील फसला. शुचीच्या चित्रास निर्बुद्ध पक्षी फसले, परंतु रुचीच्या चित्रास शुचीही,—ज्याला चित्रकलेचें पूर्ण ज्ञान होतें,—तोही फसला. ह्यावरून रुचीची कारागिरी श्रेष्ठतर ठरली. हा विषय ह्या काव्यांत आहे.

---

४३ भक्कम ठाणें.

चित्रचातुरी म्हणजे चित्रें काढण्याचे बाबतींत कौशल्य.

वृत्त दोहा किंवा दोहरा.

पूर्वि चितारी मणिपुरीं होते दोन रहात ।
चित्रालेखनिं त्यांचिया परि ते अति निष्णात ॥ १ ॥
त्यांची न सरी कोणिही शकले पावायास ।
मग सदृशीचें बोलणें वायां गोष्ट कशास?॥ २ ॥
चित्रें काढुनि विकुनि तीं पैसा ते मिळवीत ।
त्यांची होती हीच हो निर्वाहाची रीत ॥ ३ ॥
प्रमाणशुद्धा तत्कृती, रंगांनीं अति गोड ।
सारे जन वाखाणिती, कीं तींत नसे खोड ॥ ४ ॥
मत्सरही त्यांच्या कृती बघतां जाइ जिरून ।
कीं त्या भिन्ना नोव्हत्या सत्य निसर्गाहून ॥ ५ ॥
एकहि ऐसें नोव्हतें गृह त्या मणिनगरांत ।
शोभादायक नोव्हतीं त्यांचीं चित्रें ज्यांत ॥ ६ ॥
चित्रें त्यांचीं टांगलीं होतीं राजगृहांत ।
सद्वस्तूचा सर्वदा गौरव होइ दहांत ॥ ७ ॥
देवांच्याही आलयीं तच्चित्रें बहुसाल-।
शोभत होतीं सर्वदा सुंदर भव्य विशाल ॥ ८ ॥
मानव, पशु, वैसारणे[1], द्विजे[2], किंवा त्रिदिवेशे[3] ।
काढियले जे जे तयीं, दोष तयांत न लेश ॥ ९ ॥
त्यांणीं आकृति काढिल्या त्या साऱ्या रमणीय ।
परमावधिला पोचलें नैपुण शुद्ध तदीय॥ १० ॥
त्यांच्या चित्रांतिल नद्या, पर्वत, पारावारे[4] ।
वृक्ष, अरण्यें, गव्हरें, दिसलें सुंदर फार ॥ ११ ॥
विस्तरें[5] राहों; एकदा पाहों नदिचा कांठ- ।
गेले, तेथें जाहली त्या दोघांची गांठ ॥ १२ ॥
तेथ तयांचीं भाषणें त्या समयास रसाल-।
जीं झालीं, तीं ऐकुनि जन हो प्रमुदित व्हाल ॥ १३

१ मासे. २ पक्षी. ३ देव. ४ समुद्र. ५ पाल्हाळ.

चित्रकला हा तेधवां होता विषय तदीय ।
त्यावर त्यांचें बोलणें झालें अति रमणीय ॥ १४ ॥
मत्सर नव्हता आपणीं, होता शुद्ध विनोद ।
तो ऐकियला तूमच्या भरिल मनीं आमोद ॥ १५ ॥
एकेकानें आपुलें वर्णुनि नैपुण फार ।
दुसऱ्याची कृति निंदिली देउनियां आधार ॥ १६ ॥
रुचिनें शुचिच्या दाविली आलेख्यांत[६] उणीव ।
मान्य करीना ती शुची, दावी रोष अतीव ॥ १७ ॥
शुचिनेंही रुचिच्या कृती निंदियल्या अतिमात्र[७] ।
पुष्कळ दावुनियां स्थळें जीं दोषाला पात्र ॥ १८ ॥
वदला रुचिला तो शुचि निंदात्मक वचनास ।
वचन परी तें झोंबलें रुचिच्या नैव मनास ॥ १९ ॥
" प्रमाणशुद्धा एकही स्वत्कृति नैव दिसेल ।
वर्णयोजना[८] सृष्टिच्या वस्तूशीं न जुळेल ॥ २० ॥
मजेपक्षां आलेखनीं[९] त्वत्कौशल्य न थोर ।
मोरापेक्षां नर्तनीं अधिक नसे लांडोर " ॥ २१ ॥
शुचिचें हें वच ऐकुनी रुचि वदला हे बोल ।
" मित्रा, तव हें बोलणें मजला गमतें फोल ॥ २२ ॥
माझ्या आलेख्यांतला सत्य असे अनुभाव[१०] ।
अनादराला त्यांचिया न बुधांस मिळे ठाव ॥ २३ ॥
चित्ताकर्षक एकही मित्रा, त्वत्कृति दाव ।
एकाही त्वत्कृतिमधें शुद्ध नसे अनुभाव ॥ २४ ॥
दोष नसो त्वत्कृतिमधें, मधुर न त्यांत उठाव ।
भुलवि मना जें चित्र तें एक तरी तव दाव ॥ २५ ॥
मत्कृतिपुढतीं त्वत्कृति एकहि पळ न टिकेल ।
स्पर्धा शुद्ध घृतासवें करिल कधींहि न तेल "॥ २६ ॥

---

६ चित्रांत.　७ अतिशय.　८ रंगांचा उपयोग.　९ चित्रें काढण्यांत.
१० मनांतील विकारांचा देखावा.

शुचिला रुचिवच जाहलें मान्य न हें लवलेश ।
म्हणुनि वदे तो, " गा रुचे, नेणसि मम उद्देश " ॥ २७ ॥
रुचि वदला शुचिला पुन्हा, शुचिही रुचिला फार ।
क्रमें क्रमें हें जाहलें संभाषण अनिवार ॥२८॥
बहु झाल्यावरि वाद हा वदला रुचि हे मातें[11] ।
व्यर्थ कशाला वाद हा अर्थ न अल्प जयांत ? ॥ २९ ॥
मदधिक तूं किंवा सख्या, त्वदधिक मी हा वाद ।
ऐसा चालुनि आपणां होइल बहुत विषाद ॥ ३० ॥
ठरवायास्तव आपुलें नैपुण चित्रांतील ।
सुचते मजला युक्ति ही; निर्णय तीच करील ॥ ३१ ॥
एक चित्र मी काढितों; काढीं तूंही एक ।
नैपुण्याचा आपुल्या तेणें होउ विवेक[12] " ॥ ३२ ॥
मान्या झाली युक्ति ही शुचिच्या फार मनास ।
सरला तत्क्षणिं वाद तो नव्हता अंत जयास ॥ ३३ ॥
ठरलें कीं, दावावया पटुतेचा अतिरेक ।
चित्रें काढावीं तयीं एकेकानें एक ॥ ३४ ॥
चित्रें तीं अमक्या दिनीं व्हावीं दोन्ही पूर्ण ।
हें ते ठरवुनि चालते झाले स्वगृहा तूर्ण ॥ ३५ ॥
शुचिनें घेउनि काळजी, वेंचुनि पाटव सर्व ।
चित्र काढिलें व्हावया गर्व रुचीचा खर्व[13] ॥ ३६ ॥
ठरल्या दिवसा जाहलें चित्र शुचीचें पूर्ण ।
तें गृहभित्तिस लाविलें बाहेर तयें तूर्ण ॥ ३७ ॥
चित्र तिथें तें देखुनी, झाला हर्ष तयास ।
मग गर्वानें रुचिचिया गेला तो सदनास ॥ ३८ ॥
वदला यापरि शुचि तया, " झालें आहे पूर्ण– ।
मच्चित्र, पहायास तें चल मत्सदना तूर्ण ॥ ३९ ॥
मच्चित्र बघाया रुचे, ये माझ्या सदनास ।
व्हावें त्वां मन्नैपुणा देखुनि माझा दास ॥ ४० ॥

११ भाषण. १२ निर्णय. १३ नाहींसा, भग्न.

माच्चित्रांतिल दावितों ये तुजला कौशल्य ।
तें बघतां त्वन्मानसा वेधिल मत्सरशल्य"॥ ४१ ॥
रुचि गेला शुचिच्या गृहा मग देखाया चित्र ।
शुचिनें मार्गीं वर्णिलें निज कौशल्य विचित्र ॥ ४२ ॥
गृहास दोघे पोचतां शुचि वदला मित्रास–।
" आपण दोघे ये वसूं लपुनी या स्थानास " ॥ ४३ ॥
तेथें बसल्यावरि वदे शुचि मित्रा हे बोल ।
" गृहभित्तीवरि माझिया पाहुनि चित्रा डोल । ॥ ४४ ॥
माध्वीकांचा[1] देख तो गोंडस घोस रसाल ।
वर्णांची[2] जुळणी पहा सलक्ष्य किंचित्काल ॥ ४५ ॥
हिरव्या वर्णावरिल तो वर्ण पहा रे श्वेत ।
वद येतें हें त्वन्मना किंवा नाहीं येत ? ॥ ४५ ॥
छायेची बघ चातुरी, कीं फलकवचांतून–।
दिसतो थबथबला फलाभ्यंतरिं सुरस अनूनें[3] ॥ ४७ ॥
घोस पहा तो निमुळता, शाखा, पर्णें, नीट ।
मित्रा, बघ तो बारका पर्णावरचा कीट ॥ ४८ ॥
सत्य निसर्गीतिल जसा माध्वीकांचा वृंद[4] ।
तसाच माच्चित्रांतला दे न कुणा आनंद ?" ॥ ४९ ॥
बोलत असतां हें शुची, आला शुकसमुदाय ।
तो माध्वीकांच्याकडे रसलोभानें जाय ॥ ५० ॥
प्रत्येकानें चंचुचा घोसावरि आघात–।
केला लोभानें अहो खाया रस जो त्यांत ॥ ५१ ॥
त्या घोसांत न बिंदुही रस ते शुक लाहून–।
नैराश्यें आल्या पथें गेले शीघ्र निघून ॥ ५१ ॥
गर्वानें फुगला शुची दावूनि चमत्कार ।
रुचिला वदला, " गा सख्या, म्हण हें पाटव फार ॥ ५३ ॥
माध्वीकांचा घोस हा चित्रालिखित मदीय–।
भुलवी पक्ष्यांचीं मनें कीं तो अति रमणीय ॥ ५४ ॥

१ द्राक्षांचा. २ रंगांची. ३ पुष्कळ. ४ घोस.

चित्रकलानैपुण्य जें तें म्हणतों मीं हेंच ।
माझें पाहुनि चित्र हें उतरावा[1] तव रेंच" ॥ ५५ ॥
शुचिचें वच हें ऐकुनि वद्ला रुचि हें त्यास ।
" माझेंही वघ चित्र तूं, ये रे मत्सदनास " ॥ ५६ ॥
गेले दोघे तेथुनी रुचिच्या मग सदनास ।
मग शुचिला वद्ला रुची " बघ ये मच्चित्रास ॥ ५७ ॥
या मार्गानें चल पुढें, मी येतों मागून ।
चित्र पहा तूं एकला लक्ष्य शुचे लावून " ॥ ५८ ॥
शुचि पुढतीं मग चालला, रुचिचित्र पहायास ।
त्याच्या मार्गीं जवनिका[2] दिसली एक तयास ॥ ५९ ॥
असेल तीच्या पलिकडे चित्र असें समजून ।
जाऊं लागे आंत तो तीतें सरकावून ॥ ६० ॥
बोटांनीं ती जवनिका पार्श्वीं[3] सारायास—।
शुचिनें केला कर पुढें, घाई झाली त्यास ॥ ६१ ॥
तों भिंतीवरि तन्नखें खरडुनि त्या समयास—।
कर्कश झाला ध्वनि, तयें विस्मित केलें त्यास ॥ ६२ ॥
होता रुचि मागें उभा तोही स्मित करि मंद ।
फसला शुचि हें पाहुनि झाला त्या आनंद ॥ ६३ ॥
शुचिही झाला तेधवां सत्रप[4] किंचित्काल ।
मग वद्ला मित्रास हें, " त्वत्कौशल्य विशाल ॥ ६४ ॥
माझ्या चित्रें फसविले बुद्धिविहीन विहंग ।
माध्वीकांचा घोंस ते देखुनि झाले दंग ॥ ६५ ॥
परि मी ज्ञानी एवढा चित्रकलानिष्णात–।
त्वच्चित्रानें फसविलों, खोटी हे नचि मात ॥ ६६ ॥
घड्या, दोर, मळ, सुरकुत्या, सुंदर ह्या अतिवेल ।
तव ही देखुनि जवनिका कोण न नर तोषेल ? ॥ ६७ ॥

---

१ तुझा गर्व कमी झालाच पाहिजे. २ पडदा. ३ बाजूला. ४ सलज्ज.

मदधिक मित्रा ! शतगुणें असती चित्रकलेंत ।
चित्रकलादेवीस तूं क्रीडाहेतुनिकेत[1] ॥ ६८ ॥
आजपासुनी तूं मला गुरुसा अतिमहनीय[2] ।
आजपासुनी तुजपुढें सरला गर्व मदीय ॥ ६९ ॥
लोह जणों मत्पाटव, त्वत्पाटव जणुं हेम ।
तव कोप नसो मजवरी संतत राहो प्रेम " ॥ ७० ॥
ऐसें बोलुनि आपुल्या गेला शुचि सदनास ।
रुचिगुरुलाभें[3] जाहला मोठा हर्ष तयास ॥ ७१ ॥
शुचिरुचिचित्रांचा पुरीं लोकांना वृत्तांत–।
कळला तेव्हां जाहले सारे हृष्ट नितान्त[4] ॥ ७२ ॥
रुचिची देखुनि जवनिका लोकांना आनंद–।
झाला, जैसा हो पिका पाहुनिया माकंदें[5] ॥ ७३ ॥
परि होता हा जवनिकादर्शनभव[6] आनंद–।
शुचिनिर्मत्सरतोद्भवानंदाहुनि[7] तो मंद ॥ ७४ ॥
शुचिची वृत्ती आदरा, मत्सर द्या सोडून ।
म्हणजे जन हो ह्या जगीं व्हाल भवें[8] नचि दूनें[9] ॥ ७५ ॥
" मत्सर सोडा " हा जना करि विद्याधर बोध ।
ह्या बोधाहुनि नाढळे उत्तम करितां शोध ॥ ७६ ॥

श्लोक.

षट्पदासि जशि कञ्जमाधुरी[10],
सज्जनासि तशि चित्रचातुरी–।
आवडो, अमलशांतिसंयुत[11]–
हा निरंतर असो उमासुत[12] ॥ ७७ ॥

---

१ विहार करावयाचें घर. २ परम पूज्य. ३ रुचिरूपी गुरु मिळाल्या मुळें. ४ अतिशय. ५ आम्रवृक्ष. ६ पडदा पाहून झालेला आनंद. ७शुचीची मत्सरशून्यता पाहून होणाऱ्या आनंदापेक्षां. ८ संसारानें. ९ पंडित. गाजलेले १० कमलरसाची गोडी. ११ शुद्ध शांतीनें. १२ विद्याधर कवि.

# पुढारी व्हावयाला लायक कोण ?

वृत्त आर्या.

जनहित मेरुपरि जया, स्वहित जया सर्षपापरी[1] वाटे ।
तोच पुरुष राष्ट्राला उदयाच्या न्यावया उचित वाटे ॥ १ ॥
जनहित महत्तम जया, निजहित लघुतम म्हणोनि समभाव[2] ।
तोच उचित अग्रेसर[3], मिळावि तांथें न पक्षपात लव वावें ॥ २ ॥
लोकांना सेवाया जो सिद्ध तयास लोक सेवील ।
सेवा जनांकडुनि जो इच्छिल त्या जन समस्त टाळील ॥ ३ ॥
लोकांची सेवा जो प्रेमें तत्पर असे करायाला ।
तोच शके वळवुं जना, तोच उचित लोकनायकपदाला ॥ ४ ॥
स्वार्थास लाथ मारुनि जनहितकरणींच जो झटे सतत ।
तोच जनाचा नायक होइल, त्याचें जना रुचेल मत ॥ ५ ॥
अग्रेसरत्व यावें माझ्याचकडे असा धरि न हेका ।
तो अग्रेसर व्हाया उचित असे, भजति जन तया एका ॥ ६ ॥
कष्टे देशहितास्तव, न स्वार्थास्तव, तयाकडे भावें[4]-।
जनता अयःशलाका[6] जैशी चुंबकमण्याकडे[7] धावे ॥ ७ ॥
सन्नायकहृदयीं[8] जनहित भरुनी निजहिता स्थळ न मिळतें ।
सूर्याचें तेज नभा शोभावि तेव्हां न तेथ तम शिरतें ॥ ८ ॥
संकट येतां लोटुनि अनुयायां त्यांत[9] दूर जो सरतो ।
तो नीच आंगराखू, अग्रेसरतापदास योग्य न तो ॥ ९ ॥
संकट दृष्टिपथिं न जों तों झोकी लांब लांब जो बाता ।
परि संकटिं दूर पळे तो अग्रेसर करी महा घाता ॥ १० ॥
तो जननायक व्हाया उचित असे जो न संकटांत हटे ।
त्यजुनि महत्त्वाकांक्षा ऐहिक देशार्थ जो अतंद्र[10] झटे ॥ ११ ॥
निज दोषांची ज्याला जाणीव पटे म्हणोनि नम्र असे ।
तो लावुनि देई ती, नान्य, जनाच्या प्रथा[11] मनांत ठसे ॥ १२ ॥

---

१ राईप्रमाणें. २ निःपक्षपाती. ३ पुढारी. ४ अवसर. ५ प्रेमानें. ६ लोखंडाची काडी. ७ लोहचुंबकाकडे. ८ योग्य जो पुढारी असेल त्याच्या अंतःकरणांत. ९ त्या संकटांत. १० निरलसपणें. ११ सरणी.

चालो देश सुमार्गे, मी मागें कीं पुढें क्षिति[१२] न मजला।
हें जो म्हणे महात्मा जनता त्यालाच अनुसरे सकला ॥ १३ ॥
तो धन्य वीर कीं जो रण जिंकुन सैनिकांस दे श्रेय।
ऐसा वीर असेल न कैसा साऱ्या जनांप्रति प्रेय[१३]? ॥ १४ ॥
न सुहृद्वर्गीचि केवळ, यच्चिंताविषय सर्व देश असे।
तो जननायक उत्तम, जनमनिं तत्कथित तत्त्व खोल ठसे ॥ १५ ॥
लोकांकडोनि व्हावी माझी सेवा असें अपेक्षीना।
त्याला लोक भजति कीं तन्मति निजवैभवस्पृहाहीना[१४] ॥ १६ ॥
एवंगुणगणमंडित पुरुष महात्मा जनां रुचे नेता।
कीं षड्रिपू तयाच्या शकति न करुं वसतिला सदन चेतो[१५] ॥ १७ ॥
मौलिक[१६] लावी सलिला त्याच पथें जाय आलवाला[१७] तें।
देशहिताचा दावी पुण्यात्मा तो पटे क्रम जनातें ॥ १८ ॥
परि नेता ह्या परिचा साहों मत्सर न देइ नीचास।
देई प्राण जगाला तो रवि अभिनंद्य हो न घूकास ॥ १९ ॥
अग्रेसरत्व जर मज द्याल तर मिळेन तुमचिया पक्षा।
हें जो म्हणे तयाला टाळुनि निज पक्ष बुध म्हणे रक्षा ॥ २० ॥
अग्रेसरमानास्तव जो ह्या कीं त्या धरील नर पक्षा।
तो पैशास्तव होइल खाया सिद्ध स्मशानिंची रक्षा ॥ २१ ॥
नरकीं होइन राजा, स्वर्गी दास न, अशा मनीषेचा।
नर अग्रेसर करितां अनुयायां लागती सदा ठेचा ॥ २२ ॥
मोठ्याचा अनुयायी होतां लघुतादशा डसोनि जया।
होउं लघूंत बघे जो मोठा जन अग्रणी करी न तया ॥ २३ ॥
सत्पक्षांत पुढारी होणें कालत्रयीं न शक्य मला।
म्हणुनि असत्पक्ष वरुनि त्या माना नर झटेल तो न भला ॥ २४ ॥
गूढेच्छा मनिं ज्याच्या पदवी, अधिकार, मान, धन यांची।
त्या अग्रणी न कवि करि, त्या स्थाना योग्यता नसे त्याची ॥ २५ ॥
खोटें सिद्ध कराया, अघपथरतामित्रमंतु[१८] झाकाया,।

---

१२परवा. १३प्रिय. १४स्वत:ची बडेजाव व्हावी अशा इच्छेनें विरहित. १५त्याच्या अंत:करणाला षड्रिपु स्वत:ला राहावयाचें घर करीत नाहींत. १६माळी. १७आळ्याकडे. १८ पापाच्या मार्गांत आनंद पावणाऱ्या मित्रांचे अपराध लपविण्यासाठीं.

लाचानें मत द्यावा, वळतो तो उचित नायक न व्हावा ॥ २६ ॥
लाभार्थीच चिकित्सा करि, सत्याची न पक्ष धरितांना ।
तो स्वार्थी, तो अनुचित अग्रेसर, मान्य होइ न बुधांना ॥ २७ ॥
अग्रणी कोणचा योग्य राष्ट्रोद्धाराचिया पथीं ।
अयोग्य कोणचा हेंही विद्याधर जनां कथी ॥ २८ ॥

---

# काककाणता.

## कथानक.

श्रीमद्वाल्मीकिकृत रामायणाच्या अयोध्याकांडांत सर्ग ९५ आणि ९६ ह्यांच्या दरम्यान जो प्रक्षिप्त सर्ग आहे, त्यांतील ३४ ते ५७ ह्या श्लोकांचा आधार घेऊन आम्ही पुढील कृति केली आहे.

श्री रामचंद्र वनवासांत असतां एके समयीं एका कावळ्यानें सीतेला उपद्रव दिला, म्हणून त्याला दण्ड करावयासाठीं श्रीरामचंद्रानें त्यावेवर ईषीकास्त्र सोडिलें. तेणेंकरून त्याचा एक डोळा फुटून त्याला काणता ( म्ह. एकाक्षता) आली. हा मजकूर पुढील कवितेंत ग्रथित केला आहे.

वृत्त अनुष्टुभ्

ससोदर सहस्त्रीक चित्रकूटीं रघूद्वह ।
राहे मुनिमनीं जैसा शम वेदस्मृतींसह ॥
हीं तिघें राहिलीं तेथें हर्षनिर्भर मानसें ।
पीडाकर असें कांहीं तेथें होत तयां नसे ॥ २ ॥
एकदा लक्ष्मणें शुद्ध बाणांहीं दश मारिले ।
भोजना मृग आणोनी जानकीप्रति अर्पिले ॥ ३ ॥
आहारपरिमाणानें तिणें तन्मांस रांधिलें ।
मग रामें यथाचार भूतांतें भाग वोपिले ॥ ४ ॥
सानुजें मग तें रामें सुपक्कामिष भक्षिलें ।
स्वादिष्ट मिष्ट तें खाद्य सीतेनें मग सेविलें ॥ ५ ॥
भक्षणास्तव जें मांस रांधिलें नव्हतें असें ।

---

१ तीक्ष्ण.

वाळाया आतपीं[२] सीता ठेवोनी रक्षणा वसे ॥ ६ ॥
मांसलोभें तिथें आला कोणी किंकाक[३] सत्वर ।
धूर्त जैसा, परद्रव्यजिघृक्षेनें[४] पटच्चर[५] ॥ ७ ॥
परि मांसाहुनि तया सीता हृद्यतरा[६] गमे ।
तियेचें देहलावण्य देखतां बहु तो रमे ॥ ८ ॥
कोठें साध्वी दुराधर्षा[७] ? कोठें तो क्षुद्र वायस ? ।
शिरस्थ मणि सर्पाचा तो काढूं करि मानस ॥ ९ ॥
भुलला पाहुनी भारी तीच्या मृदुल विग्रहा[८] ।
तीच्या शिरीं करीं स्कंधीं वसे निस्त्रप[९] काक हा ॥ १० ॥
चंचुघर्षण धृष्टत्वें करी तो तदुरःस्थलीं ।
न सोडी त्या सुगात्रीला जरी ती त्यास हाकली ॥ ११ ॥
सीतोरःस्थलिं तो चंचू काकाचा दिसला तसा ।
हरिदंष्ट्रास्पर्शिकर[१०] भिल्लाचा दिसतो जसा ॥ १२ ॥
बोचोनि नखचंचूनीं, उडवोनि स्वपक्षती[११] ।
काकें आयासिलें नाना प्रकारें तिजला अती ॥ १३ ॥
मृद्वंगी भीरु अबला पीडेनें फार कावली ।
बहु यत्न तिणें केले परी मुक्त न जाहली ॥ १४ ॥
इकडे तिकडे सीता पळाली भयविव्हला ।
परि तो तिज सोडीना, तिच्या मागुनि धावला ॥ १५ ॥
धावे तन्वी, पळे, लोळे, ओरडे, आरडे, रडे ।
परी निर्लज्ज दुष्टात्मा जाई तोहि तिच्याकडे ॥ १६ ॥
ह्या काकवर्तनें रामचित्त कोपें तदा भरे ।
पति कोण शके पाहों स्त्रीधर्षण असें परें ? ॥ १७ ॥
अवनिस्था[१२] शरैषीका[१३] रामें उचलिली करीं ।
अभिमंत्रुनि ती केली जाया सिद्ध खगावरी ॥ १८ ॥

---

२ उन्हांत. ३ दुष्ट कावळा. ४ दुसऱ्याचें द्रव्य चोरण्याच्या इरादानें. ५ चोर. ६ अधिक प्रिय. ७ धर्षण करण्यास कठिण. ८ शरीराला. ९ निर्लज्ज. १० सिंहाच्या दाढांना स्पर्श करणारा हात. ११ आपले पंख. १२ जमीनीवरची. १३ गवताची काडी.

याकाचनें[१४] शरैषीका वीर्य उ[illegible]ती वरी[१५] ।
वीरें स्थापियला रामें वीर्यवन्मंत्र [illegible] ॥ १९ ॥
ईषीका[१६] ती वीर्यवती धावली त्या खगावर ।
पुढें तो चालला भीत तीहि मागुनि सत्वर ॥ २० ॥
अन्य होते तिथें काक तयांनीं हा उपेक्षिला ।
व्यसनीं[१७] पडला सांगा स्वजनें कोण रक्षिला? ॥ २१ ॥
वेगवान् मानिला वायु, वात्या अधिक मानिली ।
शरसंत्रस्त काकानें वात्याही दूर सारिली ॥ २२ ॥
काकवेगानुसारें तो अनुपृष्ठ[१८] निघे शर ।
राममंत्रबलाक्षिप्तां[१९] त्या शरा काय दुष्कर? ॥ २३ ॥
शरानुसृत तो काक स्वेदसंसिक्त[२०] जाहला ।
श्रमला, भागला, भ्याला, तापला, अनुतापलें[२१] ॥ २४ ॥
चुकवाया शरा काक जवें पळत सूटला ।
तो त्या रामशरव्याजें यमदण्डचि वाटला ॥ २५ ॥
सूं सूं ध्वनि करोनी तो काकामागुनि चालिला ।
बोधीत कीं परस्त्रीचा काम दंडार्ह मानिला ॥ २६ ॥
उडे काक पुढें वेगें, धावे मागुनि तो शर ।
काकवेगा न साहोनी तो धावे जणुं सत्वर ॥ २७ ॥
त्रैलोक्यीं हिंडला काक, परी मुक्ति न पावला ।
न पाहे तो शरैषीकेपासुनी रक्षणस्थला ॥ २८ ॥
जाओ वनीं, उडो शैलीं, चढो वा तो नभःस्थलीं ।
शरैषीका तयामागें तच्छायेपरि चालली ॥ २९ ॥
तयाला न त्रिभुवनीं मिळालें आश्रयस्थल ।
अगत्यें[२२] तो पुन्हा आला रामापाशींच दुर्बल ॥ ३० ॥
रामा तो शरणा काक येओनी तत्पदीं शिर— ।
ठेवोनी वदला ऐसें धरोनी मानुषी गिरा ॥ ३१ ॥

---

१४ क्षुल्लक. १५ मिळविती झाली. १६ काडी. १७ संकटांत. १८ पाठोपाठ. १९ फेकलेली, सोडलेली. २० घामानें भिजलेला. २१ पश्चात्ताप पावला. २२ नाइलाजानें.

" [२३]शरणं त्वां प्रपन्नोऽस्मि मां त्रायस्व सतां वर ।
इमां शीघ्रं शरैषीकां दयालो प्रतिसंहर " ॥ ३२ ॥
ह्या वचा ऐकुनी राम वदला शरणागता ।
" अमोघा मंत्रसामर्थ्यें ईषिका जाण तत्त्वतां ॥ ३३ ॥
कांहीं तरी तुझी हानी केल्याविण शमे न तीं ।
मत्पदावरि केली ती व्यर्था तव असे [२४]नती ॥ ३४ ॥
ईषीकेचें तोचि वीर्य जाण क्षम हरावया ।
जो शीतत्व कृशानूतें द्यावया शक्त गा ! [२८]वया ॥ ३५ ॥
जर व्हावे तुला प्राण एक अंग त्यजावया– ।
सिद्ध हो; हानि होओं दे; मान्य हो मद्वचास या " ॥ ३६ ॥
ऐकोनियां रामवच यापरी निग्रहोदित ।
काक तो बोलिला ऐसें विप्रतीसारकर्षित[२५] ॥ ३७ ॥
"प्रिय हे मजला प्राण तद्धानी नचि साहवे ।
सोडितों एक मी नेत्र कीं एकानेंहि पाहवे ॥ ३८ ॥
एका नेत्रांतिल मला तारका अपरीं अहा ।
न्यावया शक्ति दे रामा, पुरवीं मम काम हा" ॥ ३९ ॥
" तथास्तु " म्हणतां रामें शरैषीका जवें पडे– ।
काकैकनेत्रांत; फुटे तें, तया काणता जडे ॥ ४० ॥
काणत्वें टळले आज प्राणांवरिल सां[२६]कडें ।
म्हणोनी हर्षला काक पायां रामाचिया पडे ॥ ४१ ॥
मग तेथोनि तो काक गेला स्वसदनाप्रती ।
सीताही पतिसामर्थ्यें मानसीं हर्षली अती ॥ ४२ ॥

अर्पिलें कवन " काककाणता "
तें लहो बुधजनांत मान्यता ।
वामनात्मज कवीहि हा लहो
शांति सौख्य[२७]पदं निर्मला अहो ॥ ४३ ॥

---

२३ मी तुला शरण आलों आहें. हे साधूत्तमा, हे दयाळा, ही काडी परत घे
२४ वंदन. २५ पश्चात्ताप पावलेला. २६ संकट. २७ सुखाला हेतु. २८ हे पक्ष्या.

# जिताजित.

### वृत्त मन्दाक्रान्ता.

[ कोणचा देश जित म्हणावयाचा, आणि कोणचा देश अजित म्हणावयाचा, हें ह्या काव्यांत सांगितलें आहे. ]

देखों देश प्रसभें[1] जिणिले विक्रमाढ्यां[2] नृपांहीं,
हत्यायोगें क्षिति भिजविली शोणिताच्यां[3] प्रवाहीं ।
शस्त्रें अस्त्रें सकल हरिलीं निर्जितांची तयानीं,
त्या देशांतें तरि कवणही जेणिलेसे न मानी ॥ १ ॥
शस्त्रें सारीं हरुनि जरिही देश निःशस्त्र केले
होती नैव स्तिमितबल ते तत्त्वता जिंकियेले ।
शस्त्रें तीक्ष्णें हिसकुनि कधीं जिंकिजेति न देश,
शस्त्रांमध्यें प्रतिभय[4] असा नैव सामर्थ्यलेश ॥ २ ॥
घालो कारागृहिं[5] जित जना क्रूर जेता बलानें,
रोधो त्यांच्या चलनवलना शृंखलाबंधनानें ।
जेता ऐसें बलमदभरें क्रौर्यदर्पें करो तो,
तेणें देश प्रहत तरिही जिंकिलासा न होतो ॥ ३ ॥
कारावासें नर न जिणिजे, शृंखलाबंधनें वा ,
जों जेत्यानें मन न जिणिलें तों फुका लाभ केंवा[6] ।
कारा देहा, अवयवगणा शृंखला रोधिते कीं,
किंतु स्वेच्छागति[7] मन कधीं राहिना ठायिं एकीं ॥ ४ ॥
जेत्यांनों ! कां मनिं धरितसा व्यर्थ जेतृत्वगर्व ?
जिंका आधीं जितजनमना दर्प सांडोनि सर्व ।
जो जिंकील प्रभु जितमना तोचि मानास पात्र,
तो क्रव्याद[8] प्रभु गणियला जिंकि जो देहमात्र ॥ ५ ॥
खड्गें युद्धीं जय मिळवुनी, संघ घालोनि शोकीं,

---

१ सामर्थ्यानें. २ पराक्रमी. ३ रक्ताच्या. ४ भयंकर. ५ तुरुंगांत. ६ द्रव्याचा निधि. ७ इच्छेस येईल तिकडे भटकणारें. ८ राक्षस.

लाखों दीनां पकडुनि कुणी जिंकिला देश लोकीं ?
मानूं जेता बहुजनमनोरंजनीं जो समर्थ,
देहा जिंकी परि नचि मना तो न जेता सदर्थ ॥ ६ ॥
खड्गाघातें करुनि भयदा निर्जितप्राणहानी,
सत्य, न्याय्य, प्रिय तदितरां शब्द लावोनि मानीं ।
किंवा मान्यां श्वगणसमशी तुच्छता दाखवूनी
नाना देश स्फुट अजवरी जिंकिले किंप्रभूंनीं ॥ ७ ॥
बीजोच्छेदा, अनृत वचना, मानभंगा करूनी
देश प्राज्य प्रहतमतिंनीं जिंकिले किंप्रभूंनीं ।
त्यांचीं कृत्यें कधिहि न जगीं मान्यता पावतात,
तन्नामातें श्रवणिं पडतां लोक धिक्कारितात ॥ ८ ॥
जो राज्याला प्रभु असिबळें स्थैर्य आणूं बघेल
तो वाळूचा घडवुनि जिना स्वर्ग पाहूं उठेल ।
कीं होडीनें तरुनि उदधी पैल गांठूं सजेल,
कीं तंतूनें द्विरद खिळवूं कोळियाच्या निघेल ॥ ९ ॥
साधूंच्या जो जयपथ मना वाटला नित्य मान्य—
तो ऐका; तो जितजनमनोरंजनाहून नान्य ।
धर्में न्यायें पथ उचित तो सुप्रभु स्वीकरीतो,
स्वर्गीं देवां, क्षितिवरि नरां कौतुकें गाववीतो ॥ १० ॥
"जिताजित" समाख्याही विद्याधर करी कृती ।
तेणें तो शम लाहोनी निरंजन असो कृती ॥ ११ ॥

---

# स्मारकाचा उपयोग.

वृत्त उपजाति.

कुंभारवाड्यांत फिरावयाला गेलों; तिथें देखियली विशाला—।
त्यां मूर्ति एके स्थलिं गर्दभाची, सभोंवतीं आवलि चित्रकांची[१] ॥ १ ॥
झाला मला मूर्ति बघोन हर्ष कीं तींत होता पटुताप्रकर्ष[२] ।

---

९ कुतऱ्यांनाच योग्य अशी. १ एरंडांची. २ कौशल्याचा परमावधि.

प्रमाणशुद्धावयवांमुळें ती आश्चर्यहेतू मम होय चेतीं[३] ॥ २ ॥
थापोनि माती चिकणी प्रयासें केली अशी गर्दभमूर्ति भासे ।
तया पशूचे अति लंब कर्ण, नवाम्बुदश्याम तदीय वर्ण ॥ ३ ॥
ही मूर्ति केव्हां, कवणें, कशास केली वहू घेउनियां श्रमास- ।
हा प्रश्नही उद्भवला मनांत मी मूर्ति तेथें असतां पहात ॥ ४ ॥
शिला तदा म्यां अवलोकियेली जी तेथ होती दृढ रोवियेली ।
तत्पृष्ठभागावरि एक लेख होता, विशालाक्षर तो सुरेख ॥ ५ ॥
हा लेख वाचोनि मदन्तराची पृच्छा[४] निमाली मग एकदाची ।
कीं स्पष्ट तेणें मजला कळालें ह्या मूर्तिचें स्थापन केविं झालें ॥ ६ ॥
लेखांत ह्या वर्णसमुच्चयानें निर्देशिला अर्थ जसा धन्यानें ।
तसाच मी सर्व जनां वदेन, अपूर्णतासंभव[५] हा न एनें ॥ ७ ॥
" हें स्मारक प्राज्यतमें[६] प्रयासें केलें असें म्यां सुकुमारदासें ।
होता पशू तो प्रिय फार मातें, संमान हा योग्य असे तयातें ॥ ८ ॥
होते तयाचे जरि लांब पाय, त्यांनीं मला बोलविलें न 'हाय !' ॥९॥
होत्या तयाच्या अतिसौम्य लाथा, माझा तयांनीं दुखला न माथा ।
असो अती कर्णकठोर शब्द अन्या खरांचा जणुं काय अब्द[७] ।
मृदंगनादाहुनि गोड ह्याचा होता ध्वनी कोमल, सौम्य साचा " ॥१०॥
लेखाचिया नांव अधस्तलास होतें धन्याचें " सुकुमारदास " ।
तयेंच हें स्मारक बांधियेलें होतें असें त्यावरि बोधियेलें ॥ ११ ॥
हसें मला वाचुनि लेख आलें, मच्चित्तही कौतुकविद्ध झालें ।
अशी गुणग्राहकता जगांत नसे धन्याची; न असत्य मात ॥ १२ ॥
निमग्न मी स्मारकचिन्तनांत होओनि ठेलों कुतुकें पहात ।
कुंभार कोणी इतुक्यांत आला घेओनियां कुम्भ तया स्थलाला ॥१३॥
तयास मी " हा सुकुमारदास होता कुठें, स्मारक हें कशास ? ।
केव्हां ? किती लावुनियां धनास केलें तयें ?" हें पुशिलें सहास ॥१४॥
ऐकूनि हा प्रश्न मला म्हणाला कुंभार तो, "मी कथितों तुम्हाला ।
केलें जयें स्मारक हें तयाला होता मतिभ्रंश उदग्र झाला ॥ १५ ॥

---

३ अंतःकरणांत. ४ जिज्ञासा. ५ कमीपणाचा दोष. ६ फार. ७ मेघ. ८ वेड. ९ भयंकर.

ज्याची तुम्हां मूर्ति दिसे विशाल होता जनां कष्टद सर्व काल।
होता अती द्वाड, अती चुकार, तयें धन्या दुःख दिलें अपार ॥ १६ ॥
तयें धन्याच्या तनयास लाथा मारोनि केला विदीर्ण[10] माथा।
गेला अकालींच यमालयाला लोटोनि दुःखामधिं तो जनाला ॥ १७ ॥
तद्गर्जना कर्णकठोर भारी झाली सदा स्वापविभंगकारी[11]।
असंख्य त्यानें घट फोडियेले आम्ही श्रमें जे बहुसाल केले ॥ १८ ॥
तो द्वाड, तो दुष्ट पशू मरावा, दुःखौघ तेणें अमुचा सरावा।
असें सदा इच्छियलें जनानें, कीं दुःख त्यानें दिधलें न सानें ॥१९॥
एके दिनीं हा खर कुंभभारा घेओनि पृष्ठीं सजला विहारा।
तो नाचला, बागडला, वळाला, क्षणैक ठेला, उठला, पळाला ॥२०॥
क्षणोक्षणीं हे दिसले निराळे त्या गर्दभाचे अनिवार चाळे।
वासोनियां लांब पुढें मुखास प्रवृत्त झाला, मग गावयास ॥ २१ ॥
गंधर्व मी, मद्ध्वनि गोड फार, मी जाणतों गायनशास्त्रसार।
असा जणों गर्व खरास झाला, तो थांबवीना निज गायनाला ॥२२॥
केला धन्यानें लगुडप्रहार हे थांबवायास्तव वारवार।
न थांबले, वृद्धिस पावले ते, कृशानु आज्यें अतिवेल चेते ॥ २३ ॥
गेले धन्याचे श्रम सर्व वाया झटे जरी तो खर आळवाया।
प्रदर्शन प्रेक्षणयोग्य होतें, पहावयाला जन कां न यो तें? ॥ २४ ॥
गांवांतले सर्वहि लोक आले, बघोनि हें तांडव फार धाले।
लोकांचिया विस्तृत मंडलांत केले खरें पात महा निपात ॥ २५ ॥
उड्या खराच्या अतिउंच हो! त्या, उच्चैश्रव्यांलाहि[12] असाध्य होत्या।
अकुंठहेषाध्वनिही[13] मुखानें करीत होता भरला सुखानें ॥ २६ ॥
हें चालतां नृत्य असें विचित्र खणी क्षिती तत्खुर कीं खनित्रें[14]।
रजःकणांनीं भरिलें नभास, बघोनि झाले सगळ सहास ॥ २७ ॥
हें चालतां नृत्य अशा प्रकारें पृष्ठस्थ झाले घट भग्न सारे।
सोसे न संघात[15] तयां प्रचंड, झाले तयांचे तिलकल्प खंड ॥ २८ ॥
उद्दाम तो गर्दभ नाचतांना हसें मुळीं नावरलें जनांना।

---

१० फुटलेला. ११ झोंप मोडणारी. १२ इंद्राच्या घोड्याला. १३ एकसारखा होत असलेला हा खिंकाळण्याचा आवाज. १४ कुदळ. १५ तडाखे.

करीत हें नृत्य पुढें निघाला हा गर्दभ क्षिप्र[16] नदीतटाला ॥ २९ ॥
लत्ताप्रहारें जन रुग्ण झाले, समस्तही हास्य तदा निमालें ।
असो; पुढें नृत्यभरांत गर्तासंक्रांत[17] मेला बहुदुःखकर्ता ॥ ३० ॥
नाहीं असा एकहि कुम्भकार जो हर्षला तन्मृतिनें न फार ।
पीडा समग्रा टळली जनांची, विमुक्त झाले जन एकदाची ॥ ३१ ॥
सुखावला किंतु धनी न त्याचा, आला तयाला झटका पिशाचा[18] ।
पिटोनि डोकें रडला सदैव म्हणोनि ' हा हा ! मम काय दैव ॥३२॥
अशा प्रकारें दिन पांच गेले, शोकें तयाला नाचि सोडियेलें ।
पुढें तयें स्मारक चिंतिलें हें, धनार्थ केले श्रम फार देहें ॥ ३३ ॥
घरोघरीं जाउनि वित्त त्यानें संपादिलें वाढतम[19] श्रमानें ।
निर्बन्ध[20] त्यानें अतिमात्र केला, देऊनि आम्ही धंन टाळियेला ॥३४॥
त्यांतील कांहीं सुकुमारदासें संस्थापिलें गुप्त गृहांत भासें ।
मद्यांत कांहीं धन ओपियेलें, गंजागृहस्वामिस[21] तृप्त केलें ॥ ३५ ॥
पुढें खरस्मारक शेषवित्तें करावया मृण्मय हृष्ट चित्तें ।
सुदूरदेशाहुनि मूर्तिकार पाचारिला तो विनवून फार ॥ ३५ ॥
मूर्ती तयाच्या करवीं प्रयासें ही निर्मियेली सुकुमारदासें ।
एकाच न स्मारक हें खराचें, हें स्मारक प्रौढ खरद्वयाचें[22] " ॥ ३७ ॥

ह्या स्मारकाविषयिंचा सगळा प्रकार
जो देखिला, परिशिला स्थलिं ह्या ससार ।
विद्याधरें सरळ तो कथिला जनांस,
तो त्यांचिया प्रचुरबोधद हो मनास ॥३८॥

---

१६ लवकर. १७ खड्ड्यांत पडलेला. १८ वेडाचा. १९ फार. २० हेका, हट्ट. २१ दारूच्या गुत्याच्या मालकाला. २२ हें स्मारक एकट्या गाढवाचें नव्हे. गाढव आणि त्याचा मूर्ख धनी ह्या दोघांचेंही तें स्मारक होय.

# ज्ञानसंपदा.

ज्ञानरूपी संपत्ति इतर सर्व प्रकारच्या संपत्तींहून वरच्या प्रतीची आहे, हें ह्या काव्यांत वर्णिलें आहे.

वृत्त इंदुवदना.

ज्ञानधन सर्वहि धनापरिस थोर,
लेशहि नसे तदवनीं हृदयिं घोर।
संदुक नको तदवनास्तव नरास,
कांहिंहि पडे तदवनास्तव न यास ॥ १ ॥
ज्ञानधन सर्वहि धनापरिस थोर,
हें हरुं शके चतुरही कधिं न चोर।
लोहमय संदुकिंहि अन्यविध वित्त
ठेवुनिहि भीति भरितें सतत चित्त ॥ २ ॥
अन्य धन भीति हृदयीं उपजवीतें,
राजभय, चोरभय नित्य डवचीतें।
ज्ञानधन शुद्ध शमवर्धन करून
स्वर्गसुख चाखवि नराप्रति अनून ॥ ३ ॥
भूमिपति दुष्ट अतिवेल, मदपुष्ट,
पंडितवरावरि असो प्रखर रुष्ट।
ज्ञान न शके श्रम करूनहि हराया,
तच्छ्रम अनंत तरि जातिलचि वाया ॥ ४ ॥
पद्मसर आटविल रुष्ट विधि सारें,
कीं जल तयामधिलही करिल खारें, ।
दुग्धजलभेदकृतिपाटवविहीनें
होइ भुवि हंस रुसतां विधि कधीं न ॥ ५ ॥
ज्ञानधन देउनि सरेलाचि कधीं न,
अन्यधन देउनि धनी धनहीन।

१ त्याच्या रक्षणासाठीं. २ लोखंडी. ३ शांतीची वाढ. ४ फार. ५ कमळांचें सरोवर. ६ दूध आणि पाणी हीं पृथक् पृथक् करण्याच्या कामाचें जें कौशल्य, त्या कौशल्यानें विरहित.

ज्ञानधन देउनिच तें धन दुणावे,
अन्य देउनि हळुं हळुं उणावे ॥ ६ ॥
ज्ञानधन वृद्धि पवतें वितरणानें,
ज्यापरि नदीजळ सदा प्रवहणानें ।
क्षीण परि अन्यविध होइ धन दानें,
चंद्रवपुसें सुरकृतें अमृतपानें ॥ ७ ॥
ज्ञानधन दे वितरितां शम मनास,
अन्यधनदान पिळितेंच हृदयास ।
हें पथकरे नचि कधींहि मनुजास,
तें सतत हो परमसौख्यद मनास ॥ ८ ॥
ज्ञानधन मान परचित्तिं ठसवीतें,
द्वेष परचित्तिं धन अन्य उठवीतें ।
हें असुखहेतु मनुजाप्रति सदैव,
तें सुखद जेविं अनुकूल भुवि दैव ॥ ९ ॥
करी विद्याधर कृती ही अल्पा " ज्ञानसंपदा " ।
शांतिदा ती तया होओ, लोकां संतत सौख्यदा १०

---

# कवीचा आनंद.

कविता रचीत असतां कवीच्या मनास जो आनंद होतो, तो पुढील पांच श्लोकांत वर्णिला आहे. आमच्या 'मूर्च्छना' नांवाच्या एका काव्यांतील हा उतारा आहे.

अन्तर्नेत्रें प्रथम बघणें सांङ्ग उद्दिष्ट अर्थ,
तो दावाया मग हुडकिणें शब्द जे जे समर्थ ।
मोठा अर्थ प्रकट करणें शब्द योजून थोडे,
थोड्या अर्थे चरण भरणें, हें असे थोर कोडें ॥ १ ॥

---

७ दिल्यानें वाढतें. ८ नदीचें पाणी. ९ वाहतां वाहतां. १० चंद्राचें शरीर देव अमृत प्याल्यानें जसें रोडावतें. १ मनश्चक्षूनें.

वृत्ता, अर्था अनुगुण पदें सर्व शोधावयाला,
मांडायाला मग समुचित स्थानिं त्या त्या पदाला ।
दावायाला श्रम कवि करी कल्पनांचे तरंग,
ते न स्वल्प श्रम तरि कवी होतसे त्यांत दंग ॥ २ ॥
धुंडायाला यमक पडती कष्ट भारी कवीला,
त्यासाठीं तो धडपड करी; घोर ही काव्यलीला ।
केव्हां केव्हां सुमधुर असा श्लोक जन्मे अहो तो,
किंतु स्थानीं यमक न सुचे यामुळें त्याज्य होतो ॥ ३ ॥
ऐसे होती बहुविध जरी क्लेश भारी कवीस,
ते आनन्दा तरि वितरती क्लेश त्याच्या मतीस ।
ज्या आनन्दा कवि अनुभवी क्लेशही पावतांना
त्याची गोडी लवहि इतरां कल्पवेना जनांना ॥ ४ ॥
होते काव्यग्रथनसमयीं पूर्ण एकाग्रता, ती—
चिन्तांतें न स्थल हृदयिं दे, दूर त्या सर्व जाती ।
शुद्धानन्द स्फुरण कविच्या पावतो अन्तरंगीं,
संसाराचें स्मरणहि तया होइना ह्या प्रसंगीं ॥ ५ ॥

---

# सदा सुवेला सुकृता.

चांगलें कृत्य करावयाचें मनांत येतांच तें करावयाला उपक्रम करावा, मुहूर्त पहात बसूं नये, असा बोध ह्या काव्यांत केला आहे.

वृत्त वंशस्थ.

धनिक—
" धनें उद्यांपासुनि मी अकिंचनां दयार्द्रभावें वितरीन सज्जनां " ।

कवि—
दिलें न कां आजवरी तुवां धना? ने देशि वा आजहि कां धना जनां?"

धनिक—
" गृहें उद्यांपासुनि मी अनाश्रयां विशाल देऊन जनां रहावया " ।

---

२ योग्य शब्द. ३ ते कष्टच त्याच्या मनाला आनंद देतात.
१ दरिद्री लोकांना. २ ज्यांना रहावयाला घरें नाहींत अशांना.

कवि—

"दिलीं न कां आजवरी तुवां गृहें? न आज कां देशि? असें सुकृत्य हें."

धनिक—

"उद्यां अशा[3] ह्या कृति चांगल्या[4] दिनीं करीन अन्याहि सुपुण्यवर्द्धिनी"

कवि—

"उद्या असें कां म्हणसी सुहृत्तमा[6]? न आज कां तूं करिसी उपक्रमा?[7] ३
मुमूर्षु[8] जो अन्न नसे म्हणोनिया तयास द्या अन्न दया करोनिया।
विलंब होतां उपयोग कायसा? मृतीं नसे वीर्य मुळीं सुधारसा[9] ४
त्वरा करा, द्या बुडल्यास हात हो! विलंबॅ[10] हेतु न निमज्जनास हो।
विलंब झाल्यास मरेल तो नर, तयास तारील न तूमचा कर ॥ ५ ॥
करावयाला सुकृतें[11] सदा झटा, न अंतरायें[12] सुकृतार्जनीं हटा।
मुहूर्त सारे शुभ पुण्यसाधना, करूं नका निष्फल कालयापना[13] ॥ ६ ॥
असेल जो जो अनुतप्त मानव तया क्षमाया न विलंब हो लव।
बुध प्रशस्या गणिती क्षमा दया, सदा सुवेला सुकृता करावया ॥ ७ ॥
स्वदेशभव्यार्थ[14] करावया श्रम करा त्वरा द्वारिं उभा जरी यम।
करा त्वरा, चित्तिं धरूं नका भया, सदा सुवेला सुकृता करावया ॥८॥
स्वदेशकार्यें असतीं अनेक तीं न एकट्यालाच कधींच साधती।
तुम्ही करावा श्रमभाग आपला, विलंब होतां न बघाल सत्फला ॥९॥
स्वधर्मसंस्थाबलवीर्यरक्षणीं[15] त्वरा करा, साधु सुकृत्य तें गणी।
स्वधर्मसेवा रुचते महाशयां नका कधीं ती कचरूं करावया ॥ १० ॥
न काल कोणा करितांहि थांबतो, गती न मंदा करितो कधींच तो।
विलंब व्हावा सुकृतास कासया? सदा सुवेला सुकृता करावया॥११॥
" सदा सुवेला सुकृता " काव्य वामननंदनें।
रचिलें तें बहु प्रेमें आदरावें सदा जनें ॥ १२ ॥

---

३ अमुक तसुक. ४शुभ. ५मोठें पुण्य देणाऱ्या. ६उत्तम मित्रा. ७सुरवात. ८ मरावयास टेकलेला. ९ अमृताचा रस. १०उशीरामुळें तो न बुडावा म्हणून. ११पुण्यें. १२ अडथळ्यानें. १३ वेळ फुकट दवडणें. १४ कल्याण. १५ आपला धर्म आणि संस्था यांचें सामर्थ्य आणि सकसपणा टिकावा ह्या कामीं.

# विज्ञानव्यर्थता.

दहा हजार वर्षांपूर्वीं मानवी प्राणाच्या सुखाचें दुःखाशीं जें प्रमाण होतें, तें हल्लींच्या ज्ञानाचें वाढलेलें नाहीं, असा ह्या काव्यांत पूर्वपक्ष केला आहे. कोणी उत्तर पक्ष केल्यास तो अर्थात् इष्टच आहे. ]

वृत्त मंदाक्रांता.

साधा भोळा सरळ असतो मर्त्य अज्ञान फार,
तो चित्ताचे प्रकट करितो स्पष्ट सारे विकार ।
त्याच्या संगीं जन न फसतो, तो सदा एकरूप,
ऐसें साधेपण बघुनिया साधु हर्षे अमूप ॥ १ ॥
ज्ञानापेक्षां सुखकर असें वस्तु नाहीं जगांत,
ऐशी ऐकों श्रवणमधुरा बोलली नित्य मात ।
देखों किंतु प्रतिदिन नरध्वंसनाचा पसारा[1]—
ज्ञाने वाढे, मग न असुखा कां वदा ज्ञान थारा ॥ २ ॥
झाली धन्वन्तरिवरि[2] खरी आजकालीं चढाई,
झालें वृद्धिंगमित अगदज्ञान[3] ऐशी बढाई—।
ऐकों येई निशिदिनिं, परी मृत्यु वैद्या टळेना,
देखों विश्वीं अनवरत[5] ती वाढते रोगसेना[4] ॥ ३ ॥
ज्या ज्ञानानें अनिशें करिजे शाठ्यवृत्तिप्रसार[6],
ज्या ज्ञानानें दुरितकरणीं[7] शक्ति वाढे अपार ।
ज्या ज्ञानानें हृदय न कळे, सत्य वा चित्तगूढ[8],
त्या ज्ञानाला स्तविल नर तो कां म्हणावा न मूढ ? ॥ ४ ॥
ज्या ज्ञानानें दुरितविलयें[9] शुद्धि मर्त्यास यावी,
ज्या ज्ञानानें सकल मनुजें देवता[10] मेळवावी,
त्या ज्ञानें कां मदमलिनता पावतो मर्त्य सर्व,
त्या ज्ञानें कां वद करुनिया राहतो चित्तिं गर्व ? ॥ ५ ॥
ज्या ज्ञानानें भर शमयुता[11] मर्त्यसौख्यीं पडावी,

---

१ मनुष्यांचा संहार करण्याच्या साधनांची सामग्री. २ देवांचा वैद्य. ३ रोगांची माहिती. ४ आजारांची संख्या. ५ सतत, नेहेमीं. ६ लबाडीच्या वागणुकीचा फैलाव. ७ पातकें करण्याच्या बाबतींत. ८ हृदयांत लपलेलें. ९ पापाचा नाश. १० देवपणा. ११ शांतिसहित ( सौख्य. )

म. मं. ग्रं. ८

जेणें व्हावी सकल अवनी[12] संयुता[13] स्नेहभावीं ।
त्या ज्ञानें हो[14] नर कुटिल कां ? क्रूर कां ? मत्सरी कां ?
सांगा ज्ञान प्रकट करि कां दुर्गुणांच्या अनीकीं[15] ? ॥ ६ ॥
अन्यायाला, कुटिल कृतिला, न्यायसारल्यरूप–
द्याया ज्ञानें निशिदिनिं बघों शक्ति येई अमूप ।
ज्या ज्ञानानें शुचि नरसुखें वाढलींशीं न पाहों
त्या ज्ञानाची उगिच महती वर्णिती लोक कां हो ?॥ ७ ॥
ज्या ज्ञानानें ऋत[16] लपविजे, सोडिजे मर्त्य आग[17],
ज्या ज्ञानानें अनृत[18] नाविजे[19], दंडिजे जो अनाग[20] ।
ज्या ज्ञानानें अनय नयसा निस्त्रपें[21] दाखवीजे,
त्या ज्ञानानें मनुजसुख कीं ह्या जगीं वाढवीजे ? ॥ ८ ॥
जो जो विद्वद्वर[22] म्हणवितो ह्या जगीं आपणास
तो तो देखों चतुर असतो चित्त झाकावयास ।
बाह्याचारीं शुचितम अशी मित्रता दाखवून
तो कौशल्यें धन यश हरी, दैत्य तो, नैव ऊन ॥ ९ ॥
कां कांगावा[23], कुटिल करणी, क्रौर्य, कार्पण्यकेवीं[24]–
वाढे ज्ञानें ? वरुनि जरिही शुष्क होतांत खेवीं[25] ।
ज्ञानाची कां परिणति करी भिन्न रूप[26] स्वरूप[27] ?
ज्ञानप्राप्ति प्रचुर हृदया कां करी शौचकूप[28] ? ॥ १० ॥
सत्यें न्याय स्थिर न करिजे, न्याय सैन्यें स्थिरावे,
द्रव्यें किंवा कुटिल वचनें न्याय्यतों[29] न्याय पावे ।
जों ह्या लोकीं मनुज न बघे न्याय सत्यप्रतिष्ठ[30],
तों ज्ञानाचा स्तव नाचि करा, आणितें तें अरिष्ट ॥ ११ ॥

---

१२ पृथ्वीवरील लोक. १३ जुळलेली. १४ होतो. १५ सैन्याप्रत म्हणजे समूहाप्रत. १६ सत्य. १७ अपराधी म्हणजे गुन्हेगार. १८ असत्य. १९ स्तविलें जातें. २० निरपराधी माणूस. २१ निर्लज्ज माणसाकडून. २२ श्रेष्ठ विद्वान. २३ आपला अपराध लपविण्याची प्रवृत्ति. २४ अनुदारपणाचा सांठा. २५ प्रेमालिंगनें. २६ बाहेरचा आकार. २७ आंतील वृत्ति. २८ दुर्गंधीचा खड्डा. २९ न्यायालय न्यायीपणाचा देखावा येतो. ३० सत्यावर उभारलेला (न्याय).

राज्यें पूर्वी बहु जिणियलीं राज्यतृष्णाकुलांनीं,
होते मूढ प्रभु पशुच ते, त्यांस कोणी न वानी ।
किंतु ज्ञानें पटुतम असे आज होओनि राजे
अन्या देशां जिणिति, वचनीं त्यांचिया शांति गाजे ॥ १२ ॥
पूर्वीं राज्यें बहु बुडविलीं[31] पार्थिवीं वैभवार्थ,
त्यांणीं नानापरि सुखविले कांचनें मित्र[32]सार्थ ।
ज्ञानप्राप्त्या पटु नृप अतां देशभव्या कराया
स्वातंत्र्याच्या[33] लघु विनिमयें ज्ञान जातात घ्याया ॥ १३ ॥
ज्या ज्ञानानें षड्रिपुनिवह[34]ध्वंस झाला दिसेना,
जेणें उच्चावचावि[35]षमता लेशमानें टळेना ।
प्राचीनांची अवमति करायास जें ज्ञान लावी
त्या ज्ञानाची उगिच महती मानवें काय गावी? ॥ १४ ॥
जें धर्माच्या शिथिल करितें, नीतिच्या बंधनातें,
जें कर्तव्यें विसरवि शुभें आपुलीं मानवांतें ।
देशप्रेम[36]प्रसव खुडिते लोकचित्तांतला जें,
त्या ज्ञानाचा स्तव परिसतां प्राज्ञ तो फार लाजे ॥ १५ ॥
धिक् त्या ज्ञाना अधिक न करी आपुल्या जें सुखास,
धिक् त्या ज्ञाना पशुपरि करी क्रूर जें मानवास ।
धिक् त्या ज्ञाना पढवि जर तें क्रौर्य, कौटिल्य, दर्प,
धिक् त्या ज्ञाना जर करि नरा तें वृक[37], व्याघ्र, सर्प ॥ १६ ॥
धिक् त्या ज्ञाना चिरडित असे बंध जें बंधुतेचे,
धिक् त्या ज्ञाना शिकवि मनुजा जें धडे क्रूरतेचे ।
धिक् त्या ज्ञाना पटु करि नरा जें लुटाया परास,
धिक् त्या ज्ञाना नरकसमता देइ जें भूतलास ॥ १७ ॥
स्वस्ति ज्ञाना क्षितिवरि सुखें स्वर्गिंचीं जें भरील,

---

३१ राजे लोकांनीं ३२ मित्रांच्या टोळ्या. ३३ स्वातंत्र्य ही क्षुल्लक वस्तु मोबदला घेऊन ज्ञान देऊं लागतात. ३४ कामक्रोधादि षड्रिपूंचा नाश. ३५ खालचा दर्जा आणि वरचा दर्जा असा भेद. ३६ देशप्रीतीचा अंकुर. ३७ कोल्हा.

स्वस्ति ज्ञाना निगडितें[38] नरा प्रीतिनें जें करील ।
स्वस्ति ज्ञाना करुनि अनघा[39] विश्वबंधुत्ववृद्धी
साऱ्या लोकीं प्रकटिल खऱ्या जें सुखाची समृद्धी ॥ १८ ॥
प्राचीनांचें परिस अमुचें ज्ञानभांडार थोर
ऐशी प्रौढी मिरविल गमे तो बुधा मूर्ख पोर ।
देवत्वाच्या चढविल पदा जें नरा तेंचि मान्य,
तेंचि ग्राह्य, प्रधि[40] गणिल हो निश्चयें ज्ञान, नान्य ॥ १९ ॥
जाऊं याहो दशशतसहस्राब्द[41] मागें हटून
आतांपेक्षा लव न अपुलें सौख्य होईल ऊन ।
जैशीं इच्छापरिणतिफलें भोगि सज्ञान आजी,
तैशीं पूर्वीं अनुभवियलीं अज्ञलोकें समाजीं ॥ २० ॥
सुखाचें आज दुःखाशीं जें प्रमाण जगीं असे ।
तें ऊन नव्हतें पूर्वीं; न विज्ञान वृथा कसें ? ॥ २१ ॥
" विज्ञानव्यर्थता " नाम काव्य वामननंदनें ।
केलें निकष[42] सत्याचा लावावा त्यास सज्जनें ॥ २२ ॥

---

# व्यंजनावली.

[ ह्या काव्यांत कपासून शपर्यंत सर्व व्यंजनांपैकीं एक एक व्यंजन प्रत्येक चरणाच्या प्रारंभीं येईल अशी योजना केली आहे, म्हणून याला व्यंजनांची पंक्ति हा अर्थ दाखविणारें नांव " व्यंजनावली " असें आम्ही दिलें आहे.
ङ, ञ, ण आणि ळ,हीं व्यंजनें शब्दारंभीं येऊं शकत नाहींत म्हणून तीं चरणारंभीं योजतां आलीं नाहींत. ह्या काव्यांत मूल्यवान् उपदेश आहे. ]

वृत्त वंशस्थ.

करा स्वकर्तव्य, खचा न लेशही, खलास टाळा समजूनि त्या अही ।
गजान्तलक्ष्मीहि मिळावयास्तव घडो न द्या पाप, चुकेल रौरव ॥१॥

---

३८ बांधलेले. ३९ शुद्ध, प्रामणिकपणाची. ४० शहाणा माणूस. ४१ दहा लक्ष वर्षें. ४२ कसोटीच्या दगडानें परीक्षा.

चढून विद्यागिरि कीर्ति मेळवा, छद्मामही घ्या न करोनि कैतवा[1] ।
जपून वागा हितशत्रुशीं सदा, झटा स्वधर्माभ्युदयार्थ सर्वदा ॥ २ ॥
टळावया दुःख शुचित्व आदरा, ठगास टाळा जरि तो दिसे बरा ।
डसेल मर्मास अशी न गी[2] वदा, ढळो न सत्त्व, स्थिर तें असो सदा ॥ ३
तरा प्लवें[3] ज्ञानमयें भवार्णवा[4], थकूं नका, ज्ञान सयत्नें[5] मेळवा ।
दया दरिद्रांवरि सर्वदा करा, धनानिमित्तें अघमार्ग[6] नादरा ॥ ४ ॥
नका गुरूची अवहेलना करूं, परस्वलोभास मनीं नका धरूं ।
फसा न, बोलो खल गोड वैखरी, बकापरी सालस[7] तो दिसे तरी ॥ ५
भलेपणानेंच मिळेल तें धन महानिधीचे परि तोषवी मन ।
यशास रक्षा, धन अल्पमूल्यक[8], रमा न दुःसंगिं, मिळो न नारक ॥ ६
ललाम[9] व्हायास झटा जगीं गुणें, वरोनि[10] नम्रत्व यशा करा दुणें ।
शवत्व द्या वीर्य हरूनिया निकें षड्रिपूरगांस[11] विवेकमांत्रिकें ॥ ७ ॥
सर्पसा पिशुन भावुनी त्यजा, हर्षवूं गुरूंस भक्तिनें सजा ।
क्षम्य दोष असतां क्षमा करा, ज्ञप्तिनें[12] हृदयशुद्धि आदरा ॥ ८ ॥
विद्याधरें चिमुकली अर्पिली व्यंजनावली–।
बालां, तन्माधुरी त्यांच्या पाहिजे चित्तिं बाणली ॥ ९ ॥

---

# सुकन्या.

महाभारताच्या वनपर्वांतील एकशें बावीस आणि एकशें तेवीस ह्या दोन अध्यायांत आलेली सुकन्येची कथा ह्या काव्यांत आम्ही संक्षेपानें सांगितली आहे.

शर्याति ह्या नांवाचा एक सूर्यकुलोत्पन्न राजा मृगयेसाठीं वनांत गेला असतां त्याची सुकन्या नांवाची कन्या त्याचे बरोबर होती. ती त्या वनांत

---

१ लबाडी करून छद्मामही मिळवूं नका. २ वाणी, भाषण. ३ होडी. ४ ज्ञानरूपी होडीनें भवरूपी समुद्र तरून जा. ५ यत्नानें. ६ पापाची सरणी. ७ सभ्य, साधा भोळा. ८ बिन किंमतीचें. ९ सर्वांच्या आदराला पात्र. १० नम्रपणा स्वीकारून यश वाढवून घ्या. ११ काम, क्रोध, लोभ, मद, आणि मत्सर, हे जे सहा शत्रु तेच कोणी सर्प, त्यांचें विवेकरूपी मांत्रिकाच्या मदतीनें सामर्थ्य नष्ट करून टाकून त्यांना शवाची स्थिति द्या म्ह० त्यांना चिरडून टाका. १२ ज्ञानानें.

फिरतां फिरतां च्यवन मुनि जेथें समाधि लावून बसला होता, तेथें आली. ह्या मुनीच्या अंगाभोंवतीं वारूळ वाढलें होतें. सुकन्या येण्याला आणि मुनीनें समाधि उतरून डोळे उघडण्याला एक गांठ पडली. हें काय चमकत आहे म्हणून जिज्ञासेनें प्रेरित होत्सात्या सुकन्येनें त्या दोन तेजांचा झाडाच्या कांट्यानें वेध केला. मुनीचे डोळे फुटले. तेव्हां तो क्रुद्ध झाला आणि त्यानें शर्यातीच्या सैनिकांना मलमूत्रांचा अवष्टंभ करून जर्जर केलें. शर्यातीनें मुनीला आपली मुलगी सुकन्या अर्पण करून त्याचा राग शांत केला आणि आपल्या सैनिकांना अवष्टंभापासून मुक्त करून घेतलें. सुकन्या पतीच्या शुश्रूषेंत तत्पर होऊन त्याच्यापाशीं राहिली. पुढें च्यवनानें अश्विनीकुमारांना ' मी तुम्हांला यज्ञांत सोमरस देववीन, ' असें सांगून त्यांच्या प्रसादानें तारुण्य आणि नेत्र मागून घेतले. मग च्यवन आणि सुकन्या आनंदानें राहूं लागलीं. हा कथाभाग ह्या काव्यांत संक्षेपानें वर्णिला आहे.

वृत्त आर्या.

इंद्र सुरांत स्वर्गीं तैसा भुवि मानवांत शर्याति--।
गणिजे श्रेष्ठ, तयाची सर्वत्र सदैव, कीर्ति जन गाती ॥ १ ॥
होउनि गेले राजे आजवरि अनेक मेदिनीवरती[1] ।
परि शर्यातीचे परि शर्याति असेंच सर्व बुध म्हणती ॥ २ ॥
प्रकृतिक्षेमार्थ[2] सुताक्षेम[3] तयें चिरडिलें नृपें सकळ ।
नररिपुस चिरडिती बहु, परि चिरडिति मोहरिपुस ते विरळ ॥ ३ ॥
लक्ष रिपूंस रणीं जे जिंकिति ते वीर विपुल जगीं बघतों ।
परि लक्षांत न एकहि जेणूं चित्तस्थ रिपुंस[4] जो शकतो ॥ ४ ॥
शर्याति कार्यभारें श्रमला, घ्यायास अल्प विश्रांती ।
नगर त्यजूनि गेला, ठेला तो सैनिकांसह वनांतीं[5] ॥ ५ ॥
आवश्यक हें तो गणि अंगीं सामर्थ्य यावया नव्य ।
धनु सज्ज सदैव मन व्यग्र शकेना करूं स्वकर्तव्य ॥ ६ ॥
मन विटतें मनुजाचें तीं तींच मुखें सदैव पाहून ।
त्या त्या स्थलींच राहुनि, कामें तीं तींच संतत करून ॥ ७ ॥

---

१ पृथ्वीवर. २ रयतेच्या सुखासाठीं. ३ मुलीचें सुख. ४ काम, क्रोध, लोभ, मद, मोह आणि मत्सर, हे जे हृदयांतील षड्रिपु त्यांना. ५ अरण्याचे गर्भांत.

आयुष्यक्रमणीं तो पालट गेला वनांत न्हायाला ।
नगरवनांतिल होइल भेद मना सुखद वाटलें त्याला ॥ ८ ॥
नरकृति सृष्टिकृती ह्या सापेक्षत्वें मनास रंजविती ।
तुलनेनें दोन्हीही प्रीति मनीं अननुभूत चेतविती ॥ ९ ॥
रथसंघोष, कशाध्वनि, कृत्रिम वर्तन, मनुष्यकृति तिकडे ।
विहगारव, पशुनर्दन, अनरविवर्तित निसर्गही इकडे ॥ १० ॥
कुट्टिमतल, घंटापथ, सौध, विपणि, पण्यवीथिका तिकडे ।
पाउलवाटा असरल, वृक्ष दिवंकष, लता निबिड इकडे ॥ ११ ॥
नित्य महानगरांतिल जनसंमर्दात राहतो नर तो ।
वननिर्जनतेमध्यें कांहीं दिन घालवून बहु रमतो ॥ १२ ॥
त्याच्यासंगें गेली होती त्याची वनास त्या दुहिता ।
अभिधा तिची 'सुकन्या', ती रूपगुणादिंहीं तिला उचिता ॥ १३ ॥
पुरजनपदभेद तिच्या सर्वांही इंद्रियांस मोदकर- ।
झाला; वन सुखद असे, पर्यायें सुखद मानवा नगर ॥ १४ ॥
ही वनभागांत तिला नूतनतासुभग वाटली सृष्टि ।
जें जें ती अवलोकी तें तें संतोषवी तिची दृष्टि ॥ १५ ॥
सलिलें सकमल, कमलें सभ्रमर, भ्रमर सभेद पाहून- ।
त्या विपिनांतिल तिजला होई आनंद अंतरिं अनून ॥ १६ ॥
वृक्ष दिवंकष तेथें, वेलींचीं वेष्टनें तयां दाट ।
त्यांचे सभोंवतालीं पक्ष्यांचा सर्वदा किलबिलाट ॥ १७ ॥
नित्य सखींसह हिंडे देखावे बघत ती वनांतील ।
नगरांतील मुलीला कां ते सुखकर न सर्व होतील ? ॥ १८ ॥
एके दिनिं ती आली आलीसहिता तिथें नृपतिदुहिता ।
च्यवनर्षि जिथें होता लावुनि समाधि दीर्घकालमिता ॥ १९ ॥

६ तुलनेनें. ७ पूर्वी न अनुभावलेली. ८ गाड्यांचे खडखडाट. ९ चाबकाचा कडकडाट. १० पक्षांचा किलबिलाट. ११ जनावरांच्या गर्जना. १२. माणसानें न बदललेला. १३ सृष्टीचा देखावा. १४ फरसबंदी जमीन. १५ मोठमोठे रस्ते. १६ उंच उंच हवेल्या. १७ बाजारांतील रस्ते. १८ लहान लहान बोळ. १९ आकाशाला भिडलेले. २० दाटी, गर्दी. २१ नांव. २२ जनपद म्ह. खेडवळ प्रदेश. २३ पालट केल्यानें. २४ निरालेपणामुळें मनोहर. २५ उन्मत्त. २६ मैत्रिणी. २७ पुष्कळ काल चालविलेली.

स्थाणूं[२८]परि तो निश्चल लावूनि समाधि जाहला असतां ।
काळें पडलें होतें वल्मीकाचें[२९] कडें[३०] तया भवतां ॥ २० ॥
तेथ सुकन्या आली तों उतरुनि मुनि समाधि नेत्रांतें ।
उघडुनि निश्चल होता, तत्तेजें व्यापितीं दश दिशांतें ॥ २१ ॥
हीं तेजें कसलीं ही जिज्ञासा तीचिया मनिं उदेली ।
तरुकंटकें तिनें तीं तेजें संविद्धें[३१] तेधवां केली ॥ २२ ॥
तेजें तीं च्यवनाचीं होतां संविद्धें[३१] लोचनें फुटलीं ।
झाला अंध च्यवन, क्रीडा वालिशी[३२] तिची अशी फळली ॥ २३ ॥
फुटल्या मुनिनेत्रांतुन रुधिर भळभळां बहू तदा स्रवलें ।
रुधिर न तें, मुनिचें अवलोकनसामर्थ्य जें गळुनि पडलें ॥ २४ ॥
च्यवनर्षि अंध झाला, मुलगी तच्चर्मचक्षुंस न दिसली ।
परि अंतर्ज्ञानें ती अपराद्धा त्यास तत्क्षणीं कळली ॥ २५ ॥
शर्यातीची कन्या अपराद्धा निश्चयें मुनिस कळली ।
क्रोधाची तीव्र लहर उठली तद्धृदयीं मारुनी उसळी ॥ २६ ॥
क्रोधवश च्यवन मुनी भूपतिच्या सैनिकांस दंड करी ।
बुध म्हणती वेडाचा झटका क्रोधास, तो विवेक हरी ॥ २७ ॥
अपराध सुकन्येचा,झाला शर्यातिसैनिकां दंड ।
रावण सीतेस हरी, सिंधूला सेतुबंध उद्दंड[३३] ॥ २८ ॥
मलमूत्रा[३४]विष्टंभें सैनिक शर्यातिचे विकळ[३५] झाले ।
कोणा भिषग्वराचा[३६] कांहीं न उपाय तेधवां चाले ॥ २९ ॥
क्षितिवरि सैनिक पडले भोगित मर्मान्त[३७] यातना सारे ।
मलमूत्राशय फुगले, पोटांचे जाहले जणुं नगारे ॥ ३० ॥
ही आकस्मिक आली आपत्ति तिचें निदान[३८] वा रूप ।
कळलें कोणालाहि न, जनदुःख बघों शके न तो भूप ॥ ३१ ॥
हळहळला, कळवळला, वळवळला नृप जनार्ति[३९] पाहून ।
तो सुनृप सत्य, कुनृप न पाहून जनार्ति होइ लव दून[४०] ॥३२॥

---

२८ वाळलेल्या झाडाच्या खोडाप्रमाणें. २९ वारळाचें. ३० वेष्टन. ३१ टोचलेलीं. ३२ पोरकट. ३३ फार भयंकर. ३४ अवरोध. ३५ पीडित. ३६ उत्तम उत्तम वद्यै ३७ हृदयाला झोंबणाऱ्या. ३८ कारण. ३९ लोकांची पीडा.. ४० पीडित .

करितां शोध नृपतिला कळलें कन्याच हेतु दुःखा या ।
उठला तत्क्षणिं गेला तो च्यवनाचा प्रसाद साधाया ॥ ३३ ॥
जोडुनि कर मुनिपुढती नृपति स्वीकरुनि नम्र भावाला ।
दीनस्वरें असें वच वदला सांत्वावयास कुपिताला ॥ ३४ ॥
" कन्या अजाण माझी, केलें भलतें असें तिनें कृत्य ।
तिजसाठीं मी तुमची तुमचा ही याचितों क्षमा भृत्य ॥ ३५ ॥
अंधत्व तुम्हां आलें, हानि महा ही भरून न निघेल ।
दण्ड करा खरतर मज जो तुमच्या मतिस योग्य वाटेल ॥ ३६ ॥
कन्यापराध घाला पोटांत, कृपा करा, मुने पावा ।
मम सैनिकांचिया खर[४१] दुःखा सरवा, दया तयां दावा ॥ ३७ ॥
बालिश जिज्ञासेनें प्रेरित होओनि जो तिनें केला ।
तो अपराध गुरु असो, माना माझ्या क्षमार्ह दुहितेला ॥ ३८ ॥
तुमच्या कोपपविस[४२] हें भूभृच्छिर[४३] उचित वीर्य दावाया ।
मज दण्ड करा, उठवा सैनिक, पुरवा मदीय कामा या" ॥ ३९ ॥
ऐकुनि शर्यातीचा विनति अशी बोलला तया च्यवन ।
"नृपते, त्वत्कन्येचा अपराध मला गमे क्षमोचित न ॥ ४० ॥
झालों मी अंध नृपा, त्वत्कन्येच्याच बालिश कृतीनें ।
तीच मला दे पत्नी शर्याते, शास्त्रसंमत विधीनें ॥ ४१ ॥
त्वत्सैनिकां निरामय[४४] ह्या क्षणिं मी करिन गा धरापाला ।
जर तव कन्या पत्नी देशिल मज मार्ग दाखवोयाला[४५] ॥ ४२ ॥
अवलोकनशक्ति जिणें मम लोपविली तिनेंच मज वाटे ।
न्यावें हात धरुनि हा उचित असे तिजसि दण्ड मज वाटे" ॥ ४३ ॥
च्यवनोक्ति नव्हे ती, ती तप्तायोरसनदीच[४६] जी श्रवणीं— ।
पडली शर्यातीच्या, विधिची[४७] ही स्तिमित त्या करी सरणी ॥ ४४ ॥
च्यवनोक्ति आयकुनि ती दुःख नृपा होइ कल्पनातीत ।
डोळे मिटोनि ठेला निश्चल चित्तांत चिंतन करीत ॥ ४५ ॥

---

४१ तीव्र, असह्य. ४२ कोपरूपी वज्राला. ४३ राजाचें मस्तक (म्ह. माझें डोकें); पक्षीं, पर्वताचें शिखर. ४४ रोगापासून मुक्त. ४५ मला अंधळ्याला वाट दाखवावयाला. ४६ तापलेल्या लोखंडाच्या रसाची नदीच. ४७ ही दैवगति.

जरठ, विलासपराङ्मुख, भार्गव, आसन्नमरण मुनि कोठें ? ।
कोठें सुखार्ह बाला? गाणि नृप तद्योग सार्कंडें[४८] मोठें ॥ ४६ ॥

कन्या जरठा देणें हें तिज कूपांत[४९] खोल पाडविणें ।
म्हणुनि मुनीची उक्ती परिसुनि तो नृप मनांत फार शिणे ॥ ४७ ॥

प्रिय कन्या, प्रिय सैनिक, ह्यांस न तो त्यजुं शके न वा तीस ।
कें[५०]तर धरावा पुढचा पथ तो दिसला तदीय न मतीस ॥ ४८ ॥

दोलाधिरूढ[५१] झाली शर्यातीची मती तया समयीं ।
ह्या क्षणिं इकडे, त्या क्षणिं तिकडे, स्थिति ती महोग्रमोहें[५२]भयी ॥ ४९ ॥

नृपति[५३]जनकयुद्ध तदा झालें, तो ह्यास, हा तया ढकली ।
अन्तीं जनकपराभव झाला, युद्धांत नृपति होय बली ॥ ५० ॥

मग शमवाया सैनिकदुःखें मन दृढ करी महीपति तो ।
कन्या च्यवना द्याया सजला, जनहित गुरू[५४] सुनृप गाणितो ॥ ५१ ॥

शर्याति रामसा नृप, रामहि शर्यातिसा प्रजानिष्ठ ।
स्त्री कन्या प्रिय हो[५५] तो[५६] दूर करी कीं प्रजासुख गरिष्ठ[५७] ॥ ५२ ॥

पाशव सामर्थ्यावरि अन्याया न्याय नांव देतात ।
ते प्रभु किंप्रभु, त्यांचीं राज्यें विलयास शीघ्र जातात ॥ ५३॥

पाशवसामर्थ्यावरि नव्हता शर्याति विश्वसून कधीं ।
जनयोगक्षेम गणी राज्यस्थैर्यासि हेतु उन्नत[५८]धी ॥ ५४ ॥

च्यवना कन्या देणें ही अप्रिय गोष्ट पथकरी नृप तो ।
प्रकृतिक्षेमा सुप्रभु आत्मीयांच्या सुखापरिस जपतो ॥ ५५ ॥

---

४८ पंचाइतीची गोष्ट. ४९ विहिरींत. ५० दोहोंपैकीं कोणचा. ५१ झोंपाळ्यावर बसल्याप्रमाणें. ५२ भयंकर मोहानें युक्त. ५३ राजा ह्या नात्याचे विचार आणि पिता ह्या नात्याचे विचार हे शर्यातीच्या अंतःकरणांत परस्परांविरुद्ध झगडत होते; म्हणजे कन्येचें हित पाहूं कीं प्रजाजनांचें हित पाहूं, ह्या संबंधाचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. ५४ अधिक महत्वाचें. ५५ हा म्ह. राम प्रिय स्त्रीला म्ह. सतिला टाकता झाला. ५६ तो म्हणजे शर्याति प्रिय कन्येला म्ह.सुकन्येला, टाकता झाला.५७महत्त्वाचें.५८उदार आहे आत्मा ज्याचा.

केलें कन्यादान च्यवनाप्रति वनिं नृपें अनृतसंधें[५९] ।
जुळलीं च्यवनसुकन्या पतिपत्नींच्या अभेद्य संबंधें ॥ ५६ ॥
ठेवुनि कन्येस वनीं खिन्न मनें परतला नृप पुरास ।
कन्यावियोग होतो कोणा अतिदुःखकर न जनकास ? ॥ ५७ ॥
अंध, स्थविर, फलाशन, जामाता वन्य, मी श्वशुर नृपती ।
ही तुलना तद्धृर्दीं चालुनि तो दुःख भोगि तीव्र अती ॥ ५८ ॥
शर्याति गेलियावरि मग्न सुकन्या स्वभर्तृसेवेंत–।
झाली, कीं ती जाणे तीर्णें[६०] भोगील दिव्य सुख चेत ॥ ५९ ॥
जननी, जनक, सखीजन, दासी, संगीत, मंदिरनिवास ।
गळुनि अतां तिज अंध, स्थविर पाते, अरण्य निर्जन उदास ॥ ६० ॥
कोठें तें आयुष्यक्रमण विविध दिव्य सुखविलासांत ? ।
कोठें कंदफलाशन शीतातपकष्ट निर्जन वनांत ? ॥ ६१ ॥
कोठें मृद्वंगी ती जी राहे नित्य सुखविलासांत ? ।
कोठें निर्जन विपिनीं वसति हिमातपसमीरदुःखांत[६१] ॥ ६२ ॥
परि पति हें गुरु दैवत मानुनि त्याचीच ती करी सेवा ।
स्वसुखनिराभिलाषा[६२] ती पतिसुखवर्धन गणी महा केवा[६३] ॥ ६३ ॥
प्रतिदिनिं अंधपतिस ती नेइ नदिस पंचधावनार्थ[६४] सती ।
हात धरुनि वाटेनें स्वीकारुनि तत्सुखार्थ मंद गती ॥ ६४ ॥
पतिच्या आहारास्तव आणी फलकंदमूलसंभारें[६५] ।
पतिनें खाउनि उरलें जें त्यावरि ती करी निजाहार ॥ ६५ ॥
पतिच्या शयनास्तव ती सुकलीं कोमल तृणें स्वयें पसरी ।
प्रेमानें ती तत्पदसंवाहन[६६] त्याचिया सुखार्थ करी ॥ ६६ ॥
तो निजतां तीहि निजे विश्रांतीस्तव तयाचिया जवळ ।
उठुनि सकाळीं लागे त्याच्या सेवेस दवडितां न पळ ॥ ६७ ॥

---

५९ शब्द न मोडणारा जो शर्याति त्यानें. ६० पतीची सेवा केल्यानें. ६१ थंडी, ऊन, वारा ह्यांच्या योगानें होणाऱ्या दुःखांत. ६२ स्वतांच्या सुखाविषयीं बेफिकीर. ६३ लाभ किंवा पुण्य. ६४ शौच, मुखमार्जन, स्नान वगैरे जीं पांच स्वच्छतेचीं कृत्यें तीं. ६५ रास किंवा सांठा. ६६ पाय चेपणें.

जें जें सुखद पतीला तें तें ती करि, चुके कधीं न सती ।
सारांश निजपतीची शुश्रूषा मानि धर्म उत्तम ती ॥ ६८ ॥
पति अंध जरठ असतां, तत्सेवा तिजासि कष्टवित असतां ।
नैराश्य पुढें असतां पतिनिष्ठा धरि तिची परम[६७]दृढता ॥ ६९ ॥
ती सानंद वसे वनिं नसतां मंदिर न वा विविध खाद्यें ।
नसतां दास सखीजन [६८]मृदुतल्पीं शयन वा मधुर वाद्यें ॥ ७० ॥
तीचे अनेक वत्सर पतिच्या सेवेंत यापरी गेले ।
न [६९]उपेक्षेचें पातक मतिनें कृतिनें तिनें कधीं केलें ॥ ७१ ॥
मुनि तोपला बघुनि ही पतिनिष्ठा कष्टलाहि तो च्यवन ।
मी सफल करुं कसें तज्जीवित ह्याचें करी मुनी मनन ॥ ७२ ॥
धन्य सुकन्या तिनें पतिमन आकर्षिलें निज गुणांहीं ।
वरि उचलि सागरोदक ही ज्योत्स्नेची स्तुती अणू नाहीं ॥ ७३ ॥
नास[७०]त्यांची करुणा भाकुनि त्यांचा प्रसाद मिळवाया ।
तो सजला मुनि तत्क्षणिं कालाच्या न व्यया करुनि वाया ॥ ७४ ॥
नासत्यांची यापरि मनिं करि तो प्रार्थना मुनि च्यवन ।
" पुरवा माझी इच्छा, होओ करुणार्द्र युष्मदीय मन ॥ ७५ ॥
मम भार्या नृपदुहिता, बाला, तज्जन्म सार्थक कराया ।
द्या मज बल, माझ्या तुम्हि, पावा, पुरवा मनोरथाला या ॥ ७६ ॥
तुमचें कारुण्य फळो, द्या मज तारुण्य, वार्धक गळो हें ।
परिवर्तन घडवा हें, कठिण तुम्हां हें भिषग्वरां नोहे ॥ ७७ ॥
तुमच्या उपकारांची फेड करिन मी जशी तुम्हां इष्ट ।
इंद्रासमक्ष करविन सोमाचें [७१]पान मी तुम्हां मिष्ट ॥ ७८ ॥
नासत्य हो असत्य न होइल मत्कृत कधीं प्रतिज्ञा ही ।
हें वाक्य घोषणा मी करुनि वदें भरुनि ह्या दिशा दाही" ॥ ७९ ॥
मुनिची विनती झाली मान्या ही अश्विनीकुमारांना ।
ते त्या अंधा घेउनि गेले एका सराप्रति स्नाना ॥ ८० ॥

---

६७पतीची सेवा अधिक अधिक दृढ होऊं लागली. ६८मऊ बिछाना. ६९हयगय, हेळसांड. ७०अश्विनीकुमारांची. ७१ अश्विनीकुमारांना यज्ञांत सोमरस मिळत नस, तो च्यवनाच्या प्रभावामुळें त्यांना मिळूं लागला अशी कथा आहे.

मुनि उतरला सरोजालिं, भिजलीं अंगें जलें तदा त्याचीं ।
तत्क्षणिं दस्रवरां[७२]च्या विभवानें होइ तो निराळाची ॥ ८१ ॥
तो अंध अवीर्य जरठ झाला डोळस सवीर्य तरुण मुनी ।
आनंद पावली तद्भार्या रूपान्तरास ह्या बघुनी ॥ ८२ ॥
च्यवन सुकन्या प्रेमें जायापति नांदलीं इत:पर तीं ।
तत्प्रेममहोदधिला[७३] स्थिति ठावी एकमात्र, ती भरती ॥ ८३ ॥
झाले च्यवनदशान्तर सुखकर शर्यातिच्या मनाला हें ।
अभिनंदनार्थ त्याच्या सांगनें[७४] आला वनास लवलाहें ॥ ८४ ॥
मग योग्य समय बघुनी च्यवनप्रोत्साहनें मख नृपानें-।
केला, त्यांत च्यवनें सुखवियलें दस्र[७५] सोमपानानें ॥ ८५ ॥
शर्यातिला जो रुचला न आधीं विवाह तो अन्ति तदिष्ट साधी ।
आपाति[७६]तिं दावो भय पुण्यकृत्य, फळे शुभीं तें ध्रुव हेंच सत्य ॥८६॥
सुकन्येची कथा लोकां सांगे वामननन्दन ।
कवीला शम ती देओ लोकांचें रंजवो मन ॥ ८७ ॥

---

# विसंवाद.

मनुष्याच्या वर्तनावरून आणि भाषणावरून त्याचे विचार किंवा हेतु जाणतां येत नाहींत, असा ह्या काव्याचा मथितार्थ आहे.

वृत्त स्वागता.

वर्तनांत वचनांत नराचें आपणास न कळे मन साचें ।
त्यांवरी भरवसून नसावें, तीं सदा फसवितीं समजावें ॥ १ ॥
सव्य वाम दिसतें मुकुरांत, होइ रूपपरिवृत्ति तयांत ।
तत्व हें नरपरीक्षणिं लागे, प्राज्ञ तें स्मरुनि संतत वागे ॥ २ ॥
वाह्य वर्तनिं न हेतु दिसेल, जो करी तदवलंब फसेल ।
चित्तिं हेतु असतो अति गूढ, वर्तनें ठकविजे अतिमूढ ॥३॥

---

७२आश्विनी कुमारांच्या वराच्या सामर्थ्यानें. ७३त्यांच्या प्रेमरूपी महासागराला सदा भरतीच असे; त्याला ओहोटी लागली नाहीं. ७४ पत्नीसहित. ७५ अश्विनीकुमार. ७६प्रारंभीं. १ आरशांत.

भिन्न हेतु करवी कृति एक, एकही करवि हेतु अनके ।
हेतु जाणुनि कृती न कळेल, हेतु वा न कृतिनें समजेल ॥४॥
शौर्य जे प्रकटिती समरांत शूर ते न सगळे असतात ।
प्रेरिती विविध हेतु तयांस हें विचारुनि कळेल तुम्हांस ॥ ५ ॥
रोगपीडित मनुष्य मराया आहवीं[२] ढकलितो निज काया ।
प्रेरितें विमल धैर्य न त्यास, प्रेरि रोगचि तयास सव्यथास[३] ॥६॥
कीं गृहांतिल निरर्थक तंटे, कीं तनूभव[४] अविद्य करंटे ।
कीं त्रपारहित[५] जाररत स्त्री पाठवी करुनि त्या रणिं शस्त्री ॥७॥
जे उदार असती दिसण्यांत ते उदार सगळे न मनांत ।
आपणा कृपण लोक म्हणेल हें तयां भय असें अतिवेल ॥८॥
पुत्रमृत्युभव घोर विरक्ति तन्मनांतिल हरी धनभक्ति ।
यामुळें कधि कधीं निजवित्त देइ तो, जरि उदार न चित्त॥९॥
मान हालवुनि गोड वदे तो घोर दुःख मनुजाप्रति देतो ।
जें प्रमाण मधुरोक्तिस लावूं तन्मनोवृजिनिं[६] तें सम पावूं ॥१०॥
अश्रु ढाळि नर तो न दयाळू, जो कृपा करिल तो न कृपाळू ।
ती दया परिणमे बुधपातीं[७], स्वार्थसाधननिमित्त[८] कृपा ती॥११॥
दावितो हितपरत्व[९] वचांत तोच गुप्त कृतिनें करि पात ।
प्रेम दावि वचनीं स्ववयस्यीं[१०], योजि तत्पतनयुक्ति[११] रहस्यीं[१२] ॥१२॥
तो न नम्र शिर जो नमवील, नम्रता लपवि वंचन शील ।
वागला जरिहि नम्रपणानें पूर्ण तद्धृदय अत्याभिमानें[१३] ॥ १३ ॥
ताठ जो बहु असेल समाजीं तो म्हणेल धनिका नर 'हां जी' ।
निर्धनासहचि ताठपणा तो, श्रीसुतासह लयाप्रति जातो ॥१४॥
श्रीसुतां खुलवि जो नमनानें निर्धनां छळि अशंक मनानें ।
नम्रतापरुषतासमवाय[१४] विस्मयें मन भरील न काय ? ॥ १५ ॥

---

२ लढाईंत. ३ कष्टयुक्त. ४ मुलगे. ५ निर्लज्ज. ६ त्याच्या मनांतील पापासंबंधानें. ७ साधूची हानि करण्यांत. ८ आपलें इष्ट साधण्यासाठीं दाखविलेली. ९ कल्याण करण्याची प्रवृत्ति किंवा इच्छा. १० आपल्या मित्रांबद्दल. ११ त्याचा नाश करण्याची हिकमत. १२ गुप्त रीतीनें. १३ अत्यंत गर्वानें. १४ नम्रपणा आणि ताठपणा ह्या दोन परस्परविरुद्ध गुणांचें एकाच व्यक्तीच्या ठायीं असणें.

नीतिचा करिल जो उपदेश त्यास नीतिपर मानिल देश ।
किंतु तद्धृदयिं नीति न थारे जेविं धूलि भुवि जों बहु वारें १६
नीतिचा मिरवि जो नर डौल तो अनीतिसदनीं प्रिय मौल ।
वर्तनीं रहसि नीति झुगारी साधुपीडनिं तया सुख भारी १७
कार्य सिद्ध अपुलें नर व्हाया शत्रुला स्तवि तया फसवाया ।
भक्तिमूलक नसे स्तुति जाणा,हेतुला स्तुतिचिया मनिं आणा १८
द्वेष चित्तगतही लपवाया शत्रुला स्तवि; पडे नर पायां ।
हेतु वंचन तया स्तवनाचा, चित्तिं न स्तुति वदे जरि वाचा १९
निंदनीं असति हेतु अनेक,झाकि निंदन हि भक्त्यतिरेक ।
द्वेष गुप्त करवी स्तुति जेंवी मित्रताहि भुवि निंदन तेवीं ॥२०॥
निंदितो नर जनीं स्ववरिष्ठ हें खरें धरिति त्यांस अरिष्ट ।
निंदन स्फुट जना फसवाया, स्नेह गुप्त नचि ये वळखाया ॥२१
डौल जे करिति सभ्यपणाचा, जे न बोलति जनांत कुवाचा ।
ते खरे नसति सभ्य न शिष्ट, तत्समागम नयास अनिष्ट ॥२२॥
दाविती रसिकता जगतांत ते अविद्य बहुधा असतात ।
ग्रंथ त्यांस न कळे लवमात्र, डौल ते मिरविती अतिमात्र॥२३॥
जे अविद्य रसिकत्वविहीन ते सदा करिति डौल नवीन।
डौल पाहुनि फसे जन मूढ, कां न हो रसिकतायश रूढ?॥२४॥
न्यायमूर्ति झळके नर लोकीं, स्त्रीस तो रडवि लोटुनि शोकीं ।
वोपितो स्वगणिकेप्रति वित्त, स्त्री निजा गणि तदीय न चित्त२५
श्मश्रु नित्य करवूनि वरिष्ठा पूजिती छळिति तेचि कनिष्ठा ।
त्यांस ताठ मृदु वा म्हणवेना, जो म्हणेल करि तो स्थिर ऐना२६
उच्च जो पदिं असे नर त्याला अन्य उच्चपदिं हो खरे[१६] भाला[१७] ।
मानि तो सुजनपात करोनी लोक मद्यश सुखाविल दोनी॥२७
जो चढे पुरुष उच्च पदास तो खरोखर असे विभुदास ।
उच्चता नर विभुस्तुतिगानें लाहतो, जरि तयीं गुण साने॥२८॥
जो वघों पुरुष उच्चपदीं तो उच्च आपण असें म्हणवीतो ।
लोकही म्हणति उच्च तयास नेणतां अधम तद्धृदयास ॥२९॥

---

१५ पाप म्ह० दोष, चूकी. १६ तीक्ष्ण. १७ वर्चा.

व्यावहारिक अशा विभवानें मंडितास भजती जन मानें ।
वैभवांकित असे व्यवहारीं तो स्तुतीस न सदा अधिकारी ।।३०।।
उच्च वृत्ति करि उच्च नरास,स्थान उच्च न, न वा धनरास ।
तत्त्व मूढ जन हें उमजेना, त्यास काचमणिभेद कळेना ।।३१।।
उच्च दे न पद उच्च गुणातें,स्थान नीच करि नीच न त्यातें ।
उच्चता अवर्चता[१८] गुणयोगें येतसे, कधिं न ती पदभोगें ।।३२।।
नित्य उच्चपदिं नीच नरास पाहतों; उचित ज्यां उपहास ।
हेमपंजरिं अधिष्ठित काक हासवी न कवणासि वराकें[१९] ? ।।३३।।
ग्रंथनामगणती शिकतो तो श्रेष्ठ उच्च जनदृष्टिस होतो ।
पंडितत्व अतिविस्तृत त्याचें हें मत प्रकट होइ जनाचें ।। ३४ ।।
ग्रंथसारलवगंध नसून, ग्रंथनामगणनाच करून ।
पंडितत्वयश मेळवितात उच्च ते पदिं सुखें चढतात ।।३५।।
रम्य सुंदर असे मुख ज्यांचें, बोलती सुरस जे प्रिय वाचे ।
शीघ्र ते चढति उच्चपदाला, मार्ग सर्व उघडेच तयांला ।।३६।।
रम्य देखुनि फसे मुग्ध लोक, बाहुली बघुनि ज्यापरि तोक ।
रम्य ज्यास मुख देइल दैव त्यास उच्चपद, कीर्ति सदैव।।३७।।
वावदूक[२०] वदतो मृदु गोड, नीतिची करुनि सुंदर फोड ।
शब्दडंबर जना ठकवीतें, गर्ह्य वस्तु शुचिसें दिसवीतें।। ३८ ।।
वावदूक अति गर्हित तत्त्वें आचरूनि फसवी कुशलत्वें ।
नीतिशी निज अनीति करीतो,साधुनीतिहि अनीतिपरी तो ३९
वावदूक करि सज्जनघात, स्वर्गिं तो अजि असेल सुखांत ।
वावदूक हरि सज्जनवित्ता,रक्षणश्रम तदीय न चित्ता ।। ४० ।।
वावदूक करि सज्जनहत्या, ती घडे स्व अवनार्थ अगत्या ।
ताडि साधुस म्हणे मम शौर्य,कौशल स्फुट म्हणे मम चौर्य४१
साधुचा बुडवुनी अधिकार तो म्हणे मम तयीं उपकार ।
घोर दुःख अधिकारनिमित्त दुःख भोगील तदीय न चित्त ४२
चाटितो विभुमुखोद्गत लाला, साधितो अपुलिया कुशलाला ।
कृत्य हें अति विनिंद्य खरे हो, वावदूकवाचें वंद्य ठरे हो ।।४३।।

---

१८ खालचा दर्जा. १९ क्षुल्लक प्राणी. २० चतुर वक्ता.

वावदूक न करी व्यभिचार, काम सृष्टिनियमोत्थ विकार ।
तो करी सुजनकीर्त्यपहार नाम त्याप्रति विनोद असार ॥४४॥
वावदूकमुखनिर्गतशब्दडंबर ध्वनि करी जणुं अब्द ।
हा ध्वनी हरि विवेक जनाचा, थोर सत्य महिमा वचनाचा ४५
मित्रहो वचनपाटवशक्ति कार्य तें करि न जें हरिभक्ति ।
शक्ति नाश करि ही खलहस्तीं नाश मत्त करि ज्यापरि हस्ती ४६
ग्रंथलेखन तुला श्रमवील तें त्यजूनि सुख मेळविशील ।
बोध हा मृदुवचें करणारे ते हितेच्छु नसती जन सारे ॥४७॥
कीर्तिनें झळकला स्वकनिष्ट साहतो न खलवृत्ति वरिष्ठ ।
यामुळें करि तया उपदेश तन्मनांत हितबुद्धि न लेश ॥ ४८ ॥
ग्रंथ ज्यांस समजे नचि सार्थ तो विनिंदिति अहो नरसार्थ ।
ग्रंथ निंद्य नसतो लवमात्र, निंदनास नरसार्थचि पात्र ॥४९॥
बाह्यरूप बघुनी न भुला हो, कीं न यो प्रखर संकट लाहो ।
नीच सत्तम शिका वळखाया, सत्परीक्षण न होइल वाया॥५०॥

जना विसंवाद समर्पिला असा,
करो तयांच्या परितुष्ट मानसां ।
उमात्मजा तो वितरो मला शम,
दुजी न अंतःकरणीं स्पृहा मम ॥ ५१ ॥

REFBK-0003141

निरूपण अशा रीतीनें समाप्त झाल्यावर चार परिशिष्टें दिलीं आहेत, त्यांत आणखी आठ दहा अर्थालंकार, कोटी, इंग्रजी अलंकार, वगैरेंचीं त्रोटक माहिती दिली आहे. नंतर सुमारें १५० पद्यें विद्यार्थ्यांनें स्वतः अलंकार ठरविण्यासाठीं दिलीं आहेत, आणि शेवटीं सर्व पद्यांची एक वर्णानुक्रमानें सूचि दिली आहे.

ह्या पुस्तकाचा उपयोग इंग्रजी आणि मराठी शाळा आणि कॉलेजें ह्यांतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना होण्याजोगा असून शिवाय जे कोणी स्वताच्या परिश्रमानें ज्ञानार्जन करूं इच्छिणारे लोक असतील, त्यांनाही हें पुस्तक उपयोगी पडेल. किंमत एक रुपाया.

**6 A Concise Sanskrit English Dictionary**. Pages over 1250 of Demi 8 size. Price Rs. 4

**७. कैंजळ गडाचा कबजा**—ही कादंबरी दोनशे पृष्ठांची असून रहस्यपूर्ण आहे. किंमत १ रुपाया.

**८. कोरलईचा किल्लेदार**—ही मनोरंजक आणि रहस्यपरिप्लुत कादंबरी ७५० पानांची असून ती वाचावयाला हातीं घेतली असतां समाप्त झाल्याशिवाय सोडवत नाहीं. किंमत चार रुपये.

**९. गणवंत गडाचा गडकरी**—ही कादंबरी २७८ पानांची असून ती रहस्यपूर्ण आहे. ती शिवाजीच्या उदयकाळावरची असून तींत शिवाजीनें गणवंत गड कसा हस्तगत करून घेतला, हा विषय आहे. किंमत अडीच रुपये.

**टीप**—१, २, ३, ४ हीं पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे मिळतील.

**टीप**—७, ८ हीं पुस्तकें भारतगौरव ग्रंथमाला, मुंबई, येथें मिळतील.

**टीप**—९ हें पुस्तक तात्या नेमीनाथ पांगळ, आदित्यवार पेठ, पुणें, यांचेकडे मिळेल.

**टीप**—५ आणि ६ पुस्तकें चित्रशाळा प्रेस, पुणें येथें मिळतील.

श्री० शांताबाई भिडे, बी. ए.

यांची रहस्यपरिप्लुत कादंबरी.

## कौमुदी.

किंमत १ रुपाया.

चित्रशाळा प्रेस पुणें.



सौ० सरस्वतीबाई भिडे

यांची सुरस कादंबरी

## सरोजिनी

किंमत १ रुपाया

शंकर हरि मुळे

बुकसेलर, पुणें.


---


मुद्रक

शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

प्रकाशक

विद्याधर वामन भिडे ७३५ सदाशिव पेठ, पुणें सिटी.